कुसुमावती नाटक.

अंक १ ते ५.

किंमत १२ आणे.

॥ श्री ॥

कुसुमावती नाटक.

अंक १ ते ५.

हें पुस्तक

हादेव रघुनाथ अचवल राहणार गोरेगांव,
यांनीं लिहिलें तें,

चिंतामण भास्कर सहस्रबुद्धे,
यांनीं
मुंबई येथें
जावजी दादाजी यांच्या
"निर्णयसागर" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

आवृत्ति पहिली.
१००० प्रती.

सन १८९५.

किंमत १२ आणे.

हें पुस्तक

गोरेगांव संस्थान सिद्धेश्वर

येथील

श्रीवरदेश्वरचरणारविंदीं

अत्यंत भक्तिपुरःसर

व

सप्रेम अंतःकरणानें

अर्पण केलें आहे.

ग्रंथकर्ते.

कुसुमावती नाटकांतील पात्रें.

१ चंद्रसेन	भद्रावती नगरीचा राजा (नायक).
२ चक्रंभट	चंद्रसेनराजाचा मित्र.
३ रंभाजीराव ...	चंद्रसेनराजाचा हितशत्रु.
४ कुसुमावती ...	चंद्रसेनराजाची स्त्री (नायिका).
५ प्रेमावती... ...	कुसुमावतीची प्रीतींतली दासी.
६ तपस्वी	भद्रावती नगराजवळचे पहाडांत राहणारा.
७ वेषधारी बैरागी ...	मूळचा चंद्रसेन.
८ पिशाच	मूळचा रंभाजीराव.
९ वेषधारी वीट... ...	मूळची कुसुमावती.
१० वेषधारी राजकन्या	मूळची कुसुमावती.
११ चंद्रकांत... ...	केरलदेशचा राजा.
१२ वेषधारी राजा	मूळची कुसुमावती.
१३ वसंत	चंद्रकांताचा प्रधान.

शिवाय–शिपाई–प्रतिहारी–वगैरे.

प्रस्तावना.

हें पुस्तक आजपर्यंत छापून प्रसिद्ध झालेल्या अनेक नाटकां-प्रमाणें कोणत्याही संस्कृत अगर इंग्लिश वगैरे ग्रंथांचे आधारानें रचिलेलें नसून केवळ कल्पित आहे. अलीकडे छापून प्रसिद्ध असलेलीं कांहीं नाटकें, कादंबऱ्या वगैरे ह्यांतील गोष्टी खरोखर घडलेल्या नसल्यामुळें ह्मणा, अगर कर्त्यांच्या कांहीं तरी उगीच निरर्थक लाविलेल्या पाल्हाळामुळें ह्मणा, किंवा कर्त्यास नाट्य-कलेची पूर्ण माहिती नसल्यामुळें ह्मणा, तीं जशीं उतरावीं तशीं उतरत नाहींत. कारण नाटकाचा व कादंबरी वगैरेंचा जो मुख्य उद्देश मनावर बरावाईट ठसा उमटणें तो जसा वठावा तसा वठत नाहीं. उगीच कोठें मनोरंजन झालें तर होतें. असें कित्येक विद्वानांचें मत आहे. तसें हें पुस्तक न व्हावें इतकेंच नव्हे तर हें वाचल्यापासून अगर यथार्थ प्रयोग पाहिल्यापासून खरोखर वाचकांच्या व प्रेक्षकांच्या मनावर बोधपर ठसा उतरून याचा व्यवहारांत फारच उपयोग व्हावा ह्मणून ग्रंथकर्त्यांनीं जेतकी मेहनत घेतां आली तितकी घेतली आहे. याबद्दल वि-शेष लांबलचक लिहीत बसणें ह्मणजे आत्मस्तुति करणें आहे. ह्मणून तें पाहणें वाचकांवरच सोंपवितों.

यांत करुण, भयानक, शृंगार, हास्य वगैरे रस प्रधान आहेत. चांगल्या रीतीनें दाखविण्याविषयीं साधला तेवढा प्रयत्न केला आहे. हें पुस्तक बोधपर व मनोरंजक असून गृहस्थाश्रमी प्रत्येक स्त्रीपुरुषांनीं वाचण्यास अगदीं योग्य आहे.

या नाटकांत पार्टी मंडळी थोडी लागत असल्यामुळें, याचा प्रयोग स्टेजवर करण्यास हें फार योग्य आहे. व कुशल नाटकका-रांनीं यथार्थ प्रयोग करून दाखविल्यास लोकप्रिय झाल्यावांचून

रहाणार नाहीं. आमच्या कुशल नाटककार देशबंधूंनीं आमच्या पुस्तकास योग्य आश्रय दिल्यास आह्मी त्यांचे फार आभारी होऊं.

पुस्तक लिहिण्याचें काम फार कठीण व महत्त्वाचें आहे. आमच्या अल्पबुद्धीमुळें यांत अनेक दोष असण्याचा फार संभव आहे. तरी "हंसक्षीर" न्यायानें वाचकांनीं गुण तेवढे ग्रहण करून दोष कळविल्यास सुदैवानें दुसऱ्या आवृत्तीचा प्रसंग आल्यास अवश्य सुधारणा करूं.

सदर्हू पुस्तकास योग्य लोकाश्रय मिळाल्यास दुसरीं कांहीं पुस्तकें आपल्या मराठी भाषेंत प्रसिद्ध न झालेलीं इतर भाषेंतील पुस्तकांच्या आधारानें छापण्याचा आमचा विचार आहे. करितां सर्वांना उदार आश्रय देण्याविषयीं सविनय प्रार्थना आहे.

या पुस्तकाचे कामीं मित्रवर्य वे. शा. सं. रा. रा. गोविंद लक्ष्मण शास्त्री रानडे गोरेगांवकर, नरहर शास्त्री गोडसे वरसईकर, सीताराम शास्त्री लेले उंबरलेकर, व मि. रा. रा. गोविंद गोपाळ पेंडसे मास्तर व बापूराव पेठे व धोंडो वीरेश्वर जोशी यांनीं तपासण्याचे वगैरे कामीं फारच मेहनत घेतली त्याबद्दल आह्मी त्यांचे फार आभारी आहों.

मुंबई, तारीख ३० माहे मार्च सन १८९५.

ग्रंथकर्ते.

या पुस्तकाबद्दल कांहीं अभिप्राय.

Dear Sir,

I hereby beg to inform you that, I have gone very carefully through the pages of the drama, by name Kusumâvati, submitted to me by you for my opinion thereon, and it is a matter of great pleasure for me to say, that it has left a very good impression upon my mind. As a light literature, it will, no doubt, completely engross the mind of the juvenile reader until he has finished it. It also belongs to that class of Dramas, that are the best fitted for the stage. Its performance before the public will, not only command a good run at the theatre, but will, I am sure, also keep the attention of the audience, pleasingly occupied for about five hours;–a time, that is now-a-days considered to be the most reasonable, as being neither too short nor too long for all such performances to take. It tells us, in a well-connected manner, a story, that seems to me to be almost an original one. Its soliloquies are the best of their class. The characters, it contains, are very varied, and are depicted in the best possible manner. It also teaches us a good many things. For instance, on reading it, we see how the Almighty God is ever ready to lead his assistance, just at the moment, when it is most needed in times of difficulty to those women, who, like Kusumâvati, with great courage and a stout and determined mind, try to keep their great virtue of chastity, unsullied, under the most trying and crucial circumstances; how treacherous, crafty and sinful men, like Rambhâjîrao,

pretend to be our most intimate friends; but at the same time, try to take advantage of our simplicity and the trust, we repose in them, and when time comes, to rob us of everything that is dearest and nearest to us, and how for all that, they are duly punished by God, in the long run; how the love of young men, like Chandraséna and Chandrakànt, instead of being confined to perticular objects, always looks for new things for its enjoyment and so forth.

On the consideration of all these and other things, I come to the conclusion, that from a moral point of view also, your attempt, Sir, as stated by you in the preface, to give out to the world, a compilation, that would be best calculated to inculcate upon the mind of the reader, the principles of morality, would be attended with a good deal of success. Its price also has been so moderately fixed as to place it within the easy reach of all those persons who have a special liking for drama-reading, and for this and other reasons above set forth. It certainly deserves a place, upon the shelf of every family library also.

I, therefore, make no hesitation in recommending your work to the kind and liberal patronage of all persons, who know Marathi, and who are endeavouring their utmost, by all possible means in their power, to encourage the spread of literature in that language.

Dhulia, 22-5-95.

I beg to remain Sir,
Yours most &c. &c.
Hari Sadashiv Apte. B. A. L. L. B.,
Pleader, District Court, Khandesh.

॥ श्री ॥

धुळें, ता० २६ मे १८९५.

रा० रा० महादेव रघुनाथ अचवल,

यांस.

सा० न० वि० वि० आपलें कुसुमावती नाटक साग्र वाचलें. त्याचीं बाह्यांगें ह्मणजे छपाई–टाईप वगैरे चांगलीं असून, अंतरगेंही बरीं साधलीं आहेत. भाषा चांगली आहे. पात्रें रंगभूमीवर एकटींच असतां मनांतील विचार व्यक्त करितात; त्या वेळेचे त्यांचे उद्गार अगदीं सत्य व बोधपर आहेत. व हाच भाग आपले नाटकांत विशेष चांगला उतरला आहे, असें माझें मत आहे. प्रस्तावनेंत लिहिल्याप्रमाणें पुस्तक स्त्रीपुरुषांनीं वाचण्यास योग्य आहे. एकंदरींत नाटक चांगलें असून लोकाश्रयास पात्र आहे. परंतु किंमत कमी करतां आली तर बरें. कळावें हे विनंती.

आपला,

वकील, डिस्ट्रिक्ट कोर्ट, धुळें, खानदेश. } **गणेश लक्ष्मण कोपरकर,** बी. ए. एल्. एल्. बी.

श्री.

राजमान्य राजेश्री महादेव रघुनाथ अचवल,

यांस.

वि. वि. तुमचें कुसुमावती नाटकाचें पुस्तक वाचून पाहिलें. संविधानक कल्पित असूनही प्रत्यक्ष झालेल्या गोष्टीसारखें वाटतें. भाषा साधी व सरळ आहे. हें पुस्तक जरी नाटकाचें आहे, तरी कुलीन स्त्रियांस कुसुमावतीच्या वर्तनाचा कित्ता घेण्यासारखें आहे. पुस्तक हातीं धरल्यावर वाचकांस आनंद होऊन, जसें इंग्रजी ना-

व्हेलांची गोडी लागून पुढील परिणाम काय झाला, हें कळण्याची उत्कंठा उत्पन्न होते; तद्वत् ह्या पुस्तकाची रचना आपणास साधली आहे. ह्या पुस्तकास लोकाश्रय बराच मिळाल्यास आपणासारख्या लेखकांस मराठी भाषेंत बोधपर किंवा दुसऱ्या विषयावर ग्रंथ करण्यास बरेंच उत्तेजन येईल असें मी इच्छितों. ह्या पुस्तकांतून पात्रांच्या वर्तनांचे गुण घेण्यास हरकत नाहीं. हें पुस्तक प्रत्येक कुटुंबी मनुष्यानें संग्रह करण्यासारखें आहे. या पुस्तकाची लोकानुमतें किंमत जास्त आहे, असें वाटतें. परंतु माझ्या स्वानुभवावरून निर्णयसागर छापखान्यांत छापिलें असल्यामुळें; ती आपणांस कमी करितां आली नसेल. करितां सुदैवानें द्वितीयावृत्तीचा योग आल्यास अवश्य विचार करावा. कळावें हे विनंति.

आपला,

मुक्काम हालियाळ, जिल्हा कानडा. } G. P. Dalvi, District Ab. Inspector. Karvar, Range.

रा. रा. महादेव रघुनाथ अचवल यांस—नमस्कार विनंती विशेष. कुसुमावती नांवाचें नाटक आपण अभिप्रायाकरितां पाठविलें तें मीं साग्र वाचिलें. नाटकांतील भाषा सरळ, व सुबोध आहे. संविधानकांत काल्पनिक भाग जितका आला आहे त्यापेक्षां कमी आला असता तर बरें झालें असतें; कारण अर्वाचीन काळीं पिशाचादी अमानवी योनीची मदत नाटकांतही घेणें अप्रशस्त होतें; तथापि या नाटकांत बोध घेण्यासारख्या पुष्कळ गोष्टी आहेत. मानवी स्थितींतील ऐश्वर्यक्षणभंगुरता, वृत्तिचांचल्य वगैरे वस्तुस्थिति चांगली वठली आहे. मनरंजनाकरितां वाचण्यास पुस्तक चांगलें आहे. वरकड विशेष नाहीं. कळावें लोभ असावा हे विनंती.

मुंबई, तारीख १६–७–१८९५. } P. P. Khare B. A. L. L. B. High Court Pleader.

॥ श्री ॥

धुळें, तारीख ८ माहे जुलई सन १८९५.

रा. रा. महादेव रघुनाथ अचवल मु॰ गोरेगांव

यांस.

साष्टांग नमस्कार वि॰ वि॰ तुमचें "कुसुमावती नाटक" नांवाचें पुस्तक वाचून पाहिलें. भाषा सरळ आणि सुबोध आहे. कथानक लहानच परंतु मजेदार साधलें आहे. नाटकांतील मुख्य मुख्य पात्रांच्या स्वभावांचें वगैरे दिग्दर्शन थोडें जास्त असणें अवश्य होतें. व एक दोन ठिकाणीं कुसुमावतीचे भाषणांत थोडा जास्त गंभीरपणा पाहिजे होता. वाचणारांचे मनावर हिंदुसमाजांतील दोष प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न जागजागीं केला आहे, तो कित्येक ठिकाणीं अप्रासंगिक झाला असून त्यामुळें एकंदर नाटकाचा मार्मिकपणा थोडासा नाहींसा झाला आहे. परंतु त्यावरून दिसणारी तुमची सुधारणेच्छा स्तुत्य आहे. पुस्तक "**निर्णयसागर**" छापखान्यांत छापिलें असल्यामुळें बाह्य स्वरूपाबद्दल लिहिण्याचें मुळींच कारण नाहीं. एकंदरींत हल्लींचे पुस्तक एकवार वाचण्यासारखें आहे. आणि स्त्री, पुरुष, अल्पवयी, अगर प्रौढ यांपैकीं प्रत्येकास, त्याच्या वाचनानें **करमणूक** होईल यांत संशय नाहीं. ईश्वरसत्तेनें तुह्मांस चांगला लोकाश्रय मिळून तुमचा लेखनक्रम असाच कांहीं दिवस चालल्यास पुढें तुमच्या हातून मराठी भाषेंत चांगले ग्रंथ लिहिले जातील अशाबद्दल हें पुस्तक उत्तम साक्ष देत आहे.

किंमत थोडी कमी केल्यास पुष्कळ लोकांस पुस्तक विकत घेतां येईल, कळावें ही विनंती.

आपला,

वकील, डिस्ट्रिक्ट कोर्ट धुळें, खानदेश. — **रामचंद्र गोपाळ माचवे,** बी. ए. एल्. एल्. बी.

श्री.

राजमान्य राजेश्री महादेव रघुनाथ अचवल मुक्काम मुंबई
यांस.

वि. वि. तुमचेकडून आलेलें " कुसुमावती " नाटकाचें पुस्तक मीं वाचून पाहिलें. भाषा साधी व सरळ आहे. व जुळणीही बरी आहे. संविधानक कल्पित पण मिश्र आहे. ह्मणजे कांहीं पात्रें प्राच्यमताचीं व कांहीं पात्रें अर्वाचीन मताचीं घेण्याचा प्रयत्न केला आहे. हल्लींच्या " **प्रगतीच्या** " काळांत अशा मिश्र नाटकांची जरूरी आहे. कारण दोन्ही मतांचें योग्य विवेचन झालें तर पुस्तकास बराच आश्रय मिळण्याचा संभव असतो. प्रस्तुतच्या नाटकांत कुसुमावतीसारख्या साध्वी स्त्रीनें; तपस्व्यानें दिलेल्या दर्भाच्या आंगठीवर पूर्ण भरंवसा ठेवून, पुढें एके ठिकाणीं आत्मगत भाषणांत धर्मशास्त्रकार पुरुषांची अतिशय निंदा केली आहे, हें थोडें विसंगित दिसतें. चक्रंभटाचें पात्र बरेंच साधलें आहे. त्यानें वेळोवेळीं केलेला उपदेशही बरा आहे. तुमचा हा पुस्तक लिहिण्याचा प्रथमच यत्न असल्यामुळें, अशा चुका **क्षम्य** आहेत. तुह्मीं अशींच पुस्तकें लिहिण्याचा क्रम सुरू ठेवाल तर पुढें चांगले ग्रंथकार व्हाल असें माझें मत आहे. एकंदरींत हें पुस्तक स्त्री-पुरुषांनीं वाचण्यास योग्य आहे. व यास चांगला आश्रय मिळेल. अशी मी आशा करितों. कळावें हे विनंति.

मुंबई,
३०–७–९५.

R. G. Pradhán,
Ag. Shirastedar, High Court.

सूचना—आणखीही अनेक विद्वानांचे उत्तम अभिप्राय आले आहेत; स्थलसंकोचामुळें देता आले नाहींत.

ग्रंथकर्ता.

श्रीवरदेश्वर प्रसन्न.

कुसुमावती नाटक.

अंक १ ला.

मंगलाचरण.

(पडद्यांत)

श्लोक.

बालार्कप्रभमिंद्रनीलजटिलं भस्मांगरागोज्ज्वलं
शांतं नादविलीनचित्तपवनं शार्दूलचर्मांबरं ॥
ब्रह्माद्यैः सनकादिभिः परिवृतं सिद्धैर्महायोगिभि-
र्दत्तात्रेयमुपास्महे हृदि मुदा ध्येयं सदा योगिभिः ॥ १ ॥

प्रवेश १ ला.

स्थळ.—भद्रावती नगरींतील एक चवाठा.

चक्रंभट—(कपाळास हात लावून) दैवाची गति मोठी विचित्र आहे! ग्रहमालेंतील सूर्यच जर स्थानभ्रष्ट झाला, तर मग इतर ग्रह स्वस्थानीं कोठून राहणार? ज्या मला चक्रंभटाला या भद्रावती नगरींत सर्व भिक्षुक, प्रमुख मानीत असत व त्यांतून माझ्या हातीं दानाध्यक्षाचें काम असल्यामुळें; ह्या नगरींत जे कोणी दूर दूर देशांतून अतीत, अभ्यागत, संन्याशी, भिक्षुक, शास्त्री, वैदिक, पुराणिक

वगैरे येत असत, त्यांचें ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें आदरातिथ्य करून त्यांस नेहमीं घिवर, मांडे, केशरीभात, मोतीचूर, श्रीखंड, जिलबी वगैरे नाना तऱ्हेच्या पक्वान्नांचीं यथेच्छ भोजनें घालून शेवटीं योग्यसंभावनाही करीत असें; ह्मणून माझ्या वाड्यांत नेहमीं भिक्षुकांच्या झुंडीच्याझुंडी भेटीसाठीं येत असत. मला मात्र राजवाड्याखेरीज दुसरीकडे कोठें जाण्याचा कधींच प्रसंग येत नसे. (छातीला हात लावून) ज्या या चक्रंभटाला उन्हाचा कवडसा ह्मणजे कसा असतो, हें माहीतसुद्धां नव्हतें; त्याच चक्रंभटाला आतां फक्त दुपारची वेळ टाळण्यासाठीं गांवामध्यें भर दोनप्रहरीं दारोदार वणवण करीत फिरावें लागतें. अरे ! अरे ! अरे ! उन्हांतून अनवाणी रखडतां रखडतां माझ्या पायांना किती तरी फोड आले हे !!! ज्या चक्रंभटाचें हें पोट (पोटावर हात मारून) नेहमीं पंचपक्वान्नें खाऊन निव्वळ नगाऱ्यासारखें असावयाचें त्या चक्रंभटाचे पोटाला दोन दोन दिवस अन्न नसल्यामुळें सव्वा हात भाकाळीं किंहो पडलीं! आज वीस पंचवीस दिवसांत मी किती तरी थकलों हा! देवा, ह्मातारपणीं माझ्या कपाळीं तूं काय काय लिहिलें आहेस तें काहीं कळत नाहीं. माझा मित्र व्यसनाधीन होऊन त्यानें आपलें सर्वस्व घालविलें; ह्मणून माझ्याचशा काय ? पण हजारों गरीब लोकांच्या नशीबींही ग्रहदशा आली. मी त्याला वारंवार सांगत असें कीं, द्यूत खेळणें फार वाईट ! त्या रंभाजीरावाची संगत तूं सोड. पण आह्मी "वातापेपी" करणारीं भटें !!! आमचें ऐकतो

कोण? त्याचें तें आपलें खरें. तो रंभाजीराव! त्याचें स्मरण झाल्याबरोबर माझ्या अंगाचा अगदीं तिळपापड होतो. (रागानें) त्या दुष्टानें माझ्या मित्राला इतकें नादीं लावून रसातळास मिळवावें? आँ! नाद हा मोठा वाईट आहे. त्यापासून मनुष्यावर दुर्घट प्रसंग गुदरतात आणि जवळचें सर्व नाहींसें झालें ह्मणजे मग डोळे उघडतात. पण मग काय उपयोग? "सरली सुगी; नि बसली उगी." (इकडे तिकडे पाहून व ऐकल्यासारखें करून) काय ह्मणतां मी कोण? मी, मी भद्रावती नगरीच्या राजाचा मित्र चक्रंभट. पहा! आपल्या मित्रांच्या व वडीलमनुष्यांच्या हितोपदेशाचा अव्हेर केला, ह्मणजे असेच परिणाम व्हायचे. याकरितां सांगतों, बाबांनो, आपल्या आईबापांचें, गुरूचें, मित्राचें व इतर वडीलमनुष्यांचें ऐकत जा बरें? न ऐकाल तर या माझ्या मित्राप्रमाणें फसाल. (इकडे तिकडे पाहून) हा कोण? तो दुष्ट नराधम रंभाजीराव आला वाटतें. छिः! त्या रांडलेंकाची सावलीसुद्धां घेऊं नये; जावेंच तर येथून आतां. (शिवहरे! शिवहरे! असें ह्मणत जातो.)

(इतक्यांत रंभाजीराव प्रवेश करितो).

रंभाजीराव—ठीक झालें! कार्यभाग तर बराच उलगडला. ज्या हेतूनें मी घरदार सोडून येथें आलों, तो हेतु सफल होण्याला आतां थोडाच अवकाश आहे. राजेसाहेब तर अक्कलशून्यच होत चालले आहेत. छेः! होत चालले आहेत कसचे!!! झालेच. माझी छाप आतां पूर्ण बसली. कांहीं जरी केलें तरी राजेसाहेबानां

शंका ह्मणून येतच नाहीं. काय संगतीचा महिमा आहे पहा! जो राजा मोठा कीर्तिमान्, धार्मिक, न्यायी, सत्वशील ह्मणून गाजत होता; तोच राजा माझ्या कपटजालांत सांपडून अगदीं नादलुब्ध झाल्यामुळें आतां बेइमानी, अधार्मिक, अन्यायी बनून; पाहिजे तें करण्यास तयार झाला आहे. अथवा हा त्याचा दोष नव्हे. कारण मनुष्यप्राणी श्रेष्ठ खरा, पण त्याला जशी संगति असेल तसेंच वळण लागत जातें. कारण अनुकरण करणें हा त्याचा धर्मच आहे. मनुष्य चांगल्या गोष्टींपेक्षां वाईट गोष्टींचें अनुकरण फार लवकर करितो. मनुष्याची परीक्षा करून त्याच्याशीं वर्तन करणें फार कठीण आहे. मनुष्य जसा बाहेरून दिसतो; तसाच तो असतो असा नियम नाहीं. फार लांब कशाला, मीच पहाना; थोर घराण्यांतला असून ही नीच गोष्ट पत्करिली व अनेक युक्त्या योजून या चंद्रसेन राजाचे दरबारांत आपला शिरकाव करून राजाची पूर्ण मर्जी बसवून घेतली; इतकेंच नव्हे, तर राजाचे जिवाचा केवळ प्यारा बनून गेलों व द्यूताचा नाद लावून त्याचें सर्वस्व हिरावून घेतलें. मी जवळ असल्यावांचून त्याला क्षणभरही चैन पडत नाहीं. मी त्याला वर वर पुष्कळ उपदेशाच्या गोष्टी सांगतों. पण तो पक्का नादिष्ट बनल्यामुळें, त्याचे मनावर हा वरकर्णी उपदेश कितपत उमटणार? मुकला बिचारा सर्व ऐश्वर्याला! असो. हें माझें कर्तव्यच आहे. हे जगा! तुझ्यांतील भोळ्या व अज्ञान लोकांना नानातऱ्हेच्या भुलथापा देऊन जे फशीं पाडितात ते आमच्यासारखेच व आमच्या कपटजालांत

सांपडून फसणारे ते या चंद्रसेनासारखेच! यासाठीं सांगतों, हे जगा, नकोरे नको आमच्यासारख्यांच्या नादीं लागूं! अरे हो! पण अजून मुख्य कर्तव्य तें राहिलेंच आहे. या राजाची स्त्री कुसुमावती जेव्हां उपवर झाली, तेव्हां ज्या अनेक तसबिरी हिच्या बापानें जमविल्या होत्या; त्यांत माझीसुद्धां तसबीर होती व ती हिच्या बापाला पसंतही पडली होती. पण तिनें आपल्या सौंदर्याच्या व तारुण्याच्या तोऱ्यामुळें मजसारख्या बहाद्दराचा अपमान केला काय? असो. त्याचा हा पठ्ठ्या सूड उगविल्यावांचून राहील असें तिला वाटलें अँ! पाहातों आतां कसा काय तोरा आहे तो! तिलाही त्याच्याकडून द्यूताला लाववीन तरच मी रंभाजीराव!! जावेंच तर आतां, विलंब करून उपयोग नाहीं. (जातो.)

(पडदा पडतो.)

प्रवेश २ रा.

स्थळ—कुसुमावतीचा महाल.

कुसुमावती—काय बाई करावं, अपशकुनांनीं तर माझी अगदीं पाठच पुरविली आहे, जरा अंमळ बसलं तरीसुद्धां डोळ्यांवर झांपड येऊन मेलीं भलभलतीं स्वप्नं पडतात. देवा! मला आतां मरण येईल किंवा एखादी वीज आकाशांतून कडकडून मजवर येऊन पडेल, किंवा हे पृथ्वी माते तूं दुभंग होऊन मला उदरांत घेशील, तर फार चांगलं होईल. आई जगदंबे! आतां माझ्या दुःखाची अगदीं सीमा झाली; ह्याच्या पलीकडे कांहीं व्हायचं ह्मणून रा-

हिलं नाहीं. माझ्या स्थितीचा विचार केला ह्मणजे होतं काय ? आणि झालं काय ? अस्सं वाटतं. माझं वारंवार सांगणं असे कीं, हा द्यूताचा नाद फार वाईट, नका हो त्या मेल्या रंभाजीरावाच्या नादीं लागूं; पण बाई, ऐकतं कोण ? मला ह्मणायचं कीं, तुह्मां बायकांना काय समजतं, तुमचं शहाणपण दरवाजापर्यंत. हें ऐकून मी बाई आपली निमूट बसत असें. शेवटीं गोष्ट तर ह्या थराला येऊन ठेपली. असो नशीब आपलं !!! (सचिंत बसते.)

(इतक्यांत प्रेमावती दासी प्रवेश करिते.)

प्रेमावती—(आपल्याशीं) काय बाई करावं, महाराजांच्यापुढें तर अगदीं शर्थ आहे. मेला नाद नाद तरी किती ? त्या रंभाजीरावाच्या संगतीनं काय होतंनव्हतं तं सारं घालवून कीर्तीला कलंक लावून घेतला. आणखी आतां त्या चक्रंभटजींच्या तोंडून मीं असंही ऐकलं कीं त्या दुष्टानं महाराजांकडून—आमच्या बाईसाहेबांनाही पणाला लाविलं; व महाराज तो पणही हरले. (हळूच) देव करो नि ही गोष्ट खोटी होवो, ही गोष्ट जर खरी असेल; तर मग बाईसाहेबांवर मोठा कठीण प्रसंग आहे ह्मणायचा. कारण पहिल्यापासून त्या मेल्याचा त्यांच्यावर डोळा आहेच. असो. होणार तं कांहीं चुकत नाहीं. आपण जाऊन त्यांना ही गोष्ट कळवावी ह्मणजे त्या कांहीं तरी इलाज करतील. (दुःखानें) काय बाई नशीब तरी; जे शब्द स्वप्नांत देखील मनांत यायचे नाहींत ! ते मी आतां बाईसाहेबांपाशीं बोलूं तरी कसे. (जरा थांबून) अथवा मजसारख्या कपाळकरंट्या दासीच्या नशीबीं असल्याच बातम्या सांगण्याचं या-

यचं; तर न सांगून तरी काय करायचं!!! देवा! तूंच अतां अशा वेळीं त्यांचं रक्षण कर. (घाबरत घाबरत कुसुमावती-जवळ येते.)

कुसुमा०—अग प्रेमे, अशी घाबरलीस कां? झालं तरी काय?

प्रेमा०—बाईसाहेब, प्रसंग मोठा कठीण आहे. (रडूं लागते.)

कुसुमा०—अग, काय झालं असेल तें सांग; भिऊं नको. कांहीं जरी वाईट बातमी असली; तरी ती ऐकण्यासाठीं मी आपलं मन कसं अगदीं दगडापेक्षांही घट्ट केलं आहे. तर सांग काय असेल तें.

प्रेमा०—त्या मेल्या रंभ्यानं महाराजांकडून आपला आवडता भालचंद्र हत्तीदेखील पणाला लावून हिरावून घेतला.

कुसुमा०—वेडी कुठची! अग, त्या मेल्याच्यापाईं सारं राज्य घालविण्याचा प्रसंग येऊन ठेपला; हत्तीची कथा काय?

प्रेमा०—बाई, राज्य घालविण्याचा प्रसंग ठेपला कसला? तें तर पहिल्यानेंच गमावलं. नशीबानं एवढा आवडता हत्ती कुठं राहिला होता तो सुद्धां गेलाच.

कुसुमा०—अग, जें जें कपाळीं लिहिलं असेल, तें कांहींकेल्या चुकायचं नाहीं; मग त्याबद्दल उगीच वाईट कां वाटावं? देव करो नि भलताच प्रसंग न गुदरो!

(प्रेमावती कपाळावर हात ठेवून खळखळां रडूं लागते.)

कुसुमा०—प्रेमे, तूं वेडी तर नाहींना झालीस. अग, झाली गोष्ट रडून का चुकणार आहे?

प्रेमा०—मी नाहीं वेडी झालें, पण महाराजांना मात्र अतां पक्कं वेड लागून त्यांनीं अगदीं धर्मराजाचीच अवस्था मांडली आहे.

कुसुमा०—अग, धर्मराजानं नुसतं राज्यच नाहीं घालविलं तर आपल्या द्रौपदीस्त्रियेलाही पणास लाविलं होतं.

प्रेमा०—आपल्या महाराजांनीं देखील–नुकत्याच–दोन घटका झाल्या–(इतकें बोलून मूर्छित होते.)

कुसुमा०—अग बाई, एकून दुर्दैवानं जें ऐकण्याची पाळी कधीं तरी येईल असं वाटत होतं, तो प्रसंग आजच आला ना!! माते अंबे! आतां तूं तरी ह्या अभागिनीकडे पहा. (मूर्छित होते.)

प्रेमा०—(सावध होऊन) काय बाई करावं बाईसाहेब बेशुद्ध पडल्या!!! काय प्रसंग तरी हा! (कुसुमावतीस पंख्यानें वारा घालते.)

कुसुमा०—(सावध होऊन आवेशानें) एकून पुरुष हे महानिर्दय व कठोर ह्मणतात तें कांहीं खोटं नाहीं. आह्मां बायकांचीं मात्र मनं वेडीं. पतीसाठीं तिळतिळ तुटतात. जरा दरबारांतून यायला उशीर लागला ह्मणजे माझ्या वेडीच्या मनांत नानातऱ्हेच्या कल्पना याव्या. एखादे वेळीं असं वाटावं कीं, मजकडून कांहीं अन्याय तर झाला नसेलना? किंवा माझ्याबद्दल मनांत कांहीं राग तर नसेलना? असं माझं मनच मला खात असे. पण तिकडे कांहीं तरी आहे का? येणं झालं ह्मणजे कांहीं तरी आपलं सांगून वेडीची समजूत करायची; दुसरं काय? पुरुषांचं प्रेम बायकांवर पूर्ण बसलं आहे; असं जें बाय-

कांना वाटत असतं, तो केवळ भ्रम आहे. तारुण्याच्या भरांत तरुणांनीं तरुणींवर प्रेम दाखविणं हें साहजिकच आहे. प्रसंग आला ह्मणजे कोणी कुणाचं नाहीं. धिःकार असो या स्त्रीजातीला!!! पहा कीं पुरुष आपले गरजेपुरते, प्राणप्रिये, लाडके, इत्यादि विशेषणं देतात. पण आह्मी पुरुषांना जर खऱ्याच प्राणाहून प्रिय असतों, तर द्यूताच्या नादीं लागून त्यांनीं संपत्तीप्रमाणें स्त्रियांना गमाविलं असतं का? अथवा त्यांना तरी दोष कां द्यावा? मी आपले हतभागी नशीबालाच देतें ह्मणजे झालं. देवा! या जगांत ही कुसुमावती रहावी असं तुला आवडत नाहीं ना? देवा! तूं तरी काय करशील? जसें माणसाचं पूर्वसुकृत असेल, त्याप्रमाणं त्याला फळ मिळतं. परंतु देवा! तूं या जगांत स्त्रीजातच जर उत्पन्न केली नसतीस तर फार चांगलं झालं असतं!!

प्रेमा०—बाईसाहेब जें जें नशीबीं असेल, तें तें निमूटपणीं भोगलं पाहिजे. असले वेडगळ विचार करीत बसून काय उपयोग? तो दुष्ट आपणांस पूर्वींपासून माहीत आहेच. तो आतां इकडे येऊन आपली विटंबना केल्याशिवाय राहणार नाहीं. ह्मणून वेळींच येथून निघून कांहीं तरी तजवीज पाहिली पाहिजे.

कुसुमा०—(आपल्याशीं) आतां मला दुसरी तजवीज ती काय पहायची उरली आहे? मला या जगांत वांचण्याची मुळींच इच्छा नाहीं. हें जग मला अगदीं नकोसं झालं आहे. (स्मरण केल्यासारखें करून) हो, माझ्याजवळ एक तीव्र विषाची कुपी आहे; तिचा या संकटसमयीं चां-

गला उपयोग होईल. तर कोठें तरी एकांतस्थळीं जाऊन असंच करावं ह्मणजे सगळा त्रास चुकेल. (दासीकडे वळून) अग, तूं जा आणि स्वारी कोठें आहे, ती पाहून ये. मी मोतीबागेंत असेन.

प्रेमा०—बरं बाईसाहेब. (जाते.)

कुसुमा०—ही परत मोतीबागेंत येई तों पर्यंत आपण आपला कार्यभाग साधून घ्यावा ह्मणजे झालं. (जाते.)

प्रवेश २ रा.

स्थळ—रंभाजीरावाचा वाडा.

रंभाजीराव—मघांशीं मी बोलल्याप्रमाणें काम तर केलेंच. असो. राजेसाहेबांनीं कुसुमावतीला पणास लाविली व या पठ्ठ्याच्या सुदैवानें त्यांतही यानें हात दाखविला. आतां त्यांचेजवळ ऐश्वर्य ह्मणून कांहींच उरलें नाहीं. (गर्वानें) केवढा पण तिला पातिव्रत्याचा तोरा आहे! बरं पाहूं आतां, तिचा हा तोरा किती दिवस चालतो तो! इतके दिवस केलेल्या खटपटीच्या सार्थकतेची वेळ हीच आहे. बरं पण, ती सुंदरी कोठें आहे, हें पाहण्याकरितां विठूजीस पाठविलें होतें; तो अजून कां बरें नाहीं आला? (पुढें पाहून) कां रे विठूजी, आलास? ती कोठें आहे?

विठूजी:—धनीसाहेब, बाईसाहेबांना राजवाड्यांत पाहिल्या, त्यांच्या महालांत पाहिल्या, बागेंतल्या जलमंदिरांत पाहिल्या, पण कोठेंही दिसल्या नाहींत. इतक्यांत त्यांची प्रेमावती दासी भेटली तिला विचारलें. तेव्हां ती ह्मणाली कीं, बाईसाहेब आतांच ह्या जवळच्या मोतीबागेंत गेल्या आहेत.

रंभाजी०—काय ? मोतीबागेंत गेली आहे असें ह्मणाली. फारच नामी झालें. स्थळही रम्य, आणि अगदीं एकांत. विठूजी, तर चल मजबरोबर मोतीबागेंत. (आंत जाऊन बाहेर येतात.) कायरे विठूजी, बागेंतल्या महालांत शोधिली. सगळीं लतागृहेंही शोधिलीं पण ती सुंदरी कोठेंच दिसत नाहीं. कोठें बरें गेली असावी ? (सचिंत उभा राहतो इतक्यांत गस्तवाला शिपाई प्रवेश करितो.)

गस्तवाला—चौकी पहारा हुशार.

रंभाजी०—(आपल्याशीं) ह्या गस्तवाल्याला विचारावें ह्मणजे कांहीं तरी शोध लागेल. (उघड) कायरे ? कोणरे तो गस्तवाला.

गस्तवाला—धनीसाहेब, तो मी दवलती. (मुजरा करितो.)

रंभाजी०—ह्या बागेंतून बाहेर जातांना तुला कोणी स्त्री दिसली कायरे ?

गस्तवाला—होय धनीसाहेब, मी गस्त घालीत असतां एक बाई ह्या बागेंतून बाहेर पडली. तेव्हां ती कोण आहे व एवढ्या रात्रीची बाहेर कोठें जात आहे, हें पहावें ह्मणून मी हळूच तिचे मागून थोडासा पुढें गेलों तों ती थेट दक्षिणच्या दरवाजानें स्मशानांतील पडक्या शिवालयाकडे गेली. पहारा सोडून जाणें बरोबर नाहीं ह्मणून मी पुढें न जातां चौकीवर कळविण्याकरितां जात होतों तों आपली वाटेंत गांठ पडली.

रंभाजी०—बरें, तूं जा आपल्या पहाऱ्यावर. मीच पहातों ती कोठें गेली ती. (विठूजी व रंभाजीराव जातात.)

गस्तवाला:—चौकी पहारा हुशार. (जातो.)

प्रवेश ४ था.

स्थळ—श्मशान.

कुसुमावती:—मी दासीला मोतीबागेंत जातें असं सांगून या स्मशानांत तर आलेंच. ही जागा आपला कार्यभाग साधण्याला फार चांगली आहे. ह्या जगामध्यें मनुष्याला सर्वांपेक्षां जीव प्यारा असं ह्मणतात. तें मला बाई मुळींच खरं वाटत नाहीं. प्रत्येक मनुष्य जेव्हां चांगल्या स्थितींत असतो तेव्हां तो आपल्या जिवाची किती तरी काळजी बाळगतो, ह्याचा सर्वांना अनुभव आहेच. पण त्याच मनुष्यावर एखादं दुःसह संकट आलं ह्मणजे तोच मनुष्य आपल्या जिवाची मुळींच पर्वा करीत नाहीं. स्त्रीजातीचा मुख्य धर्म ह्मटला ह्मणजे, पतीचे आज्ञेंत राहून पातिव्रत्य–रक्षण करणं, हा होय. त्याला जर धोका येऊं लागेल; तर मग त्या जिवाची पर्वा करून काय उपयोग ? जगांतलं ऐश्वर्य हें झाडाच्या छायेप्रमाणें अस्थिर आहे. झाडाची छाया जशी नेहमीं एकाच ठिकाणीं रहात नसून जसा सूर्य फिरेल तसतशी ती फिरत असते, तशीच मनुष्याची स्थितिही वारंवार बदलत असते. खरोखर मला ईश्वराचे दयेनं कांहीं कमी नव्हतं ! एखादी गोष्ट माझ्या तोंडांतून निघण्याचा अवकाश, कीं ती करण्यासाठीं किती तरी सेवक अगदीं तयार असायचे, त्या या कुसुमावतीची आज अशी स्थिति होऊन तिला तिचं पातिव्रत्य संभाळण्याची काळजी पडावीना ? देवा! मी असं पूर्वजन्मीं कोणतं पातक केलं होतं! प्राणनाथ, तुह्मी तरी या जगांत सुखी असा ह्मणजे झालं. पण तें तरी व्हावं कसं ?

अग कुसुमावती, ही वेळ अशी विचार करीत बसण्याची नव्हे. ही मध्यरात्रीची वेळ असल्यामुळें सर्व नगरांत अगदीं सामसूम झाली आहे. डोळ्यांत बोट घातलं तरी दिसण्याची पंचाईत; तर अशाच वेळीं आपला कार्यभाग उरकून घेतला पाहिजे. (स्मरण केल्यासारखें करून) येथें जवळच शंकराचें सिद्धस्थान आहे; तेथें आपण जाऊन एकवार शेवटचं दर्शन घेऊन त्याचे पुढंच हा देह ठेवावा ह्मणजे त्या दुष्टाचे त्रासांतून तरी मी सुटेन एकदांची.
(जाते, इतक्यांत एक तपस्वी प्रवेश करितो.)

तपस्वीः— **श्लोक.**

मौलौ यस्य विधोः कला गलतटे नव्यांबुदस्य द्युतिः
स्कंधे नागपतेर्द्युतिः कटितटे स्फीता तनुर्भोगिनः ॥
वामांकेऽपि च यस्य पर्वतपतेः कन्या समुज्जृंभते
पुण्यैः पूर्वचितैस्तदीयचरणे प्रायो मदीया मतिः ॥ १ ॥

नमः परब्रह्मणे। नमः परब्रह्मणे । नमः परब्रह्मणे। स्त्रीवेषधारी नट, नायकाविषयीं आपलें उत्कट प्रेम दाखवितो; परंतु आपण स्त्री नव्हे तर पुरुष आहों हें पूर्ण ज्ञान असल्यामुळें त्यास जसें खरें सुखदुःख काहींच होत नाहीं व या नायकाची मी नायिका असावें असें कधींही त्यास वाटत नाहीं. त्याचप्रमाणें प्रत्येक मनुष्यानें, आपला व्यवहार न सोडतां सर्व कर्में यथास्थित करावीं; परंतु या व्यवहारापासून मात्र नेहमीं अलिप्त असलें पाहिजे. अशी जी स्थिति तिलाच जीवन्मुक्तदशा ह्मणतात. सारांश स्रक्चंदन वनितादि भोगांत आसक्त होऊं नये. आणि इष्टप्राप्तीमुळें सुख व अनिष्टप्राप्तीमुळें दुःख मानूं नये.

असो, आतां आपण आपल्या नित्यनियमाप्रमाणें शिवार्चनाकरितां देवालयांत जावें. (प्रेक्षकांस उद्देशून)

श्लोक.

विविधविषयभोगभ्रांतचित्ताः शृणुध्वं
भवदुपकृतिहेतोः प्रब्रवीम्येतदुच्चैः ॥
सकलसुखसमीहापूरकः सेवकानां
पशुपतिरयमेकः सेव्यतां किं ततोऽन्यैः ॥ १ ॥
नमः परब्रह्मणे । नमः परब्रह्मणे । नमः परब्रह्मणे ।

(जातो.)

पडदा पडतो.

प्रवेश ९ वा.

स्थळः—स्मशानांतील पडकें शिवालय.

(कुसुमावती देवद्वारीं उभी असून बोलत आहे तों तपस्वी येऊन तिचें बोलणें ऐकत एकीकडे उभा राहतो.)

कुसुमावतीः—मी शंकराचे देवालयांत तर आल्येंच हें देऊळ अगदीं स्मशानांत असल्यामुळं व ह्या ठिकाणीं मनुष्याचं वारंही नसल्यामुळं किती तरी भयंकर दिसत आहे. मनुष्याचा काळ फिरला ह्मणजे त्याची दृष्टिही फिरते. ज्या वस्तूंपासून त्याला सुख होत असतं, त्याच वस्तु दुःखदायक वाटतात, व दुःखदायक असतात त्या सुखदायक वाटूं लागतात. ज्या या स्मशानाचं नुसतं नांव ऐकूनच अंगावर शहारे येत असत तेंच हें स्मशान मला आज माहेरघरासारखं वाटत आहे. (पदराखालीं लपवलेली कुपी बाहेर काढून) हें कृत्य आतांच्या आतांच उरकून घेण्याला ही वेळ फार चांगली आहे. (कुपी उघडून)

किती जाज्वल्य विष आहे हें ? जीव देण्याची तयारी मुद्दाम करूनही अशी व्हायची नाहीं. रात्र अगदीं मला फिरलेली वाटते. सगळी सृष्टि निद्रिस्थ झाल्यासारखी दिसते. (असें ह्मणून कांहीं वेळ थांबते.)

तपस्वी:—(आपल्याशीं) काय आश्चर्य आहे हें!!!

कुसुमा०—अग आतां उशीर कां ? प्राणहानी करणं धाडसावांचून होत नाहीं. हे जाज्वल्य विषा, तुला आतां माझी इतकीच प्रार्थना आहे कीं, माझ्या देहाचा आणि तुझा संयोग झाल्याबरोबर तूं आपला विलक्षण प्रताप दाखविण्यास चुकूं नयेस. माझ्यासारखीला आतां तुझ्याशिवाय दुसरा आधार नाहीं. पहातें आतां किती लवकर प्राणहरण करतेंस तें.

तपस्वी:—(आपल्याशीं) काय हो अज्ञान हें!

कुसुमा०—असो. आतां अंतकाळीं ईश्वरपार्वतीचं शेवटचं दर्शन घ्यावं. (असें ह्मणून देवाजवळ जाते.) हे माते अंबे, आतां या गरीब अबलेला आपल्या पायांशीं जागा दे. एवढीच तुला माझी शेवटची प्रार्थना आहे. (असें ह्मणून नमस्कार करिते.)

तपस्वी:—(आपल्याशीं) काय चमत्कार आहे पहा! मी पूर्वीं कृष्णातीरीं आश्रम बांधून राहिलों होतों त्या ठिकाणीं मला कामीजनांपासून त्रास होऊं लागला; ह्मणून मी ह्या जवळच्या पाहाडांत आश्रम करून राहिलों व या देवालयांत मध्यरात्रीं येऊन नित्यपूजा करण्याचा नियम ठेविला. अशा ठिकाणीं सुद्धां हीं मनुष्यें मला त्रास देण्यास चुकत नाहींत. (कुसुमावतीकडे पाहून) अथवा हीं

मनुष्यें कसलीं ? कारण जशीं मनुष्यास परमेश्वरानें, ज्ञानेंद्रियें दिलीं आहेत तशीं पशूंसही दिलीं आहेत; परंतु सारासार, विचारशक्ति ही अलौकिक देणगी पशूंस न देतां मनुष्यांसच दिली आहे तिचा दुरुपयोग करणारीं मनुष्यें पशूच होत. विचारशक्तीच्या योगानें परमेश्वराचें ज्ञान करून घेऊन ह्या भवबंधापासून मुक्त व्हावें तें सोडून उलट आत्मघातास प्रवृत्त होणें, ह्मणजे ईश्वरानें दिलेल्या विचारशक्तीचा दुरुपयोग करणेंच होय. तस्मात् असल्या देणगीचा दुरुपयोग करणाऱ्यास पुढील जन्मीं तो न्यायी परमेश्वर विचारशक्ति देईल काय ? छे ! ! ! ही गोष्ट कालत्रयींही घडणार नाहीं, तर तो असल्या अज्ञानी लोकांना पाषाणच बनवील. काय साहस हें !!! धिक्कार असो या मनुष्यांना ! ! ! (कुसुमावतीस उठावयास सांगूं लागतो.) (इतक्यांत रंभाजीराव प्रवेश करितो.)

रंभाजीरावः—(पुढें पाहून) हेंच तें स्मशानांतलें पडकें शिवालय, तर आतां आंत जाऊन तिचा शोध करावा. ती माझ्या भयानें कदाचित् अशा निर्जनठिकाणीं लपून बसली असेल. (थोडा पुढें होऊन व कानोसा घेऊन) आंत कोणी मनुष्यें बोलत आहेत असें वाटतें; बहुत करून तीच या ठिकाणीं कोणाजवळ बोलत असेल.

तपस्वीः—हे स्त्रिये, तूं आपल्या अज्ञानानें आत्महत्या करून ईश्वराचे करणीस दोष लावणारी अशी कोण आहेस ? व आत्महत्या करून घेण्यास कां प्रवृत्त झाली आहेस ?

रंभाजी०—(दुरून पाहून) होय खचित तीच ही, संशय नकोच (तीस उद्देशून) आतां बरी सांपडली आहेस !

तर आतांच्या आतांच मी आपली इच्छा या ठिकाणीं तृप्त करून घेतों. (असें ह्मणून तिच्याजवळ जातो.)

कुसुमा०—(रंभाजी येत आहे असें पाहून) महाराज, ज्याच्या त्रासानें मी जीव देण्यास तयार झालें तोच हा दुष्ट! ह्यानें आमचा सर्वस्वीं किंहो नाश केला. कपटानें द्यूतांत आमचें सर्वस्व हरण करून व मलाही जिंकून माझें पातिव्रत्य नष्ट करण्यासाठीं हा दुष्ट येथेंही आला.

रंभाजी०—(तपस्व्याकडे पाहून) अरे पण हा कोण? गोसावडा! (न्याहाळून) अं: कोणी कां असेना, आपल्याजवळ ही तरवार आहे. ह्या वेळीं साक्षात् काळ जरी हिचें रक्षण करण्याकरितां आला तरी हा रंभाजीराव आपली इच्छा तृप्त केल्याशिवाय कधींही राहणार नाहीं. (तरवार उपसून हळूहळू तपस्व्याचे जवळ जाऊं लागतो.)

तपस्वी:—(अंतर्ज्ञानानें जाणून) हा अधमा, या साध्वीचा तूं निरर्थक छळ केलास आणि मला मारण्याची इच्छा करितोस अं? (वर हात करून) तुला तुझ्या दुष्कृत्याबद्दल योग्य शासन मिळो. हे स्त्रिये! या ठिकाणीं आतां काय चमत्कार होईल तो पहा. (इतक्यांत मोठा अग्नि उत्पन्न होऊन त्यांत रंभाजीराव जळूं लागतो.)

रंभाजी०—हे साध्वी–मेलों–मेलों मी पुनः अशीं निंद्यकर्में कधींही करणार नाहीं. माझ्याप्रमाणें जे करतील त्यांचा असाच परिणाम होईल. जळालों ज–ज–जळलों–ज–ज–ज जळलों (मोठा उजेड पडतो.)

कुसुमा०—भोग मेल्या आतां आपल्या कर्मांचीं फळं.

तपस्वी:—हे स्त्रिये, मनुष्याला या जगांत जी जी बरी-

वाईट स्थिति प्राप्त होते ती ती त्याच्या पूर्वकर्मानुसार-असते. यासाठीं मनुष्यानें सदोदित आपलें सद्वर्तन ठेविलें पाहिजे. "प्रारब्धकर्मणां भोगादेव क्षयः" राजापासून तों रंकापर्यंत प्राचीनकर्म जें आहे तें भोगल्यावांचून सुटका नाहीं. देवादिकांनाही भोक्तृत्व भोगल्यावांचून सुटलें नाहीं मग मनुष्यांची कथा काय? ईश्वराकडे सर्व प्राणी सारखे मानिले जातात. आत्महत्या करणें हें महत्पाप आहे, जरी आत्महत्या केली तरी राहिलेलीं सर्व कर्मे पुढील जन्मांत भोगावीं लागतातच. आत्महत्या करणारे प्राणी उत्तमगतीस न जातां "अंधतामिस्रादि" नरकांत जातात.

कुसुमाव०—महाराज! आज आपण साक्षात् शंकरच अवतरून मला आपल्या चरणांचं दर्शन दिलंत, यामुळं मी कृतकृत्य झाल्यें.

तपस्वीः—बाई, प्रारब्धकर्म भोगल्यावांचून सरत नाहीं. तुला तुझे प्राचीनकर्मामुळें कांहीं काल अनिष्ट आलेला आहे; तो तुझा अनिष्टकाल सरेपर्यंत तूं माझे आश्रमांत राहशील तर मी तुझ्यावर कन्येप्रमाणें प्रेम करीन. येथून जवळच ह्या पाहाडांत माझा आश्रम आहे, त्या ठिकाणीं माझ्या आश्रमांतील हरिणी व हरिणबालकें यांच्याशीं तुझा समागम झाला ह्मणजे कांहीं कालानें तुझे मनांत पुत्रवात्सल्य उत्पन्न होईल. झाडून सारवून अगदीं स्वच्छ केलेल्या अशा माझ्या आश्रमांतील भूमिका पाहून तुला फार आनंद होईल व कांहीं कालानें तुला तुझ्या सर्व दुःखांचा विसर पडेल, तुझा आलेला हा अनिष्टकाल

सरला ह्मणजे तुझी व तुझ्या पतीची भेट होऊन तुह्मी उभयतां आनंदानें कालक्रमणा कराल.

कुसुमा॰—महाराज, आपण ह्मणतां तर आपली आज्ञा मला मान्य आहे. आजपासून मी आपली धर्मकन्या झाल्यें. माझी सर्व काळजी आपल्याला असावी.

तपस्वी॰—मुली, त्याविषयीं तूं काळजी करूं नको. हा समोर आम्रवृक्ष आहे त्याचे खालीं जाऊन तूं बैस. मी नित्यनियमाची शिवपूजा करून लवकरच येतों; मग आपण दोघेंही आश्रमांत जाऊं. (कुसुमावती जाऊन बसते.)

तपस्वी:—सर्व जगांत मनुष्यजन्म श्रेष्ठ आहे. ह्या जन्मास आलेल्या प्राण्यानें नेहमीं कामक्रोधादिक षड्रिपूंचें दमन करून इंद्रियें जिंकिलीं पाहिजेत व परमेश्वराची ओळख करून घेतली पाहिजे. असें असून हीं मनुष्यें कामक्रोधादि षड्रिपूंचे आधीन झालेलीं पाहून मोठा चमत्कार वाटतो. आह्मी तपस्वी, अरण्यांत राहणारे, वास्तविक आमचा जगाशीं कांहींएक संबंध नाहीं खरा; परंतु अज्ञानी मनुष्यांस दुःखमुक्त करणें हें एक आमचें कर्तव्यच आहे. असो. (आकाशाकडे पाहून) मध्यरात्रीचा समय झाला; तर आतां नैमित्तिककर्माकरितां जावें.

(देवाचे गाभाऱ्यांत जातो.)

(पडदा पडतो.)

अंक १ ला समाप्त.

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

स्थळः—भद्रावती नगरीच्या बाह्यप्रदेशावरील हिराबाग.

चंद्रसेनः—काय हा माझ्यावर घोर प्रसंग! ज्या नगरांत मीं नानातऱ्हेचें ऐश्वर्य भोगिलें; त्याच नगरांत माझी एका काडीइतकी सुद्धां कशावर सत्ता राहूं नये काय? मी बाहेर निघालों ह्मणजे माझ्याबरोबर हजारों स्वार, कित्येक पालख्या, हत्ती वगैरे मोठा लवाजमा असे. हजारों मानकरीलोक व माझे प्रजाजन मला मोठ्या अदबीनें मुजरे करीत असत; तेच लोक आतां मी रस्त्यांतून चाललों असतां नुसते माझ्याकडे ढुंकून सुद्धां पहात नाहींत. बरोबरच आहे. त्यांच्याकडे काय दोष! सर्व मान अधिकाराला आहे. मीच जर त्या दुष्ट रंभाजीरावाच्या नादीं लागलों नसतों, तर मला द्यूत खेळण्याचा हा घातक नाद तरी कशाला लागला असता. व माझें सर्व ऐश्वर्य कां लयास गेलें असतें! माझा प्रिय मित्र चक्रंभट व प्रिया कुसुमावती मला सदोदित बोध करीत असत. त्यांच्या सदुपदेशाचा मीं अव्हेर केला नसता; तर आज मजवर हा प्रसंग कां आला असता! (थोडा सचिंत बसून) देवा, नको हा जीव मला. मला या जगांतील सर्व वस्तूंचा अगदीं वीट आला आहे. धिक्कार असो या जगाला! जगाला कां ह्मणून जगानें काय केलें आहे! (स्मरण केल्यासारखें करून) माझी प्रिया आणि मी या (बागे-

कडे बोट दाखवून) आमच्या (दुःखानें जरा थांबून) "चंद्रसेना! शुद्धीवर आहेस ना पण! आतां तुझें स्वामित्व या जगांत कोठेंच राहिलें नाहीं." हिराबागेंत जलक्रीडेसाठीं येत असों. काय ती आनंदाची वेळ—गेले—गेले ते दिवस गेले. ह्या बागेंतील सहस्रधारी कारंज्याची मौज पाहण्यासाठीं माझी प्रिया व मी सायंकाळीं नित्यशः येथें येत असों. तिला तर माझ्यापेक्षांही त्या कारंज्याची फारच हौस वाटत असे. तीच ही बाग! आणि तेच हे माझे डोळे! पण माझें ऐश्वर्य व प्रिया कुसुमावती नाहींशीं झाल्यामुळें आतां तिच्याकडे पाहवत सुद्धां नाहीं. मीं हौसेनें बाळगलेले राघू, मैना, साळुंक्या इत्यादि पक्षी, मी त्यांचे अंगावरून गेलों ह्मणजे, नानातऱ्हेचे लडिवाळ व मंजूळ शब्द करीत असत. ते ऐकून माझ्या मनाला कितीतरी आनंद होत असे. असे मंजुळ शब्द आतां पुन्हां कोठून मिळणार मला ऐकायला. (जरा थांबून) एकेक गोष्टीचें स्मरण होऊं लागलें ह्मणजे काळजाला कसे घरडे पडतात!!! चंद्रसेना, गेली ती वेळ! गेली कसली? तूंच घालविलीस! प्रिये, तुझे ते काळेभोर विशाळ डोळे, पौर्णिमेच्या चंद्राला लज्जित करणारा तुझा मुखचंद्र, चांपेकळीपेक्षांही सरळ नासिका, तुझें तें मंद मंद चालणें, माझ्याकडे हर्षयुक्त पाहणें, हीं माझ्या मनाला कितीतरी आनंद देत असत. एखादे वेळीं आपण आनंदाचे भरांत असलों ह्मणजे तूं ह्मणत असस कीं, 'पण आपलें प्रेम मजवर सदोदित असेंच राहील ना' प्रिये, खरेंच किं ग मीं तुझ्या जवळ कपटाचरण केलें. शिवशिव!!! कोण ममता ही!

त्या ममतेचा परिणाम म्यां दुष्टानें हा असा करावा ना! मीं त्या दुष्ट रंभाजीरावाच्या नादीं लागून सर्वस्व तर घालविलेंच व शेवटीं प्रिये, तुलाही द्यूताला लावून हरविलें!!! हल्लीं तूं कोणत्या ठिकाणीं असशील, त्या दुष्टानें तुझी स्थिति काय केली असेल, कांहीं कळत नाहीं. प्रिये, अग, माझ्यासारखी कठोर हृदयाची तूं नाहींस. हे स्त्रीघातक्या चंद्रसेना, ईश्वर तुझें कधींही कल्याण करणार नाहीं. तुला ह्या तुझ्या दुष्टकृत्याबद्दल घोर नरकवास भोगावा लागला तरी तीही शिक्षा फार थोडी आहे. (कांहीं वेळ थांबून व विचार करून) चंद्रसेना, तुझी प्रिया गेली, गेली कसली, तूंच घालविलीस! याबद्दल तुला दुःख होणें साहजिकच आहे. कारण जग हें मायेनें बद्ध आहे. पण तूंच विचार कर. तुझी प्रिया जरी गेली असली अथवा मेली असली तरी ही कांहीं मोठी चमत्कारिक गोष्ट झाली असें नाहीं. आज ह्मणा, अगर शंभर वर्षांनीं ह्मणा जो प्राणी जन्मास आला त्याला मृत्यु ह्मणून आहेच. एकानें मरावें आणि दुसरा मागें राहील त्यानें कांहीं काल पर्यंत शोक करावा अशी जगाची चालच आहे. परंतु वारंवार त्याबद्दल दुःख करणें तुझ्यासारख्याला योग्य नाहीं. आज आजा मेला, उद्यां बाप मेला, परवां मामा मेला, कांहीं कालानें आपल्यावरही हीच वेळ येणार! असें असून मनुष्यांनीं वेड्यासारखें रडत बसणें ह्मणजे ईश्वराचे करणीस दोष ठेवणें होय. यासाठीं हा निरर्थक शोक पुरे कर. (जरा थांबून) मी शुद्धीवर आहें का पण! का स्वप्नांत बडबडतों आहें.

नाहीं—मी खचीत शुद्धीवर आहें. हे जगदीशा तुझी करणी अघटित आहे!!! मी जगांतील सर्व सुखदुःखांचा अनुभव घेऊन चुकलों आहें. मला आतां कोणत्याही गोष्टीची इच्छा राहिली नाहीं. तर आतां आपण सर्व संग परित्याग करून या जगामध्यें काय काय अलौकिक चमत्कार आहेत ते पहाण्याकरितां मोठमोठीं वनोपवनें व देशोदेश पर्यटण करण्याकरितां जावें. (जातो)

(पडदा पडतो.)

प्रवेश २ रा.

स्थळः—एक मार्ग.

चक्रंभटः—(तपकिरीची डबी हातांत घेऊन व तपकीर ओ-) मी आज कित्येक दिवसपर्यंत त्या महासाध्वीचा ाणि त्या चंद्रसेनाचा शोध करण्यासाठीं वणवण करीत न ताहान मनांत न आणतां फिरत आहें. परंतु त्यां-ा कोणीकडेच शोध लागत नाहीं. मला असें वाटतें ां, त्या साध्वीला जर तो दुष्ट रंभ्या तिचें पातिव्रत्य नष्ट करण्यासाठीं त्रास देऊं लागला तर ती बिचारी आत्महत्यासुद्धां करील. ती महा पवित्र आहे. स्त्रियांचा मुख्य धर्म ह्मटला ह्मणजे पातिव्रत्य रक्षण करणें; तें राखण्यासाठीं हे साध्वी, तूं जरी देहत्याग केला असलास तरी तें तुला भूषणच आहे. स्त्रियांनों, तुह्मांस या चंद्रसेनासारखे पति मिळाले ह्मणजे तुमचेवर अनेक संकटें आल्यावांचून कधींही रहावयाचीं नाहींत. तरी अशा संकटकालीं तुह्मीं आपलें पातिव्रत्य रक्षण करा बरें! तोच तुमचा स्वधर्म होय. त्यांतच तुमचें ईश्वर कल्याण

करील. आणि सर्वांसही हाच नियम लागू आहे कीं, ज्यांनीं त्यांनीं आपल्या धर्माप्रमाणें वागावें; ह्मणजे त्यांत सदोदित त्यांचें कल्याण होईल. उदरदरीच्या पूर्तिकरितां मी या चंद्रसेनाच्या आश्रयास राहिलों, ह्मणून मला आज हीं दुःखें भोगावीं लागत आहेत. (डोळ्यांस पाणी आणून) आतां माझें वय का आहे, असे हाल सोसण्याचें! परंतु करणार काय? मूर्खांच्या संगतीपासून हे असेच परिणाम! असो. मला तरी आतां कोठें प्रपंच करावयाचा आहे. तर आपण आतां या जगांत सनातन वैदिकधर्माचा उद्धार करण्यासाठीं उपदेशक होऊन या रावें, ह्मणजे झालें. (जातो.)

(पडदा पडतो.)

प्रवेश ३ रा.

स्थळः—भयंकर अरण्य.

वेषधारी बैरागीः—मी बैरागी बनून निघाल्यापासून एकसारखा फिरत आहें. यामुळें अगदीं दमून गेलों आहे. देवा, एकंदर तुझी लीला अगाध आहे. जगांतील जें जें स्थळ पहावें तें तें नवीन व चमत्कारिकच दिसतें. ही सृष्टि निर्माण करण्यांत तुझी किती तरी कुशलता व्यक्त होते. असो. ही रात्रीची वेळ आहे तर आपण ह्या पुढच्या एखाद्या झाडाखालीं रात्रीचीरात्र विश्रांति घेऊन उदयीक पुढें जाऊं. ऑहा-ह्रख, ऑहा-ह्रख, ऑहा-ह्रख (असें बोलून एका झाडाखालीं जाऊन बसतो व कांहीं वेळ थांबून) ही मध्यरात्रीची वेळ किती भयंकर आहे! मनुष्याला

मनुष्यसुद्धां दिसण्याची पंचाईत, इतका मिट्ट काळोख पडला आहे. व्याघ्र, सिंहादिक हिंस्त्र पशु, आपआपले गुहेंतून बाहेर पडण्याची वेळ हीच! शंखिनी, डंखिनी, समंध, भुतें, ब्रह्मराक्षस वगैरे आपआपलीं ठिकाणें सोडून स्मशानांतून व गांवांतून प्राण्यांना त्रास देण्यासाठीं निर्भयपणें फिरण्याचा समय हाच! चौर्यकर्म करणाऱ्या महादुष्ट व घातुक लोकांची शहरांत फिरण्याची वेळ हीच! ह्या वेळीं झाडाचें पानसुद्धां हालत नाहीं. ही वेळ कितीतरी भयंकर दिसते!! (स्मरण झाल्यासारखें करून) ज्या माझ्या महालाभोंवतीं कोणी परशत्रु येईल किंवा माझे जिवास कांहीं धोका येईल ह्मणून हजारों हत्यारबंद संत्री लोकांचा पाहारा असावयाचा, त्या मला ह्या अशा निर्जन अरण्यांत एकटें राहण्याची पाळी यावी अँ? अथवा आतां माझे सभोंवतीं पाहाऱ्याची तरी गरज काय? कारण तो पाहारा माझ्याभोंवतीं नव्हता, तर माझ्या अधिकाराच्या—(असें ह्मणून स्तब्ध बसतो. इतक्यांत एक विलक्षण पिशाच आल्यासारखा भास होतो.) काय चमत्कार आहे. मी या ठिकाणीं बोलत बसलों आहें, इतक्यांत हा विलक्षण प्रकार काय झाला बरें? इकडे कोणी आल्याचा भास झाला. परंतु इकडे तिकडे पाहूं लागलों तों कांहीं नाहीं. कोणी पिशाच तर नसेलना? कोणी कां असेना आपलें काय करणार?

(इतक्यांत पुन्हां पिशाच प्रवेश करितें.)

पिशाच (इकडे तिकडे फिरून उभें राहतें.)—

वे०बै०—(पिशाचाकडे पाहून) पुन्हां हा विलक्षण

प्रकार काय बरें ! हा प्राणी कितीतरी भयंकर दिसतो, असो. हा आतां पुढें काय करतो तें पाहूं.

पिशाच (हळू हळू पुढें येऊं लागतें)—

वे०बै०—हा मजकडेसच येत आहेसा वाटतो; काय बरें याचा उद्देश असावा ? काय असेल तो असो. हे महापुरुषा, तुला कोणत्याही प्रकारची भाषा येत असेल तर तूं आपली सर्व हकीगत मला सांग.

पिशाच (कांहीं न बोलतां मागें जाऊं लागतें.)—

वे०बै०—हे महापुरुषा, तुला दत्तमहाराजांच्या पायांची शपथ आहे. अरे, असा मागें मागें कां जातोस ? तूं कोणीही असलास आणि कशाही इच्छेनें आला असलास तर मजपुढें येऊन व कांहीं वेळ उभा राहून निमूटपणें मागच्यामागें जात आहेस; हें चांगलें नव्हे. तुझा काय हेतु असेल तो तूं स्पष्टपणें सांग. अगदीं भिऊं नकोस —

पिशाचः—(आपल्याशीं) अरे, हा तर चंद्रसेनच दिसतो. काय संकट हें ? आतां ह्याच्याजवळ काहींएक न बोलतां जावें तरी पंचाईत. करावें काय ? (विचार करून) असो, जें होईल तें होवो. यास आपली सर्व हकीगत सांगून याजवर आतां आपल्या हातून होईल तितका उपकार करावा; एवढेंच या पिशाचयोनींत आपल्या स्वाधीन आहे. (उघड)—काय सांगूं बाबा, मीं जिवंत असतांना अनेक प्रकारचीं निंद्य व घातुक कर्में केलीं होतीं. चंद्रसेन नांवाच्या मोठ्या बलिष्ठ राजाशीं मीं सख्य करून त्याला द्यूताचा इतका नाद लावून दिला कीं, तो राजा बिचारा नीतिमान् असतांही त्यानें आपलें सर्वस्व

घालविलें. पुढें त्याचे जवळ फक्त त्याची धर्मपत्नी मात्र राहिली होती; तिलाही मीं पणास लावविली. अशीं किती घोरकृत्यें केलीं आहेत ह्मणून सांगूं !

वे०बै०—(दुःखित होऊन व थोडा एकीकडे वळून आपल्याशीं) हे साध्वि, तुझी काय वाट झाली असेल, ती होवो ! मी तर खाटिकापेक्षांही खाटिक बनलों. हे दुष्टा, तुला तुझ्या कर्माप्रमाणेंच फळ मिळत आहे. (उघड)—पुढें तो राजा कोणीकडे गेला ?

पिशाचः—(आपल्याशीं) हा समजून उमजून विचारीत आहे, तर आपणही याला तसेंच उत्तर दिलें पाहिजे. (उघड)—तो राजा सर्व ऐश्वर्याला मुकून बिचारा कोठें गेला किंवा काय झालें तें मला सांगतां येत नाहीं.

वे०बै०—बरें पण त्या स्त्रीचें पुढें काय झालें ?

पिशाचः—तिचें पातिव्रत्य नष्ट करावें या हेतूनें मी तिला शोधूं लागलों, तों ती नगराबाहेरील स्मशानांतल्या शिवालयांत गेली होती. मीही तिचा शोध करीत तेथें गेलों. तों तिला एका साधूची भेट झाली होती. मी त्या साधूच्या समक्ष तिच्यावर बलात्कार करण्यास प्रवृत्त झालों; तेव्हां त्या साधूच्या तपोबलानें एकाएकीं मोठा अग्नि उत्पन्न होऊन त्यामध्यें मला कोणीं उचलून टाकून द्यावें ह्याप्रमाणें मी जाऊन त्यांत धाडकन पडलों व जळून खाक झालों. तेव्हां मला यमदूतांनीं यमलोकास नेलें. यमलोकास नेतांना मला जीं दुःखें व यातना सोसाव्या लागल्या त्यांचें वर्णन सुद्धां करवत नाहीं.

वे०बै०—(आपल्याशीं) अशीं दुष्ट कृत्यें करतांना मात्र

या अधमाला वाईट वाटलें नाहीं मग आतां कां वाईट वाटावें ! (उघड)—बरें पुढें काय झालें ?

पिशाचः—मला या पिशाचयोनींत घातलें ह्मणून पुढें त्या साध्वीचें काय झालें तें मला माहीत नाहीं.

वे०बै०—हे पिशाचा, अजूनही तुला दुसरा एखादा किंवा तोच चंद्रसेन मिळाला तर त्याला फसविण्याचें कसब तुझ्या अंगांत आहे का विसरलास ?

पिशाचः—(खालीं मान घालून) तोच तूं चंद्रसेन हें मीं जाणलें आहे. आतां उगीच दुःखावर डाग देऊं नको. अरे मीं तुझा सर्वस्वीं घात केला, त्याचीं हीं फळें मी भोगीत आहें व अजून पुढेंही भोगावयाचीं आहेत. परंतु आतां तुझें कांहीं काम माझ्या हातून होण्यासारखें असल्यास सांग. तें मी मोठ्या आनंदानें करीन.

वे०बै०—हेंच जर खरें असेल तर तूं माझा याचक्षणीं प्राण घे; ह्मणजे माझ्या सर्व दुःखांचा नाश होऊन, मी उलट तुझा फार आभारी होईन.

पिशाचः—छिः छिः छिः असें बोलूं सुद्धां नकोस. एक जन्म केलेलें पातक हल्लीं मी भोगीत आहें. अरे या योनींत दिवसा विस्तवांत पडून असावें व रात्रीं मात्र बाहेर पडावें. कांहींएक खाण्यापिण्यास मिळत नाहीं. कोणास त्रास दिला तर त्याजकडून नेहमीं शिव्या व शाप मिळतात. त्यामुळें पुन्हां पातकाचाच संचय होतो. तर आणखी असें घोर पातक करून कोठें भोगूं ? मीं तुला फार दुःख दिलें त्याचें निरसन करण्याचें या पिशाचयोनींत माझे हातीं कांहीं नाहीं; परंतु येथून जवळच एक

ओसाड मठ आहे, त्यांत खडावांचा एक जोड आहे तो तूं घे. त्या खडावा तुला फार उपयोगीं पडतील.

वे०बै०—(आपल्याशीं) मला आतां कांहींएक कर्तव्य उरलें नाहीं. मग या खडावांचा मला काय उपयोग? (स्मरण केल्यासारखें करून) ह्या खडवांच्या अंगीं कांहीं विलक्षण गुण असून त्या कदाचित् माझ्या प्रियेची भेट होण्याचे कामीं उपयोगीं पडतील; असें तर नसेलना? (उघड)—अरे त्या खडावांच्या अंगीं असा विलक्षण गुण काय आहे?

पिशाचः—त्या खडावा पायांत घालून तूं जें स्थळ मनांत आणशील, त्या स्थळीं मनोवेगानें त्वरित जाशील. (इतकें बोलून पिशाच मागें जाऊन नाहींसें होतें)

वे०बै०—पिशाच्चानें सांगितल्याप्रमाणें त्या खडावा घेऊन माझी प्रिया कोठें असेल तेथें जावें. ह्या पिशाचाचे सांगण्यावरून ती अजून जिवंत असावी असें वाटतें. अशा संकटकालीं ती कोठें बरें गेली असेल? (थोडा विचार करून) बहुतकरून ती अशा दुःखस्थितींत आपल्या मातुलगृहीं गेली असेल. दुसरीकडे कोठें जाणार? तर आतां त्या खडावा घेऊन त्या ठिकाणीं जावें देवाच्या दयेनें तिची भेट होणार नाहीं ह्मणून कशावरून?

(जातो)

(पडदा पडतो)

प्रवेश ४ था.

स्थळः—(पहाडांतील तपस्व्याचा आश्रम आजूबाजूस हरिणबालकें बागडत आहेत.)

कुसुमा॰—काय बाई नशीब तरी! जी मी रेशमी मऊ रुजाम्यावर नेहमीं बसणारी, माझ्या सभोंवती किती तरी दासदासी असावयाच्या, वर्षावर्षांत सुद्धां राजवाड्याच्या बाहेर पडणें मला कसें तें माहीत नव्हतं; ती मी या अरण्यांतील तपस्व्याचे आश्रमांत या हरिणबालकांमध्यें राहून दिवस काढीत आहें. माझी ह्मणजे अशी स्थिति होईल असं कोणाच्या ध्यानींमनीं तरी होतं का? पण तेंच आज भोगण्याची माझ्यावर वेळ आली आहे. मनुष्यासारखं राक्षस कोणी नाहीं असं ह्मणतात तें कांहीं खोटं नव्हे. जे जे प्रसंग मनुष्यावर येतात, ते ते सुखानें ह्मणा, अगर दुःखानें ह्मणा; मनुष्य आपलं कंठित असतं. परंतु मनुष्यस्वभावच असा कांहीं चमत्कारिक आहे कीं, त्याला थोडेंसं ऐश्वर्य प्राप्त झालं ह्मणजे तो लागलाच चढून जातो व आपली पूर्वस्थिति विसरतो. परंतु मनुष्यानें असं न करितां सदोदित ऐश्वर्य अस्थिर आहे असं ध्यानांत ठेवून जगाशीं आपलं वर्तन लीनतेचं ठेवलं पाहिजे. कारण कालचक्रामुळं घटकेंत रावाचा रंक व रंकाचा राव होतो. माझीच स्थिति पहाना? मी राजपत्नी, परंतु आज या आश्रमांत वनचराप्रमाणें कित्येक दिवस काढीत आहें व अद्याप किती काढायचे आहेत कोणाला ठाऊक? (थोडा वेळ सचिंत बसून) मी जर या स्थितींतच सुख मानून राहिलें तर हा माझा सगळा जन्म

असाच आश्रमांत राहण्यांत निघून जाईल व माझ्या सर्व इच्छा मनांतल्यामनांत राहून इतके दिवस भोगिलेलं दुःख सर्व निष्फळ होईल. तर याला काय करावं मला किंनई कांहीं सुचत नाहीं. (थोडा वेळ विचार करून) मनुष्याला विपत्ति प्राप्त झाली ह्मणजे त्याचं मन अगदीं विचारशून्य बनतं. मला हा प्रत्यक्ष चिंतामणी सांपडला असून मीं वेड्यासारखी काळजी कां करावी? आज कित्येक दिवसांत तिकडची व माझी भेट नाहीं. देवा, तिकडे माझ्यावांचून एक घटकाभरही करमत नसे. आणि आतां काय स्थिति झाली असेल; कोण जाणे. तर एकवार प्राणनाथ कोठें आहेत, माझी व त्यांची भेट होईल कीं नाहीं, अद्याप माझें भोक्तृत्व किती दिवस आहे, वगैरे सर्व मी आज महाराजांना विचारितें. एकवार ती सुंदर मूर्ति पाहून नेत्रांचं नुसतं समाधान तरी करून घ्यावं, अशी मला फार इच्छा उत्पन्न झाली आहे. महाराजांची स्नानसंध्या आटपण्याची वेळ झाली आहे, तर आल्यावर सर्व हकीगत त्यांना विचारावी मग आपले नशिबांत काय असेल तें खरं.

(इतक्यांत तपस्वी स्नानसंध्या आटोपून आश्रमांत येऊन बसतो)

कुसुमा०(तपस्व्यास नमस्कार करिते)

तपस्वीः—(अशीर्वाद देऊन) मुली, आज तुझी चित्तवृत्ति अशी अगदीं उदासीन झालेली कां दिसते?

कुसुमा०—बाबा, मला या आश्रमांत कांहीं कमी नाहीं. हीं हरिणबालकं मला माझ्या पाठच्या भावंडांप्रमाणं वाटत आहेत. हे आश्रमासभोंवतालचे वृक्ष मला

पोटच्या मुलांपेक्षांही अधिक प्रिय वाटतात. आणि मला असं वाटतं कीं, मी खरोखर आपल्या माहेरींच आहें. व आपण प्रत्यक्ष माझ्या बापापेक्षांही मला जास्त आहां; परंतु विवाहित कन्येनें माहेरीं फार दिवस राहणं तिला व तिच्या बापालाही चांगलं नाहीं. यासाठीं बाबा अझून माझं प्रारब्धकर्म मला किती दिवस भोगायचं आहे. व हें वियोगदुःख मला अजून किती दिवस कंठायचं आहे, हें सर्व कळावं अशी माझी प्रार्थना आहे. ज्यापेक्षां मी आपली धर्मकन्या आहें, त्यापेक्षां माझ्या या बोलण्याचा राग आपणास येणार नाहींच. मुलांचे इष्ट सद्धेतु आईबापांनीं जर पुरवले नाहींत तर दुसरे कोण पुरवितील ?

तपस्वीः—(थोडा वेळ स्तब्ध बसून व डोळे मिटून) मुली, अद्याप तुझा प्रारब्धभोग संपण्याला अवधी आहे. परंतु अंतर्ज्ञानानें मला समजलें आहे कीं, तुला तुझ्या पतीच्या भेटीची फारच उत्कंठा झाली आहे, तर ही आंगठी घे. (दर्भाची आंगठी विणून मंत्रून तिच्या हातांत देतो) हिच्या योगानें तूं तुझा पति असेल तेथें जाशील. मात्र प्रारब्धभोग संपल्याशिवाय तूं या रूपानें त्याचे दृष्टीस पडणार नाहींस. तुझे मनांत जशा रूपानें तूं दिसावीस असें असेल त्याच रूपानें सर्वांस दिसशील.

कुसुमा०—बाबा, आज मी कृतकृत्य झालें (नमस्कार करिते) मला आतां आज्ञा असावी.

तपस्वीः—वत्से, खरोखर मी बालब्रह्मचारी, स्त्रीसंसर्ग कसा तो मला मुळींच ठाऊक नाहीं. मग अपत्यसुख व

संसारसुख कसें असतें हें कोठून ठाऊक असणार? तुझा माझा थोडेच दिवसांचा स्नेह, परंतु तुझें हें वियोगदुःख माझें हृदय पोळीत आहे, व स्नेह सोडवत नाहीं. तस्मात् ईश्वराची माया मोठी अगाध आहे. मनुष्याचें मन मायामोहांत कसें गुंगतें याचा मला आज पूर्ण अनुभव आला. असो. मुली, तूं ह्मणतेसच तर मी तुला आज्ञा देतों—कारण उघडच आहे कीं, मुलीचा एकदा विवाह झाला ह्मणजे तें दुसऱ्याचें धन झालें. मग मुलीवर आईबापांची सत्ता रहात नाहीं. अस्तु. अद्याप कांहीं काल तुला अनिष्ट आहे. कशीही वेळ आली तरी धैर्य सोडूं नको. आपल्या पतीवर निष्ठा ठेवून रहा. त्यांतच तुझें ईश्वर कल्याण करील. ही आंगठी तुझे जवळ आहे तोंपर्यंत तुला भूत, प्रेत, पिशाच, वगैरे कोणापासूनही पीडा होणार नाहीं, आणखी सांगतों तुझ्यावर एखादा तसाच दुर्धर प्रसंग आला तर माझें स्मरण कर, ह्मणजे मी तुला दर्शन देईन. ज्यावेळीं ह्या आंगठीचें रूपांतर होऊन ही सुवर्णाची होईल; त्यावेळीं हिच्या आंगचे सर्व गुण नाहींसे होतील व तुझा अनिष्ट काल सरला असें समज आणि ही आंगठी माझें स्मरण ह्मणून नेहमीं तुझे हातांत असूंदे. कांहीं काळजी करूं नकोस.

कुसुमा०—(दुःखानें) बाबा, खरोखर आज मला प्रत्यक्ष पित्याच्या घरून प्रथम सासरीं जाण्याचे वेळीं झालेल्या दुःखापेक्षांही शतपट अधिक दुःख होत आहे. मला आपण ही आंगठी दिली यामुळें, माझ्या पतीचा व माझा नवीन विवाहच आपल्या हातून झाला असें मी समजतें.

देव पुन्हां कधीं या ठिकाणीं आणील आणि आपल्या पायांचें दर्शन होईल तें होवो. (रडूं लागते)

तपस्वीः—मुली गमनसमईं रडूं नये असें शास्त्र आहे. तुझी व तुझ्या पतीची भेट होऊन तूं पुन्हां पहिल्यासारखी आनंदांत पडलीस ह्मणजे तुला हिकडची आठवण तरी होईल का ?

कुसुमा०—बाबा, मी आपल्याकडून रडणें किती तरी आवरून धरितें, पण आपला व माझा कांहीं वेळानें वियोग होणार ह्मणून तें आवरतच नाहीं. त्याला काय करूं ? (हळु हळु चालूं लागते.)

तपस्वीः—वत्से, डोळे पूस बरें; उगी. असें दुःख करूं नको जा.

कुसुमा०—(रडत रडत) बाबा, माझ्यानें हें वियोगदुःख कसें सहन होईल ? पुन्हां आपलें मला कधीं दर्शन द्याल ? या धर्मकन्येची आठवण सदोदित राहील ना ? कारण मनुष्य एकदां लांब गेलें व बरेच दिवस झाले, ह्मणजे मागची आठवण कमी होत जाते. ह्मणून ह्मणतें कीं माझी स्मृति नेहमीं असूं द्या. आजपर्यंत माझ्यावर जसें प्रेम ठेवलेंत तसेंच सदोदित रहावें हीच वारंवार माझी प्रार्थना आहे. येतें बरं आतां (आपल्याशीं) अग बाई! आश्रमांतून माझा पाय उठतच नाहीं. (कांहीं पुढें जाऊन पुन्हां मागें मुरडून पाहून) येतें बरं बाबा !

तपस्वीः—(दुःखानें) मुली, ये बरें आतां ईश्वर तुझें कल्याण करील.

(कुसुमावती हळु हळु मागें पहात पहात निघून जाते)

तपस्वी:—गेली, दिसेनाशी झाली. (दुःखित होतो व कांहीं वेळ विचार करून)

श्लोक

"ज्ञानिनामपि चेतांसि देवी भगवती हि सा ॥
बलादाकृष्य मोहाय महामाया प्रयच्छति ॥ १ ॥"

मायेचा पसारा मोठा कठीण आहे. जगांतील सर्व सांसारिक प्राण्यांना मायेनें कसें अगदीं व्यापून टाकिलें आहे. वास्तविक पाहतां हें सर्व मृगजलवत् आहे. खरें कांहींच नाहीं. ज्याप्रमाणें, उदकावर एका क्षणांत अनेक बुडबुडे उत्पन्न होऊन ते एका ठिकाणीं मिळून कांहीं कालानें लागलेच नाश पावतात; तशी या जगाची स्थिति आहे. परंतु असें ज्ञान होणें फार कठीण आहे. मी एवढा विरक्त झालेला परंतु दोन दिवसांच्या स्नेहपाशांत गुंतल्यामुळें मीही या मायेच्या सपाट्यांत सांपडून भ्रमिष्ठ बनलों होतों. मग गृहस्थाश्रमी लोक, मायेनें बद्ध होतील यांत काय नवल ? असो माझें मोठें सुदैव, ह्मणून लवकरच मी मायापाशांतून सुटलों. नमः परब्रह्मणे—नमः परब्रह्मणे—नमः परब्रह्मणे. ह्या स्त्रीचें प्रेम आपल्या पतीवर किती तरी जडलेलें आहे ? पण ही स्त्री नाहींशी झाल्यापासून त्याचें हिच्यावरचें प्रेम कमी होऊन हल्लीं दुसऱ्याच एका स्त्रीवर गुंतलें आहे. एकंदर स्त्रीजात फार दयाळु आणि गरीब. खरोखर स्त्री ह्मणजे ममतेचें केवळ माहेरघरच! असें ह्मणतात तें अगदीं खरें आहे. अस्तु. ईश्वर हिला संकटांतून पार पाडून लवकरच आनंदाचे दिवस दाखवील. (आकाशाकडे पाहून) आज माझ्या

नैमित्तिक कर्मांची वेळ टळून गेली; तर आतां ईश्वराराधन करण्यास जावें. नमः परब्रह्मणे—नमः परब्रह्मणे—नमः परब्रह्मणे (जातो)

पडदा पडतो.

अंक २ रा समाप्त.

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

स्थळः—पर्वतांतील गुहा.

(वेषधारी बैरागी प्रवेश करितो)

वे०बै०—मी त्या पिशाचानें दिलेल्या खडावा घेऊन प्रियेच्या शोधाकरितां निघालों. प्रथम तिच्या मातुलगृहीं तिचा शोध केला. पण त्या ठिकाणीं शोध लागला नाहीं; ह्मणून दुसऱ्या पुष्कळ ठिकाणीं शोध केला. परंतु शोध ह्मणून लागत नाहीं. तिची अवस्था काय झाली असेल कोण जाणे ? असो. आतां गतगोष्टीबद्दल उगीच विचार करीत बसून काय उपयोग ? (इतक्यांत कुसुमावती आकाशपंथानें उतरते, व बैराग्याचें बोलणें ऐकत उभी राहते. पण आंगठीच्या प्रभावानें त्यास ती दिसत नाहीं.)—ह्या जगामध्यें ईश्वरानें कनक आणि कांता ह्या दोन वस्तु मोहक ह्मणून उत्पन्न केल्या आहेत. त्यांची इच्छा ह्मणजे कोणाला नाहीं, असा मनुष्य जगांत सांपडणें फार कठीण. खरोखर कनकाचें मला कांहींच वाटत नाहीं; मलाचसें काय ? पण माझ्यासारखे कनकाची पर्वा न

करणारे मनुष्य जगांत किती तरी असतील. स्त्रीजातीच्या अंगीं असा कांहीं विलक्षण गुण ठेविला आहे कीं, त्यांच्याकडे दृष्टि जातांच मोह उत्पन्न होतो. त्यांचें तें ठुमकत ठुमकत चालणें, कोणाच्या ध्यानांत न येईल अशा नेत्रकटाक्षांनीं हळुच पाहणें, गालांतल्या गालांत अस्पष्ट हंसणें, लाजणें इत्यादि गोष्टी त्यांचे अंगांत कशा अगदीं भिनून गेलेल्या असतात. ह्या स्त्रिया खरोखर कामाच्या तरवारी आहेत. परंतु तलवार एखाद्याला मुद्दाम मारल्याशिवाय ती वार करीत नाहीं, पण ह्या तलवारी तशा नाहींत. तर, ह्यांच्याकडे पाहिल्याबरोबर आपोआपच वार होऊं लागतात. ह्यांचा वार दिसायचा नाहीं, दुसऱ्याला कळावयाचा नाहीं; पण ज्यांच्यावर ह्यांचा वार होईल, त्यांचीं शंभर वर्षें पुरीं भरलींच ! तशी हल्लीं माझी अवस्था झाली आहे.

कुसुमा०—(आपल्याशीं.) मी एवढा वेळ असं समजत होतें; कीं हें चाललेलं बोलणं माझ्या विरहामुळं झालेल्या पश्चात्तापाचं असेल, पण बाई हें कांहीं निराळंच लक्षण दिसतं. एकक पाहवं तें आपलं नवलच ! !

वे०बै०—काल मी स्नानाकरितां गंगेवर गेलों होतों. त्या वेळीं या देशच्या राजाची कन्या आपल्या सख्यांसह तेथें स्नानासाठीं आली होती. माझी नजर सहज तिच्यावर गेली. अहारे सौंदर्य ! तिचें तें सौंदर्य पाहून माझें मन अगदींच चंचल होऊन गेलें आहे. काय सौंदर्य तरी स्त्रीजातींत असतें हें ! सर्व अवयव कसे जागच्या जागीं अगदीं रेखूनच काढिले आहेत. मला असें वाटलें

कीं विधात्यानें आपलें सगळें कौशल्य हिला निर्माण करण्यांतच दाखविलें आहे.

कुसुमा०—वाहवारे पुरुषांची जात !!! चांगलं ! असो. पुढं चालूं द्या.

वे०बै०—मी तिला पाहिल्यापासून कसा अगदीं भ्रमिष्ट झालों आहें. ती सुंदरीही जातांनां एकसारखी मजकडे पहात हळुहळू चालली होती. यावरून मी जसा तिच्याविषयीं आतुर झालों आहें, तसेंच तिचेंही मन माझ्यावर गुंतलें असेल असें तिच्या चर्येवरून खास वाटतें. परंतु-बिचारी करणार काय ? बरोबर तिच्या सख्या होत्या; ह्मणून ती तशीच मोठ्या संकटानें गेली असावी. मी सर्वसंग परित्याग करून निघालों खरा. पण ते माझे सगळे विचार आतां एकीकडे राहिले. ती सुंदरी जर मला न मिळेल तर मी खचीत वांचणार नाहीं. ईश्वर करील आणि योगायोग असेल तर मी हल्लीं तरुण आहें.

कुसुमा०—(आपल्याशींच.) वाहवा ! खासें ! एकूण दुसऱ्या लग्नाचीही तयारी झालीना ?

वे०बै०—व तीही तरुणी आहे. व मीही मुळचा राजपुत्रच आहें यासाठीं मी त्या सुंदरीशीं विवाह करीन. मग माझ्यासारखा भाग्यवान् या जगांत मीच. अहाहा ! हे सुंदरी, तूं खरोखर धन्य आहेस. (थोडा वेळ विचार करून) परंतु ही गोष्ट व्हावी कशी ? ती पडली राजकन्या; तिचें नख तरी माझ्या दृष्टीस कशानें पडणार ? मी तर हल्लीं अशा स्थितींत आहें. काय करावें, कांहीं विचार सुचत नाहीं. (सचिंत बसतो.)

कुसुमा०—(आपल्याशीं.) काय पुरुषांची जात तरी ही ! ! ! आह्मां स्त्रियांचा लहानपणीं विवाह झाला ह्मणजे, तेव्हांपासून प्रत्यक्ष ज्या आईबापांनीं आह्मांला जन्म दिलेला असतो, व जन्मापासून ज्यांचं आमच्यावर अलोट प्रेम असून ज्यांनीं आह्मांला लहानाच्या मोठ्या केल्या ! अशा आईबापांनाही सोडून आह्मी आपल्या पतीच्या गृहीं येऊन राहतों. मग तो पती चांगला असो, दुष्ट असो, शहाणा असो, अथवा मूर्ख असो; आह्मी आपलं सर्व तन मन धन त्याला अर्पण करितों. इतकेंच नव्हे, तर आमच्या सर्व जीविताचाही मालक तोच होतो. सासवा आमचे कितीही हाल करोत, कशाही रीतीनें वागवोत, परंतु तोंडावाटे 'ब्र' तरी काढायचा आहे का ! छे ! नांव कशाला ! उलटं आमच्या सर्व प्रीतीचें माहेरघर काय तें आमचे पती, असें आह्मांला वाटत असतें, व त्याप्रमाणें आह्मी आपल्या पतीशीं मोठ्या भरंवशानें वागत असतों, आणि आमच्याविषयीं त्यांचे विचार पाहिले तर ते आपले भलतेच. पहिलीपेक्षां दुसरी एखादी चांगली मिळाली ह्मणजे पहिली बिचारी कशीही असो; पडल्याच तिच्यावर माशा ! ! ! खरोखर किती कृतघ्नता ही ! हें केवळ पुरुषजातीला मोठें लांछनच आहे. यांनां भ्रमराची उपमा कांहींशी शोभते. भ्रमर पहिल्यानें एका कमलोदरांत शिरतो आणि त्यांतील मधु संपला ह्मणजे तें टाकून दुसऱ्या कमलावर जातो. त्याप्रमाणं त्याचा क्रम चालू असतो. जसजसा तो पुढं जातो तसतसा त्याला मागचा विसर पडतो. पुरुषांचं यांहूनही

वेगळंच आहे. पहिली चांगली असूनही दुसरी चांगली स्त्री मिळाली ह्मणजे पहिलीचं झालंच विसरण. आह्मां स्त्रियांचीं मनं कितीतरी मायाळू! मीच पहाना वेड्यासारखी. इकडच्या जिवासाठीं आज इतके दिवस नानातऱ्हेचे कष्ट सोसून अरण्यांत, आश्रमांत, असे दिवस काढिले. मोठ्या प्रयत्नानें ही आंगठी मिळविली आणि हिकडची नुसती भेट तरी व्हावी ह्मणून येथें आल्यें; पण तिकडे त्याचं कांहीं तरी आहे का? नुसती आठवण तरी? बरोबर आहे. ती राजकन्या दृष्टीस पडली तसं धांवलं तिकडे मन. मग माझी आठवण कशाला होईल? हा दोष तिकडे कशाला देऊं? ज्याचा तो आपल्या जातीच्या वळणावर जायचाच. पण बोलून उपयोग काय? आज त्यांच्याकडे परमेश्वरानं पाहिलं आहे ह्मणून त्यांना हवंतसं वागायला, पाहिजेल तें करण्याला, मोकळिक आहे. आह्माला मात्र सगळ्या गोष्टींची लाज. काय ह्मणे, स्त्रियांचे ठिकाणीं "अनृतं साहसं माया मूर्खत्वं" इत्यादि दोष आहेत. आणखी कां नाहीं बापडीं शेंपन्नास दूषणं दिलीं. हे श्लोक करणारे कोण? असले हे पुरुषच ना! कांहीं तोंडावर हात का द्यायचा आहे? (सचिंत बसते.)

वे० बै०—इतका वेळपर्यंत विचार करीत बसलों आहें पण सगळे विचार मला सोडून गेले आहेत. कांहींच सुचत नाहीं. त्या सुंदरीचा अगदीं निजध्यास लागून गेला आहे.

कुसुमा०—वाहवा! खासं! यासाठींच साधू बनायचं वाटतं. किती अविचार हा! खरोखर बायकांसारखी

दुर्दैवी जात नाहीं. असं तरी कां ह्मणूं नये. ज्यांच्याकरितां मी जिवावर उदार होऊन कायकाय संकटं भोगीत यांचा शोध करीत येथें आलें, पण त्यांचं मन मजवर मुळींच नसून भलत्याच अप्राप्य वस्तूवर. अँ, देवा, काय तुझ्या घरीं न्याय आहे पण! (विस्मित होते.) असो, आज माझ्या सुदैवानं ही आंगठी मला मिळाली आहे. तर मी आतां वीट बनून यांचेजवळ जातें व यांना राजकन्या आणून देण्याची आशा लावितें आणि मग मीच राजकन्या बनून त्यांचे दर्शनाला जाईन. पुढं काय काय चमत्कार होतील ते पाहूं. तपस्वीमहाराजांचे कृपेनं आज मी मनांत आणीन त्या रूपानं दिसण्याची मला शक्ति आहे; तर आतांच वीट बनून ह्यांचे जवळ जावं. (आपल्याकडेच पाहून) वाः काय आंगठीचं सामर्थ्य तरी! मला विटाचा वेषच घ्यायला नको. फक्त मी मनांत आणण्याची खोटी कीं लागल्येंच दिसायला वीट. (असें ह्मणून आंगठीची प्रार्थना करिते व पुढें जाऊन वेषधारी बैराग्यास मुजरा करिते.)

वे० बै०—(हातानें बसण्यास खूण करितो.) बाबा, तूं कोण आहेस ? तुझें नांव काय ? व येथें कां आला आहेस ?

वे० वी०—महाराज मी जातीचा वीट आहें. आजपर्यंत ह्या नगरांतील राजाच्या पदरीं होतों. माझें नांव चंद्राजी. आह्मां विटांचा धंदा ह्मटला ह्मणजे किती नीच! तें सांगतां सुद्धां येत नाहीं. राजाची प्रीति ज्या स्त्रीवर बसेल तिला हरयुक्तीनें वळवून राजाला वश करून द्यावें. जर कदाचित् एखादे वेळीं

आमचे हातून त्यांचें कार्य झालें नाहीं तर झालीच इतराजी! खरोखर हा धंदा कोणींच करूं नये—बिचाऱ्या चांगल्या चांगल्या कुलीन स्त्रियांसही आह्मी नानातऱ्हेच्या भुलथापा देऊन नादीं लावतों. आमच्या पातकाला पारावार नाहीं. आजपर्यंत माझेवर राजाची फारच प्रीति होती; परंतु राजे लोक ह्मणजे बोलून चालून लहरी; एका क्षुल्लक अपराधावरून माझेवर इतराजी झाली आहे. एक प्रकारें हें फार चांगलें झालें असें मी समजतों. कारण मला ह्या धंद्याचा अगदीं वीट आला आहे. असलीं नीच कामें ह्या दीडवीत पोटाकरितां करायचीं. पण त्यापासून तरी नेहमीं सुख आहे का! ह्मणून असा विचार केला आहे कीं, पुनः हा धंदा न करितां राहिलेलें आयुष्य आपल्यासारख्या सत्पुरुषांचे सेवेंत घालवावें. अशी उपरती होऊन नगरांतून बाहेर निघालों तों माझ्या सुदैवानें लवकरच आपलें दर्शन झालें.

वे० बै०—अरे, ईश्वरानें ज्या वेळीं हें जग उत्पन्न केलें, त्याच वेळीं नानातऱ्हेच्या जाती उत्पन्न करून, त्यांना नानातऱ्हेचे धंदेही उत्पन्न केले व त्याप्रमाणें ह्या जगांतील प्रत्येक मनुष्यानें त्या त्या जातिनियमाप्रमाणें कामधंदा करून आपआपली उपजीविका करावी असा नियम केला आहे. आणि त्याचप्रमाणें सर्व मनुष्यें चालत आहेत. परंतु एखादे वेळीं कालचक्रामुळें कांहीं उलटापालट होऊन पश्चात्ताप झाला तर मनुष्याला जी क्षणिक उपरती होते; त्या उपरतीपासून एखादाच उद्धरून जातो. सर्वच मुक्त होतात असें नाहीं.

वे० वी०—(आपल्याशीं.) किती दांभिकपणा हा ! वाहवारे वेदांती ! (उघड.) महाराज, आपल्या लक्षणावरून आपण कोणी राजकुलोत्पन्न असावेत असें वाटतें व त्याप्रमाणें आपल्या ठिकाणीं सर्व राजचिन्हें दिसतात, तर आपण पूर्वाश्रमीं कोण होतां ? इतकें ऐकण्याची मला फार इच्छा आहे.

वे० बै०—(दुःखित होतो.) अरे मी पूर्वाश्रमीं कोण होतों हें समजून तुला काय करायचें आहे ?

वे० वी०—माझी फार इच्छा आहे. तर सांगावेंच आपण.

वे० बै०—असो, तुझी इच्छा आहे तर सांगतों—मी तुझ्या तर्काप्रमाणें पूर्वी राजाच होतों. पण हल्लीं कांहीं कारणामुळें अशी उपरती झाली.

वे० वी०—(आपल्याशीं.) खाशी उपरतीही. (उघड.) माझी इच्छा अशी आहे कीं, राहिलेले सर्व आयुष्याचे दिवस आपली सेवा करून घालवावे. तर मजवर एवढा अनुग्रह व्हावा हीच विनयपूर्वक प्रार्थना आहे.

वे० बै०—अरे एखादे वेळीं अशी उपरती होते; ह्मणून कोणी आपला वडिलोपार्जित धंदा का सोडीत असतो ? तो बरा असो अथवा वाईट असो. त्या धंद्यांत ईश्वरावर भरंवसा ठेवून वागावें, हेंच श्रेयस्कर आहे. यासाठीं तूं असा दुराग्रह धरूं नकोस, परत नगरांत जा, ईश्वर तुझें कल्याण करील.

वे० वी०—(आपल्याशीं.) वाहवारे ईश्वरभक्त ! (उघड.)

महाराज, आतां मी आपले पाय सोडणार नाहीं. आपण अंगीकार करा अथवा करूं नका.

वे० बै०—(आपल्याशीं.) हा ह्मणतो मी वीट आहें. कदाचित् ह्याची आपल्या इच्छितकार्यांत मदत होईल. तर ह्यास हातचा सोडून उपयोग नाहीं. परंतु ह्या वेषास साजेल असें बोलून आपलें इच्छित कार्य साधलें पाहिजे. (उघड.) ज्या मुमुक्षूला साधुसमागमाची इच्छा असेल त्यानें प्रथम सर्व भीति सोडून साहसी झालें पाहिजे—साधु लोक हे प्रथम परीक्षा पहाण्याकरितां; त्यास लोकविरुद्ध व कुत्सित अशीं कामें सांगून कसोटी पाहिल्याशिवाय आपलें खरें स्वरूप कोणाला कधींही दाखवीत नाहींत. गुरुसेवा करणें फार कठीण आहे. खरोखरच जो विरक्त झाला;—त्याला कोणत्याच गोष्टीची इच्छा नसते व त्यांनीं षड्रिपू जिंकिलेले असतात. परंतु शिष्याची खरी श्रद्धा आपल्यावर कितपत आहे, हें पाहण्याकरितां ते पाहिजे तशीं दुर्घट कामें त्यांस सांगतात. खरोखर ज्यांची गुरूवर निष्ठा असते व ज्यांस तत्वज्ञानाची खरी इच्छा असते, तेच गुरुवचनावर श्रद्धा ठेवून तीं कामें कशींही असलीं तरी निष्ठापूर्वक करतात.

वे० वी०—महाराज, तें बरोबर आहे. जर आपल्या सारख्या साधूचा समागम पाहिजे असेल तर साहस न करून कसें चालेल? असो. आपली इच्छा काय आहे ती या दासाला कळवावी. मला आपली आज्ञा शिरसावंद्य आहे. आपली इच्छा पूर्ण करण्याचे कामीं माझे पंच-

प्राण खर्चीं पडत असले तरी न भितां तें कार्य करीनच करीन.

वे० बै०—अरे, आमची इच्छा काय असणार ? आह्मीं सर्वसंग परित्याग करून विरक्त झालेले. परंतु—

वे० वी०—(आपल्याशीं) वाहवारे विरक्त ! आपण काय काम सांगणार आहां हें मी जाणत आहें. असो, सध्यां ह्या स्वारीला मनांत मांडे तर खात बसूं द्या (उघड.) महाराज, आपण मनांत कांहीं संकोच धरूं नका. आपली कशीही आज्ञा झाली तरी ती पुरी केल्याशिवाय हा दास कधींच राहणार नाहीं. एकवार अनुभव तर घेऊन पहा.

वे० बै०—या जगांत शरीरयात्रा चालत असतां मनुष्याला नानातऱ्हेच्या इच्छा उत्पन्न होतात. व त्या सिद्धीस गेल्यावांचून त्याची शरीरयात्रा सफल होत नसते. असो, तुझी कसोटीच पाहणें आहे ह्मणून तुला एक काम सांगतों. परंतु तें तुला प्रथम फारच निंद्य व दुष्कर वाटेल.

वे० वी०—महाराज, त्याची आपण काळजी करूं नये, काय ती आज्ञा व्हावी मात्र! ह्मणजे झालें.

वे० बै०—चंद्राजी, या नगरच्या राजाची कन्या फारच सौंदर्यवान् आहे; तिच्याविषयीं माझ्या मनांत मोह उत्पन्न झाला आहे तर तिची मला प्राप्ति व्हावी. तूं आजपर्यंत विटाचें काम कसें केलें आहेस त्याच्या परीक्षेची ही वेळ आहे. इतकें काम मात्र झालेंच पाहिजे.

वे० वी०—महाराज, आपली मूर्ति ह्मणजे प्रत्यक्ष

ईश्वराचा अवतार! आज आपल्या नुसत्या दर्शनानेंच आमच्यासारखा पुनीत होऊन जायचा. आपल्यांना विषयसुखाची इच्छा काय असणार? केवळ ह्या कामांत माझी परीक्षा पहाणें असेल. नाहीं तर ह्या राजकन्येची कथा काय? आपण मनांत आणाल तर इंद्राची अप्सराही खालीं येईल. असो. आज्ञेप्रमाणें आतांच नगरांत जातों.

वे० बै०—चंद्राजी, जा. ईश्वर तुला या कामांत यश देईल. मीही आपल्या नित्यकृत्याकरितां गुहेंत जातों. (जातो.)

(पडदा पडतो.)

कुसुमा०—(प्रवेश करून) "सर्व खल्विदं ब्रह्म" हें सर्व जग ब्रह्मरूप आहे असें ह्मणणारे ह्या साधूसारखे जगांत किती आहेत त्यांचा खरोखर अंत नाहीं. असल्या साधूंच्या आणलेल्या सोंगाकडे पाहिलं, ह्मणजे खरोखर प्रथमदर्शनीं कोणाच्याही मनांत; हे ह्मणजे असे भोंदू असतील अशी कल्पनासुद्धां येणार नाहीं. परंतु पुढं अनुभवानं ह्या केवळ कपटाच्या मूर्ति, महालबाड, आपमतलबी असे ठरावयाचे. यांचे कावे कांहीं निराळेच. साधु होणं फार कठीण आहे. वास्तविक असल्या ह्या दांभिक लोकांच्या दंभाला भुलून लोक फसतात ह्याचं नवल वाटतं. बरोबरच आहे. कसे नाहीं फसणार? ह्यांच्या दर्शनाला कोणी आले ह्मणजे हे अवाक्षर देखील कोणाजवळ बोलायचे नाहींत. कोणाकडे उगीच पहावयाचे नाहींत. स्वस्थ डोळे मिटून समाधि लागल्यासारखं दाखवून द्र-

व्यार्जनतपामध्यें, किंवा एखादी गरीब अबला आपल्या जाळयांत कधीं सांपडेल या चिंतनांत अगदीं निमग्न असायचे. बिचाऱ्या बापड्या भोळया बाया असल्यांच्या भजनीं लागून आपलीं घरंदारं वगैरे जवळ कांहीं असेल नसेल तें सगळं असल्या बोकेसंन्याशांच्या भरीस घालतात. इतकंच नव्हे तर, हे बकध्यानी साधु त्या अनाथ अशिक्षित अबलांचे हातून नानातऱ्हेचे अविचारही घडवितात. असे ढोंगी लोक आपलीं कामं जगामध्यें किती तरी चालवित असतील! देवा, तूं या असल्या दुष्टांना योग्य शासन कर, व आमच्या स्त्रीजातीला चांगलं ज्ञान दे—आणि बिचाऱ्या अज्ञान बाया बापड्यांचं पाऊल वांकडं न पडेल असं कर. हे जगांतील स्त्रीपुरुषांनों, तुह्मी या असल्या बगळयासंन्याशांच्या नादीं लागून फसूं नका बरं? या असल्या धर्मबाह्य लोकांना. आपल्या आसपास राहायाला जागा सुद्धां देऊं नका. खरोखर हे यमाचे दूत होत. ह्यांच्या डोक्यावरील जटा, या खरोखर जटा नव्हेत, तर हे प्रत्यक्ष काळाचे पाश आहेत. ह्यांचीं हीं भगवीं वस्त्रं खरोखर वस्त्रं नव्हत, तर हीं अधर्माचीं निशाणंच होत. असल्या अधमांच्या नादीं लागून कितीतरी गरीब बिचारीं स्त्रीपुरुषं कुकर्माचं आचरण करून कालचक्राच्या विलक्षण सपाट्यांत सांपडत असतील कोण जाणे. असो, हल्लीं मी वीट बनल्यें आहें ह्मणून जें सोंग घेतलं; त्याची बतावणी चांगली झाली पाहिजे. तर आतां कांहीं वेळानं या साधुबुवांच्या दर्शनाला पुनः गेलं पाहिजे. त्यांचं सगळं लक्ष माझ्या वाटे-

कडे लागलं असेल व माझ्या खटपटीनं ती सुंदरी लवकरच वश होईल या घमेंडींत तर असतील, आतां नगरांत तिच्याकडे न जातां कांहीं वेळानं ह्या आंगठीच्या प्रभावानं आपण राजकन्या बनून त्यांचे जवळ जावं, आणि मग पुढं काय होईल तें पहावं (जाते.)

(पडदा पडतो.)

प्रवेश २ रा.

स्थळः—गुहा. समाधिस्थ साधु असतां पडदा उचलतो. (कुसुमावती वीटवेषानें प्रवेश करिते.)

वे० वीट—(लांबून साधूकडे पाहून) वाहवा! काय सोंग आणलें आहे? आतां मूर्ति किती भोळी दिसत आहे. कोणी ह्मणेल कीं पंचप्राण जणुं काय ब्रह्मांडांतच नेले आहेत. किती दांभिकपणा हा!!! खरोखर असले साधु ह्मणजे षड्रिपूंचें प्रत्यक्ष घरच. असल्यांच्या समागमानें मोक्षप्राप्ति एकीकडे राहून नरकाचा मार्ग मात्र सुगम होणार! (निरखून पाहून आपल्याशीं.) नजर पहा कशी मधून मधून काव-याबाव-या सारखी दिसते! परंतु कोणी पाहील या भीतीनें पुन्हा घट्ट डोळे मिटत आहेत. वाहवा! चांगला हा समाधियोग!!! असो. आतां आपण पुढें जाऊन राजकन्या वश झाली आहे असें सांगून चांगलें फसविलें पाहिजे. ती वश झाली आहे, इतकें ऐकतांक्षणीं यांना आनंद होईल, इतकेंच नव्हे, तर आनंदाच्या समुद्रांत गटकळ्या खाऊं लागतील. पुढें मीच

राजकन्या होऊन आल्यावर ह्यांचें देहभानही सुटेलच कीं काय कोण जाणे ! (पुढें होऊन वे० बै० स मुजरा करितो.)

वे० बै०—(समाधि उतरून) ईश्वर तुझें कल्याण करील.

वे० वी०—(आपल्याशीं.) आशीर्वाद अगदीं ठरींव!

वे० बै०—अरे, तूं ज्या कामासाठीं गेला होतास त्याचें काय झालें ?

वे० वी०—महाराज, आपण सर्वज्ञ आहां. मग मला काय विचारतां ? आपण सर्व जाणलेंच असेल.

वे० बै०—अरे, मीं तर तुझी मुद्रा पाहतांच अंतर्ज्ञानानें सर्व कांहीं जाणलें आहे. परंतु आपला तुला विचारतों.

वे० वी०—(आपल्याशीं.) आपल्याजवळ किती अंतर्ज्ञान आहे तें मी पक्कं जाणलं आहे. असल्या दांभिक लोकांची चांगलीच खोड मोडली पाहिजे. परंतु करणार काय ? " अडली गाय आणि फटके खाय " अस्सं माझं झालं आहे. नात्याचा विचार मनांत आणला म्हणजे अगदीं नाइलाज होतो. असो. (उघड)—महाराज, मी जन्मापासून ह्या राजाच्या पदरीं हाच धंदा करून होतों. मग आपलें काम माझे हातून होणार नाहीं असें कसें होईल ? त्यांतून आपली माझ्यावर पूर्ण कृपादृष्टी, मग काय विचारतां ? ही राजकन्याशी काय, इंद्राची अप्सरासुद्धां खालीं येईल.

वे० बै०—शाबास ! अरे आमच्यासारखे तपस्वी आपल्या शिष्यांना प्रथम असलींच कामें सांगून त्यांचें सत्व

पहात असतात. परंतु खरोखर त्यांना संसारसुखाची मुळींच गरज नसते. आमच्यासारख्यांच्या समागमाचा योग येणें फार कठीण आहे. ज्याप्रमाणें टांकीचे घाव सोसल्याशिवाय दगडाला देवकळा येत नाहीं, त्याप्रमाणेंच आमच्या सारख्यांजवळ राहून कष्ट व दुःखें सोसल्याशिवाय मुमुक्षुजनाला तत्वज्ञान प्राप्त होत नाहीं.

वे० वी०—(आपल्याशीं.) एवढा हा प्रकाश कसला! आपल्यासारख्याच्या तत्वज्ञानाचाच. (उघड)–महाराज, ती राजकन्या उदयीक आपल्या दर्शनासाठीं येणार आहे. खरोखर तिच्या सौंदर्याची कमाल आहे. नाजूकपणाची केवळ खाणच!

वे० बै०—ती येवो अथवा न येवो, त्याबद्दल आह्मी मुळींच परवा करीत नाहीं. मी तुला तुझें मन पाहण्यासाठींच हें काम सांगितलें होतें. असो. ज्यापेक्षां तूं इतकी दुष्कर कामगिरी बजावून आलास त्यापेक्षां तूं उपदेश घेण्याला योग्य आहेस. तुझ्या मनांत येथें राहणें असेल तर येथें रहा. कालांतरानें तूं कृतार्थ होशील.

वे० वी०—महाराज, आपल्या नुसत्या समागमानेंच मी कृतार्थ होणारा आहें. माझी महत्पुण्याई ह्मणून या पायांचें दर्शन झालें.

वे० बै०—माझी आतां माध्यान्हकाळच्या समाधियोगाची वेळ झाली आहे. ह्मणून मी समाधि लावितों. तूं पाहिजे तर या गुहेची शोभा पहाण्याकरितां जा. (डोळे मिटून समाधि लावितो.)

वे० वी०—(आपल्याशीं.) लावा समाधी. राजकन्या

मिळालीच समजा. सध्यां मनांतल्यामनांत मांडे तर खाऊन घ्या, पुढचें पुढें— (जातो.)

बे० बै०—(डोळे उघडून व वीट गेला असें पाहून) विधिसूत्र कांहीं निराळेंच असतें. मी मूळचा राजा. माझी संपत्तीही अलोट होती. परंतु दुष्टाच्या संगतीमुळें तें सर्व रसातळास मिळालें. मी आपली प्रत्यक्ष स्त्रीसुद्धां पणास लावून गमाविली व पुढें त्या दुःखानें विरक्त झालों. परंतु होणार गोष्टी कांहीं चुकत नाहींत. सहज गंगास्नानाकरितां गेलों. इतक्यांत तेथें त्या सुंदरीचें दर्शन झालें. त्याबरोबर माझें मन मोहित होऊन तिच्या प्राप्तीविषयीं अगदीं उतावीळ झालें. ती कशी प्राप्त होईल या विचारांत असतां अकस्मात् या विटाची गांठ पडली. काय योगायोग चमत्कारिक पहा! असो, उद्यीक ती सुंदरी तर येईलच. मग पाहूं काय होईल तें! ती आणि मी असल्या एकांतस्थळीं असल्यावर वश होण्याला मुळींच वेळ लागणार नाहीं. जमल्यास त्या सुंदरीबरोबर विवाह करूं ह्मणजे झालें. आणि बहुतकरून तसेंच लक्षण दिसत आहे. (थोडा विचार करून) अरे मी आनंदाच्या अगदीं भरांत येऊन असले विचार करीत बसलों. परंतु हे विचार कोणीं ऐकिले, तर सध्यांच इष्टकार्यांत विघ्न येईल. यासाठीं कांहींएक न बोलतां स्वस्थ बसावें ह्मणजे झालें. (जातो.)

(पडदा पडतो.)

विष्कंभक.

(कुसुमावती प्रवेश करिते.)

कुसुमा०—काल साधु बोवांना सांगितल्याप्रमाणें

ती राजकन्या आज त्यांच्या दर्शनाला तर गेलीच पाहिजे. (आकाशाकडे पाहून) अग बाई, अगदीं संध्याकाळ होत आली, तर आतां मलाच या आंगठीच्या प्रभावानं राजकन्या होऊन बुवांच्या दर्शनासाठीं गेलं पाहिजे. गुरुकृपेनं ही मला आंगठी मिळाली आहे त्यामुळं त्यांना मी ती राजकन्याच दिसेन.

(आंगठीची प्रार्थना करून जाते.)

प्रवेश ३ रा.

स्थळः—अरण्यांतील गुहा.

कुसुमा०—वेषधारी राजकन्या (स्वामीजवळ येऊं लागते.)

वे०बै०—(आसनस्थ तिजकडे पाहून) वाहवारे सौंदर्य !!! जसा काय पौर्णिमेचा चंद्र खालीं उतरून हिकडे येत आहे. (आकाशाकडे पाहून) तो चंद्र कीं हा चंद्र याची मला शंकाच आहे. तो कलंकी चंद्र या असल्या निष्कलंक मुखचंद्राची बरोबरी करूं शकेल काय? (कांहीं वेळ थांबून) ही राजकन्या नव्हे, तर मला वाटतें ही कोणी स्वर्गावरून अप्सराच खालीं येत आहे. आज माझ्यासारखा दैवशाली मीच! नुसतें हिचें दर्शनच मला किती सुखकारक वाटतें आहे. शाबास! विधात्या शाबास!!

वेषधारी राजकन्या—(आपल्याशीं) स्तुतीची तर कमाल करून सोडली आहे. धिक्कार असो असल्या कामांधांना !!! (पुढें होऊन बुवांस नमस्कार करून उभी राहते.)

वे० बै०—वरं लभस्व वरं लभस्व.

वे० रा० क०—(आपल्याशीं) आशीर्वाद तर फार

चांगलाच देत आहेत. काय ह्मणे "तुला पति मिळो" साधुबुवा अगदीं एका पायावर तयार आहेत. त्यांना असं वाटत आहे कीं ही आपल्याला वरण्यासाठींच आली आहे. घ्या हवं तेवढं मनोराज्य करून!!

वे० बै०—राजकन्ये, ह्या आसनावर बैस. उभी कां?

वे० रा० क०—(आसनावर बसून) महाराज, आज मी धन्य झालें. जणुं काय आजपर्यंत वाढलेल्या माझ्या मनोरथरूपी वृक्षाचं प्रत्यक्ष पक्क फळ माझेपुढं येऊन उभं राहिलं, ह्मणूनच या पायांचं दर्शन झालं.

वे० बै०—(किंचित् हास्यवदन करून) सांसारिक प्राणी यत्किंचित वस्तूच्या लाभानेंही कृतकृत्यता मानतात. आमच्यासारखे कितीतरी सत्पुरुष विश्वचमत्कार पाहण्याकरितां नेहमीं फिरत असतात.

वे० रा० क०—(आपल्याशीं.) आपल्यासारख्या विभूति जगांत आहेत ह्मणूनच हें जग सुरळीत चाललं आहे असं ह्मटलं पाहिजे! नाहीं तर कधींच नायनाट झालं असतं. आपली पुण्याईच पडली जबर!!!

वे० बै०—ज्याची उत्पत्ति अभावापासून असते त्याचा लयही अभावांतच होतो. असें असून हे मर्त्यलोकवासी जन सर्व वस्तुजात चिरस्थाई मानितात. हें त्यांचें अज्ञान आहे. खरोखर सुखदुःख हें पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणें क्षणिक आहे. असो, पण तूं राजवाडा सोडून या अरण्यांत कां आलीस?

वे० रा० क०—महाराज, माझ्या मनाला अशी उपरती झाली आहे कीं सत्समागम करून ईश्वरप्राप्ति क-

रून घ्यावी तरच या मनुष्यजन्मास आल्याचं सार्थक. तर आपण मजवर अनुग्रह करून माझी इच्छा पूर्ण करावी.

वे० बै०—आर्ये, तुझ्या वयाकडे व सौंदर्याकडे पाहिलें ह्मणजे हे दिवस अनुरूप पतीसह क्रीडा करण्याचे असून तुझ्या ठिकाणीं अशी विरक्तता पाहून फारच आश्चर्य वाटतें.

वे० रा० कु०—(आपल्याशीं.) आणखी जरी माझी स्तुति केलीत तरी अशानं मी आपलं खरं हृद्गत का तुह्माला कळविणार आहें? (उघड.) महाराज, माझ्या मनाला भक्तिमार्गाची फारच आवड आहे. तर आपण कृपा करून भक्तिरस कसा उत्पन्न होतो, भक्ति किती प्रकारची आहे वगैरे सर्व समजून सांगावं, अशी माझी फार इच्छा आहे.

वे० बै०—तुझी इच्छाच जर आहे तर सांगतों, ऐक. "अर्चनं वंदनं दास्यं स्मरणं पादसेवनं" इत्यादि भक्ति नऊ प्रकारची आहे. भक्तिरस उत्पन्न होण्याला नेहमीं कथापुराण–श्रवण करणें, आमच्यासारख्या माहात्म्यांचीं दर्शनें घेणें त्यांची एकनिष्ठपणें सेवा करणें, वगैरे पुष्कळ मार्ग आहेत. अशा मार्गानें वर्तन केल्यास कांहीं कालानें भक्तिमार्गांत प्रवृत्ति होऊन मनुष्य ईश्वरभक्त होतो. परंतु मनुष्याला ईश्वरानें जीं इंद्रियें दिलीं आहेत त्या इंद्रियांस एकेक विषय नेमून दिला आहे. त्या सर्व इंद्रियांची विषयसेवनानें तृप्ति केल्याशिवाय मनुष्यानें सर्वसंग–परित्याग करूं नये. प्रथम सर्व इंद्रियांस संतुष्ट करून षड्रिपूंचें दमन करावें. मग या भ-

क्तिमार्गांत येण्याची इच्छा करावी. नाहीं तर इंद्रियांचा शाप घडून उलट मनुष्य महादोषाप्रत पावतो. यासाठीं तुजसारख्या प्रौढ कुमारिकेनें प्रथम विवाह करून कांहीं दिवस आपल्या पतीसमवेत आनंदानें संसारसुखाचा अनुभव घेऊन मग भक्तिमार्गांत शिरावें असें मोठमोठ्या साधुजनांचें मत आहे.

वे० रा० क०—(आपल्याशीं.) काय स्वारीची इच्छा! तोंडाला पाणी सुटलं आहे. परंतु स्पष्ट बोलण्याचा कुठें धीर होत आहे. थोडी मजा करण्याला ही संधि चांगली आहे. (उघड.) महाराज, आपल्या आज्ञेच्या बाहेर का मी आहें?

वे० बै०—(आपल्याशीं.) बहुतेक वळल्यासारखी दिसते, परंतु घाई करून उपयोग नाहीं. पहिलीच भेट आहे, पुढें पाहतां येईल. (उघड.) ईश्वर तुझे हेतु पूर्ण करील.

वे० रा० क०—महाराज, आतां मला आज्ञा असावी. असंच वारंवार ह्या चरणांचं दर्शन व्हावं एवढंच मागणं आहे.

वे० बै०—आह्मी बोलून चालून बैरागी, विरक्त, अरण्यांत रहाणारे; आमच्या भेटीचें काय? तूं येशील तेव्हां मी या ठिकाणीं आहेंच. तुझें वय फार लहान असून एवढी भक्ति पाहून फार नवल वाटतें.

वे० रा० क०—येतें तर, उदयीक आपल्या दर्शनाला येईन. (नमस्कार करिते.)

वे० बै०—वरं लभस्व वरं लभस्व

वे० रा० क०—(आपल्याशीं) तुह्मांला तितकंच दिसत आहे. तेंही होईल. थोडा अवकाश आहे. (जाते.)

वे० बै०—(राजकन्या गेली असें पाहून व उसासा टाकून) गेली! दिसेनाशी झाली! खरोखर आज मी कृतकृत्य झालों. बहुतकरून मी या नगरच्या राजाचा जांवई होणार. असलें हें रत्न या बाहादराला वरणार नाहीं अशी काय गोष्ट आहे. पण इतका हा प्रताप त्या चंद्राजीचा बरें, शाबास! चंद्राजी शाबास!

(पडदा पडतो.)

अंक ३ रा समाप्त.

अंक ४ था.

प्रवेश १ ला.

स्थळः—चंदनावती नगरींतील एक मार्ग!

चक्रंभट—मी सनातन वैदिक धर्माचा उद्धार करण्यासाठीं आजपर्यंत फिरत होतों, नानातऱ्हेचे देश पाहिले, गांव पाहिले. पण काय? जगाची स्थिति फार विलक्षण आहे. ईश्वरानें मनुष्याला जें सुख व जी स्थिति दिली आहे; ती त्याला न आवडतां तो दुसऱ्यांची स्थिति व सुखें मिळवूं इच्छितो. यामुळें आमच्यासारख्यांच्या उपदेशाला कोण धूप घालतो? वास्तविक पाहिलें ह्मणजे धर्मरक्षण होण्याला, व त्याची वृद्धि होण्याला मुख्य राजाश्रय पाहिजे. आज तर अशी स्थिति आली आहे कीं, धर्माला राजाश्रयाचें तर नांव नाहीं. यामुळें जेथें जावें

तेथें उपाशीं रहाण्याची सुद्धां वेळ येते. याकरितां आतां मी हा धंदा सोडून देऊन पूर्वी ज्याचे पदरीं होतों त्या चंद्रसेन राजाचा शोध लागेपर्यंत असें भटकत फिरण्यापेक्षां कोणातरी राजेरजवाड्याचा आश्रय धरून राहतों; ह्मणजे दिनचर्या चालून दैवयोगानें, माझ्या मित्राची गांठ पडण्याचाही संभव आहे. कदाचित् तो जर भेटला, तर त्याला कसेंही करून ताळ्यावर आणलाच पाहिजे. ह्मणून आतां या केरल देशच्या राजाचा आश्रय धरून रहातों. दुर्दैवा! काय माझे हालहाल मांडले आहेस? शिव! शिव! शिव!

(जातो.)

(वेषधारी वैरागी प्रवेश करितो.)

वे० बै०—चंद्राजी! तुझ्यासारखा पराक्रमी पुरुष जगांत कोणीही नसेल. आज मी आनंदाच्या पूर्ण शिखरास पोंचलों, याचें कारण तूंच. मी एक यःकश्चित गोसावडा! ती राजकन्या! असें असूनही ती या अरण्यांतील गुहेंत आपण होऊन माझ्या दर्शनास आली. खरोखर मी सप्तजन्म त्या सुंदरीसाठीं तपश्चर्या केली असती, तरी तिचें नुसतें दर्शन सुद्धां मला झालें असतें कीं नाहीं याची शंकाच आहे. काय तिचें तें सौंदर्य! शरीर किती नाजूक! तिचीं सुकुमार पदकमलें या भूमीवरून चालण्याला योग्य नाहींत. असें असून ती सुंदरी माझ्या भेटीसाठीं पायांनीं चालत आली. यावरून मी ज्या वेळीं स्नानाकरितां गंगेवर गेलों होतों, त्या वेळीं तिची व माझी नजरानजर झाल्यामुळें तिचें तन, मन, धन मा-

झ्याकडे लागलें होतें. असें वाटतें, कालच्याकालच ती मला वश झाली असती; पण ती मोठी मर्यादशील असल्यामुळें, तिला आपला हेतु एकदम प्रकट करितां येईना. बरोबरच आहे, कशी झाली तरी स्त्रीजात पडली. मला सर्वकाळ ती संध्याकाळची वेळ दिसते. पुन्हा ते नाजूक गाल केव्हां नजरेस पडतील ते पडोत. माझें सर्व देहभान तिकडे लागून गेलें आहे. (आकाशाकडे पाहून) अबब! सूर्य अद्याप दोन घटका राहिला आहे. (छातीस हात लावून) केव्हां संध्याकाळ होईल ती होवो. चंद्राजी पण अजून हिकडे आला नाहीं. त्याची तरी एकदां भेट झाली असती; तर तिच्याकडील कमीजास्ती बातमी तरी समजली असती. चंद्राजीला मी हव्यातशा वेदांताच्या गोष्टी सांगून त्याचें मन वळविलें. त्या बिचाऱ्याला माझ्या सर्व गोष्टी खऱ्या वाटल्या! खरोखर चंद्राजीसारखा इमानी मनुष्य मिळणें फार विरळा! आमच्यासारखे असले आपमतलबी साधु बिचाऱ्या कित्येक भावार्थी स्त्रीपुरुषांस नानातऱ्हेच्या भुलथापा देऊन फशीं पाडित असतील. असो, जो वेष घेतला आहे, त्याची बतावणी यथास्थित केलीच पाहिजे. मला या अरण्यांतील गुहेंत येऊन राहिल्याला बरेच दिवस झाले व नित्य माझ्या दर्शनाला नगरांतील हजारों लोक येत आहेत. तेव्हां या नगरांतले लोक मला काय ह्मणत असतील कोण जाणे? पण माझी स्तुति करतात कीं निंदा करतात हें कळणें अवश्य आहे. बहुतकरून नगरांतील लोकांची माझ्यावर चांगली श्रद्धा बसली आहे असें वाटतें. तर एकवार गु-

प्ररीतीनें नगरांत जाऊन चवाठ्यावरून फिरून यावें ह्मणजे सर्व कांहीं कळेल. आमच्यासारख्यांना हा शोध केलाच पाहिजे. (जातो.)

पडदा पडतो.

प्रवेश २ रा.

स्थळः—भयंकर अरण्य.

(मृगयेचा पोशाख केलेला चंद्रकांत प्रवेश करितो.)

चंद्रकांत—मी श्वापदें हुसकविण्यासाठीं मघांशींच सैनिक पाठविले असून अद्याप त्यांचा शब्दही मला ऐकूं येत नाहीं. व शिकारही रोखित नाहींत. (ऐकिल्यासारखें करून) फार लांबून कांहीं गलबला ऐकूं येतोसा वाटतो. बहुतकरून शिकार येत आहे असें दिसतें. तर आपल्यांना तयार असलें पाहिजे. (धनुष्यास बाण लावतो.)

(पडद्यांतून) (महाराज संभाळा संभाळा. हा मोठा डुकर हिकडून उठला आहे. यानें आमची तर अगदीं त्रेधा उडवून दिली आहे.)

चंद्रकांत—सैनिकहो, असे घाबरूं नका. मी अगदीं तयार आहें. माझे अंगावरून तो कसा जिवंत जाईल तो पहातों ! (इतक्यांत श्वापदांची ओरडाओरड होते, व एक चवताळलेला डुकर धांवतधांवत येतो.)

चं० कां०—वः हा पहा वेगानें अगदीं माझ्या अंगावरच येत आहे. सैनिकहो, तुह्मीं त्या बाजूला असा. ह्याचा रोंख त्या बाजूस वळण्याचा दिसतो. (बाण सोडीत त्याचे पाठीमागून जातो.) (चक्रभट प्रवेश करितो.)

चक्रंभट—मी या राजाच्या संगतीनें अगदीं कसा दमून गेलों आहें. असली का कोठें शिकार बोलल्यय? ही शिकार बेट्याची जीव घ्यायची! आज नगराहून निघाल्याला साहासात दिवस झाले, जरा कोठें विश्रांति घेईन ह्मणेन तर कोणी कोठें डुक्करच उठवितो, कोठें वाघच गुरगुरतो, तर कोठें सिंहाची आरोळीच ऐकूं येते; हिकडे एखादें विक्राळ अस्वल केंकाटूं लागतें, तर तिकडे हीं कुतरडीं भुंकूनभुंकून प्राण सोडितात. मिळून सगळीच पंचाईत! असल्या जनावरांचें नांव काढल्याबरोबर माझ्या सर्वांगाला कांपरें भरून लटपट उडते. मला घरांतून पडवींत आंचवायला यावयाचें झालें तर आमची ती हातांत दिवा घेऊन सोबत यावयाला लागत असे, इतका पडलों मी धीट!!! (इतक्यांत भयंकर श्वापदांचे शब्द ऐकून भयानें थरथर कांपूं लागून) नको—नको, मी नाहीं—मी नाहीं पुन्हा यायचा या रारानांत!!! (घाबरत घाबरत पडद्यांत जाऊन पुन्हा बाहेर येतो.) मघाशीं आमची शंभरी पुरीच भरत आली होती. पण तिच्या कुंकवाच्या जोरानें वटावलों. असो, काल तो डुक्कर उठविल्यापासून माझ्या मित्राची व माझी भेट झाली नाहीं. तो बहुतकरून त्या डुकराच्याच पाठलागांत असेल. काय करावें. कांटे लागून लागून माझ्या पायांना भोंवऱ्या झाल्या, त्यामुळें चालण्याचें मोठें जिवावर आलें आहे. पाणी पिईन ह्मणेन तर तें सुद्धां झाडाचीं पानें पडून पडून कडवट झालें आहे. आणि त्याची सुद्धां टंचाईच! उन्हानें अगदीं कसा काळा ठिक्कर पडलों आहें.

आमच्यासारख्या भटाच्या काय उपयोगी ही असली शिकार!!! आमची शिकार ह्मणजे या लाडवांच्या डोंगरावरून त्या जिलबीच्या दरींत, आणि त्या जिलबीच्या दरींतून या तुपाच्या नदींत. परंतु करणार काय? "भीड तुटत नाहीं, आणि स्नेह सुटत नाहीं;" पण कसा तरी राजाचा शोध लावला पाहिजे. (काठी टेंकीत टेंकीत निघून जातो.) (चंद्रकांत प्रवेश करितो.)

चंद्रकांत—काय चमत्कार आहे पहा. कालपासून मी व माझे सैनिक त्या डुकराचा पाठलाग करीत असतांही आमच्या हातून तो निसटून गेला! एकून श्वापदांमध्यें डुकरांची शिकार कठीण ह्मणतात ती खरी. नगर सोडून आल्याला सात आठ दिवस झाले; मी नेहमीं या अरण्यांत शिकार करण्यास येणारा खरा, परंतु या खेपेला अगदीं थकून गेलों. व अखेर शिकारही फसली. कालपासून अद्याप पाणीसुद्धां चांगलें मिळालें नाहीं. माझे सैनिक तर पुष्कळच मागें राहिले आहेत. व माझा मित्रही कालपासून कोठें चुकला आहे त्याचा पत्ता नाहीं, तो मला काय ह्मणत असेल बरें? तो नेहमीं ह्मणतच असतो, मी शिकारीला यावयाचा नाहीं ह्मणून! छे:! तहानेनें जीव कसा अगदीं कासावीस होऊन गेला आहे. (एका झाडाखालीं बसतो.)

(चक्रंभट काठी टेंकीत टेंकीत येतो.)

चक्रंभट—(आपल्याशीं.) हे राजश्री वारा खात बसले आहेत; तर आतां आपण जाऊन मुकाट्यानें त्यांच्याशीं न बोलतां स्वस्थ उभें राहावें. (त्याप्रमाणें करितो.)

चंद्रकांत—मित्रा, तूं आलास का? कसें काय? बरें आहेना? (जरा थांबून) अरे बोलत कां नाहींस? (हातानें हालवितो.)

चक्रंभट—धन्य आहेस बाबा. एखाद्याचे डोळ्यांत बोट घालावें आणि त्यालाच कां रडतोस? ह्मणून आपणच विचारावें.

चंद्रकांत—अरे असें माझ्याकडून झालें तरी काय?

चक्रंभट—दुसरें काय व्हावयाचें? ह्या तुझ्या शिकारी आहेत ना! आज आठ दहा दिवस या भयंकर रानांत उपाशींतापाशीं फिरतां फिरतां माझ्या शरिराचा सांधान्सांधा खिळखिळा झाला, कांटे रुपून रुपून पायांची चाळण किरे झाली, हे माझे डोळे पहा, बोट बोट खोल गेले; श्वापदांच्या पाठीस लागून "पाठीस लागून कसला"? त्यांच्या भयानें पळतां पळतां जीव बेजार झाला तरी ही माझी काठी होती ह्मणून बरें झालें, माझ्या आंगावर जेव्हां ससे, हरणें, भेंकरीं वगैरे अक्राळविक्राळ जनावरें व कावळे, चिमण्या इत्यादि भयंकर पांखरें धांवून आलीं तेव्हां ह्या काठीनें त्यांची अगदीं खोडच मोडून टाकली. अरे-अरे-अरे माझ्याच्यानें बोवा एक पाऊलभरही आतां चालवत नाहीं, तर आतां विश्रांति घेण्याकरितां नगरांत जाण्याची तयारी कर लवकर.

चंद्रकांत—मित्रा, आतां नगरांत तर जायचेंच; पण तहानेनें माझे प्राण कसे अगदीं व्याकूळ होऊन गेले आहेत. मार्गे एके ठिकाणीं पाणी होतें; पण त्यांत पाला पडल्यामुळें तें कुजलें होतें. तर आतां आपण दोघेही

पाणी शोधण्यासाठीं जाऊं चला. तोंपर्यंत आपले सैनिकही आपल्याला येऊन मिळतील.

चक्रंभट—तुझें आपलें कांहींनाकांहीं तरी शुष्ककाष्ठ असतेंच; आपल्याच्यानें बुवा आतां हालवत नाहीं.

चंद्रकांत—असें काय बरें? नगरांत गेल्यावर मग तुला काय मागशील तें देईन; समजलास, चल तर.

चक्रंभट—चल बाबा. नेशील तिकडे गेलें पाहिजे.

(दोघेही जातात व पडदा पडतो.)

प्रवेश ३ रा.

स्थळ—पर्वतांतील गुहा.

(**गुहेच्या तोंडीं** कुसुमावती **बसलेली** असतां पडदा उघडतो.)

कुसुमावती—देवा, मी आपल्या जिवाला आतां अगदीं कंटाळून गेलें आहें. मनुष्य दुःख सोसणार तरी कुठपर्यंत! एका गोष्टीची का मेली ही आहे, सगळ्याच गोष्टींनीं नशीब कसं हात धुऊन पाठीस लागलं आहे. मी त्या तपस्व्यापासून आंगठी घेऊन निघाल्याला आज बरेच दिवस झाले. तेव्हांपासून एकसारखीं दुःखं व प्रसंग काढीत आहें तरी अद्याप भोक्तृत्व सरत नाहीं, असलं कसलं मेलं भोक्तृत्व तरी! यावरूनच नशिबाची पुढची परीक्षा! आपल्या नशिबांत चांगलं व्हायचं असतं तर आमच्या एवढ्या मोठ्या राज्याची अशी वाट कां लागती? अहारे दैवा!! माझ्यासारखी या साऱ्या जगांत कुणी तरी दुसरी स्त्री दुःखी असेल का? काय ही स्त्री-

जात! देवा, तूं जर आमच्या ठिकाणीं चांगलं ज्ञान दिलं असतंस तर आह्मांला अशा पारतंत्र्यांत राहून नानातऱ्हेचीं दुःखं भोगण्याची वेळ कां येती? मेलं पारतंत्र्य पारतंत्र्य तरी किती!!! बिचाऱ्या मुली चारपांच वर्षांच्या झाल्या नाहींत तोंच त्यांना स्वाभाविकपणें दरवाजांतून कुणाकडे पाहण्याचीसुद्धां चोरी, कुणाजवळ नुसते दोन शब्द बोलेन ह्मणेल तर त्याचीसुद्धां पंचाईत, पुढं आठवं नव्वं वरीस लागतं न लागतं तों लागलीच त्यांच्या लग्नाची तयारी! लग्न झालं कीं तेव्हांपासून बिचाऱ्या खरोखर बंदिवासांत पडल्याच. मग काय विचारतां? नवरा कसाही असो, त्याला कांहीं कळत असो वा नसो, तो आपला अंमल चालविणार एक तऱ्हेचा, सासूबाईंना तर असं होऊन गेलं असतं कीं, आज माझे हात स्वर्गाला पोंचले मग त्या तर अशी कांहीं कमाल करून सोडतात कीं, त्यांच्यासमोर सुनांनीं बसतां उपयोगी नाहीं, कुणाकडे पाहातां उपयोगी नाहीं, कुणाजवळ दोन शब्द बोलतां उपयोगी नाहीं. सर्वकाळ त्या बिचाऱ्यांना आपले आयुष्याचे दिवस ताबेदारींत काढावे लागतात. इतकें करूनही काय ह्या मुली! ह्यांना अंमळ भीड का मर्यादा! जशा आपल्या अगोचर! असे ठोमरे मारीत असतातच. याशिवाय सासरे, दीर, जावा, नणंदा यांची ताबेदारी वेगळीच. तात्पर्य सर्वकाळ बिचाऱ्यांना दुसऱ्याच्या ताबेदारींत पुरेपुरेसं होतं. तशांत नवरा जर कांहीं बरा असला तर उगीच दुःखांत सुख! नाहीं तर मग त्यांच्या जन्माचं मातेरंच झालं असं समजावं. (कांहीं वेळ स्तब्ध बसून) देवा!

तूं न्यायी ह्मणवितोस, तुझ्या घरीं राजांपासून तों रंकापर्यंत सर्वांची योग्यता सारखी आहे; मग असं असून आह्मीं गरीब अबलांनींच तुझं काय घोडं मारलं आहे? मी एक असेन मेली फुटक्या नशिबाची! पण या पृथ्वीवर दुसऱ्या कोणीच का अशा दैवशाली नाहींत कीं, त्यांच्यामुळं तरी या स्त्रीजातीला अशीं दुःखं भोगण्याची वेळ येऊं नये! (थोडा विचार करून) अजून अशा भाग्यशाली स्त्रिया पृथ्वीवर फारशा असतील असं वाटत नाहीं. पण देवा, या पुढं तरी तूं आह्मां स्त्रियांची अशी हेळसांड करूं नको. आह्मांस ज्ञान दे, ज्या पुरुषजातीच्या साहचर्यानं आह्मीं दिवस कंठावे असा तुझ्या घरचा नियम आहे त्या पुरुषजातीला चांगलं ज्ञान दे. ते आह्मां गरीब अबलांना चांगल्या मार्गानं वागवितील असं कर. असं झाल्यानं कांहीं काळानं तरी आह्मा स्त्रियांना चांगलं ज्ञान प्राप्त होऊन आमचे दिवस सुखांत जाऊं लागतील. (कांहीं वेळ थांवून) आज अजून साधुबुवांची स्वारी कोठें आलेली दिसत नाहीं. बहुतकरून नगरांत गेली असेल.

(इतक्यांत चंद्रकांत व चक्रंभट प्रवेश करितात.)

चक्रंभट—मित्रा, आपण किती तरी लांब आलों? कोणीकडे भटकत चाललों आहों याचा थांगच नाहीं. पाणी तर कोठें दिसत नाहीं. आतां चला बुवा परत नगरांत कसे!

चंद्रकांत—अरे, अरण्याची मजा तर हीच आहे. घरच्यासारखेंच जर अरण्यांत सुख असतें तर मग घर आणि अरण्य यांत फरक तो कोणता?

चक्रंभट—नको बाबा ती तुझी मजा आह्माला! आमचा जीव चालला तरी तुझी मजाच ना? पुरे झाली तुझी शिकार.

चंद्रकांत—आह्मां राजेलोकांना शिकारीचा नाद असलाच पाहिजे. कारण मृगया करणें राजाला भूषण आहे.

चक्रंभट (पायांखालीं न्याहाळून पाहूं लागतो.)

चंद्रकांत—मित्रा, अरे असें काय करितोस? पाहातोस काय? यज्ञोपवीत सांडलें वाटतें!

चक्रंभट—हो जुळली! आतां अगदीं खास जुळली!!

चंद्रकांत—अरे काय? जुळली काय?

चक्रंभट—अरे, कल्पना.

चंद्रकांत—तूं मोठा काल्पनिक आहेस बुवा! कसली कल्पना लढविलीस?

चक्रंभट—येथें माणसांचीं पाउलें लागलेलीं दिसतात, यावरून मित्रा येथून खास कांहीं अंतरावर मनुष्याची वस्ती असलीच पाहिजे.

चंद्रकांत—असेल, तुला काय करावयाचें आहे? चल बाबा, तहान फारच लागली आहे.

चक्रंभट—अरे, मनुष्याची वस्ती आहे तेथें पाणी हें असलेंच पाहिजे; तर या पावलांच्या धोरणानें जाऊं चल.

(दोघे चालूं लागतात.)

चक्रंभट—मित्रा, मी तुला बोललों तें खरें वाटलें नाहीं. (गुहेच्या तोंडीं बसलेल्या कुसुमावतीकडे पाहून) मित्रा, असा ये पाहूं, तुला एक गंमत दाखवितों.

चंद्रकांत—काय रे बोवा? हा आलों. (त्याचे जवळ येतो.)

चक्रंभट—(कुसुमावतीकडे बोट दाखवून) ती पहा.

चंद्रकांत—मित्रा, अशा भयंकर रानांत ही कोण बरें स्त्री? कांहीं समजत नाहीं!

चक्रंभट—पण आहे कशी पाहिलीस काय? जशी हुबेहूब चांदणी.

चंद्रकांत—तुला बरें बुवा इतकें दिसलें. मी समजत होतों तुला चांगलें दिसत नसेल.

चक्रंभट—वारे विघ्नसंतोषी! आह्मांला दिसूं सुद्धां नये का? बरें तें असो; पण चल आतां नगरांत.

चंद्रकांत—मित्रा, आतां हिचा शोध केल्याशिवाय तसेंच परत जाणें चांगलें दिसत नाहीं. तर तूं जा. आणि ती कोण काय वगैरे सर्व विचारून ये.

चक्रंभट—वा! खासें. भलत्याच स्त्रीजवळ जाऊन ह्मणे तिला विचार तूं कोण, काय! ह्मणजे वेळ आली तरी आपली आमच्यावरच परभारें! मी नाहीं ऐकणार असलें, समजलास.

चंद्रकांत—अरे, असें काय करितोस? तूं वृद्ध असल्यामुळें जरी तिला विचारिलेंस तरी कोणाचे मनांत संशय येणार नाहीं. यासाठीं सांगतों.

चक्रंभट—मित्रा, तूं जरी किती सांगितलेंस तरी मी कांहीं जाणार नाहीं.

चंद्रकांत—असें काय बरें! तूं माझा मित्र ना? तर जा. मी आहेंच इकडे.

चक्रंभट—बाबा तूं ह्मणतोसच तर जातों. पण तूं

जवळच कोठें तरी बसलेला अस. नाहीं तर करशील वेळ आली कीं पोबारा.

चंद्रकांत—छे छे मित्रा, असें कसें होईल?

चक्रंभट—जातों तर. (गुहेजवळ जाऊं लागतो.)

चंद्रकांत (एक बाजूस जाऊन बसतो.)

कुसुमावती—(चक्रंभट अगदीं जवळ आला असें पाहून) अग बाई, हे चक्रंभटजी! ओळखूंसुद्धां येत नाहींत. काय ह्मातारपणीं बिचाऱ्याच्या कपाळीं दशा आली आहे ही? ह्यांच्या वृद्धापकाळामुळं ह्यांनीं मला ओळखलं नाहींसं वाटतं. असो.

चक्रंभट (गुहेच्या तोंडीं जाऊन काठीवर हात ठेवून उभा राहतो.)

कुसुमावती (चक्रंभटजीस नमस्कार करिते.)

चक्रंभट—(रागानें) ठेव एकीकडे नमस्कार बिमस्कार अगोदर!!

कुसुमावती—महाराज, असे रागावूं नका. आपली काय इच्छा आहे ती सांगा.

चक्रंभट—पहिल्यानें घोटभर चांगलें पाणी असलें तर इकडे आण पाहूं.

कुसुमावती—महाराज इतकंच ना! (कांहीं फळें व पाणी आणून देते.)

चक्रंभट—(फळें खाऊन व पाणी पिऊन) बाई तुझें कल्याण असो. हुश्श! (सुस्कारा टाकून) राम! राम! राम! आतां जरा बरें वाटलें. बाई, आतां तुला काय विचारावयाचें असेल तें विचार.

कुसुमावती—आपण इतक्या ह्मातारपणीं असल्या निर्मनुष्य अरण्यांत फिरत फिरत आलां हें पाहून मला फार आश्चर्य वाटतं.

चक्रंभट—बाई, तुझ्या डोळ्यांनीं मी वृद्ध दिसतों, पण त्या ईश्वराला मी नाहींना वृद्ध दिसत! (दुःखित होतो.) एक राजा शिकारीकरितां आला आहे, त्याच्या बरोबर मी आलों आहें. आह्मांला तहान फार लागली, ह्मणून रान धुंडीत चाललों होतों; इतक्यांत ह्या गुहेवर नजर गेली, ह्मणून मी इकडे आलों, आणि माझा मित्र मागेंच उभा आहे. तूं कोण बाई?

कुसुमावती—महाराज, मी एक दुःखी स्त्री आहें.

चक्रंभट—बाई तुझ्या एकंदर लक्षणावरून तूं कोण्यातरी मोठ्या घराण्यांतली असावीस.

कुसुमावती—महाराज, तें मी काय सांगूं? ईश्वर ज्या स्थितींत ठेवील, त्यांत राहणं भाग आहे. (सचिंत बसते.)

चक्रंभट—(आपल्याशीं) मी ह्मणतों कीं, माझ्यासारखी स्थिति कोणाची नसेल, पण जगांत बिचारीं अशीं कित्येक अनाथ पडलीं आहेत. असो. (उघड.) बाई, ईश्वर तुझें कल्याण करील. आणखी एक पंचपात्रीभर पाणी दे पाहूं. माझ्या मित्राला नेऊन देतों.

कुसुमावती (पाणी आणून देते.)

चक्रंभट—बाई मी आतां येतों बरें. ईश्वर तुला लवकरच आनंदाचे दिवस दाखवील.

(राजा बसला होता त्या ठिकाणीं जाऊं लागतो.)

कुसुमावती—(आपल्याशीं.) ह्यांना आपली ओळख

द्यावी असं मनांत होतं, पण अजून आपलं भोक्तृत्व सरलं नाहीं; तेव्हां ओळख देऊन तरी काय करायचं आहे?

चक्रंभट—(राजाजवळ येऊन) मित्रा, अरे हें घे पाणी.

चंद्रकांत—(पाणी घेऊन व पिऊन) तूं बरा आहेस बोवा! पाहिजेल तिकडे लोटा; काम आपलें फत्ते!

चक्रंभट—मित्रा, तुला स्तुति करायाला सांगायला नकोच.

चंद्रकांत—अरे मीं तिला पाहिल्यापासून माझी चित्तवृत्ती अगदीं बदलून गेली आहे. पुन्हा तिला कधीं पाहीन असें होऊन गेलें आहे.

चक्रंभट—तूं तरी मला मोठा चमत्कारिकच दिसतोस. तिला पाहून तुला काय करावयाचें आहे?

चंद्रकांत—पण ती कोण आहे रे?

चक्रंभट—अरे ती एक बिचारी दुःखी स्त्री आहे.

चंद्रकांत—अशा सुंदर स्त्रीला दुःख तें कोणतें?

चक्रंभट—अरे तिचें तिच्या जिवाला ठाऊक.

चंद्रकांत—मग तिला विचारावयाचें होतेंस कीं नाहीं?

चक्रंभट—मला नाहीं कोणी असल्या रिकाम्या उठाठेवी सांगितल्या! ती दुःखी असो वा सुखी असो. आपल्याला पाणी मिळालें, आपलें काम झालें.

चंद्रकांत—मित्रा, तूं जरा थांब, मी स्वतः एकदां तिजकडून जाऊन येतों कीं लागलेंच जावयाचें नगरांत. तेथपर्यंत तूं या झाडाखालीं विश्रांती घेत बस.

चक्रंभट—मित्रा, जातोसच तर जा; पण लवकरच ये बरें.

चंद्रकांत (जातो.)

चक्रंभट—हा दुष्ट तिचेकडे गेला आहे काय करील पहावें ! देवा, तूं तिच्या पातिव्रत्याचें रक्षण कर ह्मणजे झालें. (झाडाखालीं जाऊन बसतो.)

चंद्रकांत—(गुहेच्या जवळ जाऊन व तिजकडे पाहून आपल्याशीं.) हें रत्न ज्याचे पदरीं पडलें असेल तो खचीत दैवशाली. इंद्राचें सुखही त्याचेपुढें तुच्छ आहे, हिनें माझें सर्व तन मन धन हरण करून घेतलें आहे. ही स्त्री मला मिळेल काय? ही इतकी सुरेख आहे कीं मजजवळ एक शब्द नुसता बोलली तरी तितक्यानें मी कृतार्थ होईन. पण ही मजजवळ बोलते कशाची. अथवा संशय कशाला.

(अगदीं जवळ जाऊन उभा राहतो.)

कुसुमावती (राजास पाहून लाजून उभी राहते.)

चंद्रकां०—छे छे तूं आपल्या पायांना व्यर्थ श्रम कां देतेस? मी आलों ह्मणून उभें राहावयाला पाहिजे असें नाहीं.

कुसुमावती (तशीच न बोलतां उभी राहते.)

चंद्रकांत—किती तरी हिच्या ठिकाणीं मर्यादा आहे! अथवा स्त्रीजातीला हें उचितच आहे. हे स्त्रिये, तूं कोण? अशा भयंकर अरण्यांत कशाकरितां आली आहेस?

कुसुमावती—मी एक अनाथ स्त्री आहें.

चंद्रकांत—(आपल्याशीं.) अनाथ आहें असें ह्मणते हें तरी एकप्रकारें चांगलेंच आहे. (उघड.) हे आर्ये, तुला असल्या तरुण वयांत दुःख तें कसलें?

कुसुमावती—महाराज, (लाजत दुःखानें) आणखी दुःख तें कसलें ?

चंद्रकांत—(आपल्याशीं.) आरंभ तर बरा दिसतो; मग पुढें काय होईल तें खरें. (उघड.) आजपासून पुन्हा तूं आपल्या पहिल्यासारख्या स्थितींत जाणार. तुला आजपर्यंत जीं दुःखें भोगावीं लागलीं तीं लागलीं. आतां यापुढें तिळप्राय दुःख होणार नाहीं.

कुसुमावती—(आपल्याशीं.) या ह्यांच्या बोलण्याचा अर्थ कांहीं निराळाच दिसतो. असो. (उघड.) मग बाई देवच भेटला ह्मणायचा.

चंद्रकांत—(आपल्याशीं.) हे शब्द मात्र माझ्या मनासारखे बोललीस. (उघड.) तुझी दुःखस्थितीच दूर करण्यासाठीं मला देवानें उत्पन्न केलें आहे असें समज. व मी सांगतों त्याप्रमाणें कर.

कुसुमावती—दुःख होऊं लागलं ह्मणून तर या रानांत येण्याची पाळी आली.

चंद्रकांत—(आपल्याशीं.) हिच्या बोलण्यावरून ही कोणी मोठ्या कुलांतली स्त्री असावी असें दिसतें. (उघड.) खरेंच आहे, सुख होण्याला नगर कारण नाहीं. आणि दुःख होण्यास अरण्य कारण नाहीं. ज्या ठिकाणीं आपल्या मनाला आनंद होईल तेंच आपलें सुखाचें ठिकाण. ह्मणून मी सांगतों कीं तुला येथेंच वनविहार करावा असें वाटत असेल तर हा दासही रानांत रहायला तयार आहे.

कुसु०—(आपल्याशीं.) या बोलण्याचा अभिप्राय कांहींच समजत नाहीं. असो, पुढें ओघ कसा येतो तो पहावा.

चंद्रकांत—तूं माझ्याबरोबर नगरांत चल. ह्मणजे तुझ्या सुखाला पारावार नाहीं.

कुसु०—महाराज, आपण शुद्धीवर अहां ना? यासाठींच का आपण इकडे आलांत?

चंद्रकांत—अग, मी अगदीं शुद्धींत आहें. व तुझें ह्मणणेंही खरें आहे. तुझा व माझा नवीन पहिलाच परिचय. तेव्हां तुझ्या मनामध्यें कांहीं असलें तरी बाह्यात्कारीं असली निस्पृहता दाखविलीच पाहिजे. परंतु लाजूं नकोस. येथें आपणां उभयतांशिवाय कोणी नाहीं.

कुसु०—(रागानें.) कांहीं तरी विचार करा. आपण राजकुलोत्पन्न! आपला धर्म काय? इकडे लक्ष द्या. स्वधर्माचा उच्छेद करणं बरं नव्हे! कांहींतरी दया येऊं द्या!

चंद्र०—अग, दया आली ह्मणूनच असें ह्मणतों. यांत तुला मी कांहीं वाईट नाहीं सांगत. मी केरळ देशचा राजा आहें. माझ्याबरोबर माझ्या नगरांत चल. मी तुझा दास आहें असें समज. मग तुला मी दुःख देत आहें का सुख देत आहें याचा विचार तूंच कर.

कुसु०—धिःकार असो या पुरुषांच्या जातीला! आमच्यासारख्या गरीब अबलांच्या ते वाटतील तशा विटंबना करितात, पण त्यांना असं नाहीं कळत कीं जशी आपली स्त्री तशीच दुसऱ्याची!

चंद्रकांत—प्रिये, तूं किती जरी बोललीस तरी माझें मन अगदीं वेडें होऊन गेलें आहे. हें रत्न माझ्यासाठींच ब्रह्मदेवानें उत्पन्न केलें आहे. मग उगीच उशीर कां! मदनानें संतप्त झालेल्या या चंद्रकांताला एकवार प्रेमा-

लिंगन देऊन शांत कर. पट्टराणी हो. राजसुखाचा अनुभव घेण्यासाठीं मजबरोबर चल.

कुसु०—देवा, मी या भयंकर अरण्यांत आपल्या कर्माचें फळ भोगीत पडलें होतें, तें सुद्धां तुझ्यानं पाहवलं नाहीं ना! प्राणनाथ, आपण तरी अशा वेळीं जवळ असतेत, तर माझी या संकटांतून सुटका केली असतीत. तें तरी कुठें आहे माझ्या प्रारब्धीं! (दुःखित होते.)

चंद्र०—हे सुंदरी, उगीच ओढून चंद्रबळ आणण्यांत अर्थ नाहीं. या तुझ्या सुंदर शरीराकडे पाहून माझा जीव कसा तिळ तिळ तुटत आहे. कधीं एकदां तुला सुखसमुद्रांत लोटीन असें होऊन गेलें आहे. ही सुखाची अमोल्य संधी दवडूं नकोस. ये ये लवकर. (तिचे जवळ जाऊं लागतो.)

कुसु०—हां! खबरदार पुढं आलास तर. निर्लज्जा, तुला लाज नाहीं वाटत! बोलतोस काय? कोणापाशीं? कांहीं डोळे उघड. एवढा कामानें अंध होऊं नकोस. ये तर खरा पुढं पाहूं!

चंद्रकांत—अग ए दांडगे, तूं मला भय दाखवितेस वाटतें. अरे तुरे कोणाला करतेस? बऱ्या गोष्टीनें वश हो, नाहींतर मग सांगेन काय आहे तें.

कुसु०—अरे, इतकी भीति कोणाला दाखवितोस! मेलेलं कोंबडं कांहीं आगीला भीत नाहीं. समजलास.

चंद्रकांत—(आपल्याशीं.) काय करावें बरें, मी तर अगदींच वेडा बनलों आहें. आणि ही तर अगदीं विथरून गेली आहे. स्त्रियांसारखी हट्टी जात नाहीं. या

कृत्या साहसी स्त्रिया, मरून जातील, परंतु शेवटीं आपलेसें करितील. हिचा मला आतां असा राग येऊन गेला आहे कीं, हिचें काय करूं आणि काय न करूं. परंतु पुन्हा तिच्या या सुंदर शरीराकडे पाहिलें ह्मणजे सर्व राग जागच्याजागींच नाहींसा होतो. हें ह्मणजे एक सुंदर पुष्प आहे. तें चुरडूनही टाकवत नाहीं, व कोमेजून फुकटही दवडितां येत नाहीं. असो. मी एकवार तिला आणखी सामोपचारानें सांगून पहातों. नाहीं तर शेवटीं मी आपला प्राण देईन. नाहीं तर तिचा तरी घेईन. (तिजकडे वळून) हे सुंदरी, तुला मी वारंवार सांगत आहें, परंतु तूं ऐकत नाहींस. पहा, तूं जें मागशील तें तें तुला देईन. तुझ्या अर्ध्या वचनांत वागेन. आतां माझा अंत पाहूं नकोस. (अगदीं जवळ जाऊन ठेपतो.)

कुसुमा०—(दुःखानें.) अग बाई! हा कांहीं आतां ऐकत नाहीं! हे आई अंबे भवानी, या गरीब अबलेवर या वेळीं दया कर. अंत पाहूं नको.

चंद्रकां०—अग तूं असे नानातऱ्हेचे रंग केलेस, तरी माझ्या हातून सुटशील असें थोडेंच आहे. पाहिजेल त्याचा धांवा कर. या ठिकाणीं प्रत्यक्ष काळ जरी उतरला; तरी हा बहाद्दर एकदां तरी तुला स्पर्श केल्याशिवाय राहणार नाहीं. विचार कर. दुराग्रह सोड. उगीच हाल करून कां घेतेस? (बाजूस बसतो.)

कुसुमा०—आतां माझी धडगत दिसत नाहीं. या मेल्याची मी परोपरीनं विनवणी करीत आहें, पण ह्या दगडाला पाझर काय फुटणार? देवा, आतां

मात्र तुझ्याशिवाय या वेळीं माझी सुटका करण्याला कोणी समर्थ नाहीं! (कांहीं वेळ थांबून) मी तरी वेडी नव्हे का? अग, अशा वेळीं तुला देव तरी कां सोडवील! इतकं कुठं आहे तुझं थोर नशीब. असो, आतां आपल्याला असं बसून उपयोग नाहीं. हा मेला येऊन कांहीं भलतं सलतं करायचा! काय बाई करावं कांहीं सुचत नाहीं. हे माते वसुंधरे, तूं तरी या वेळीं मला आपल्या उदरांत जागा दे. (दुःखित होऊन डोंळे पुसूं लागते; इतक्यांत अंगठीवर नजर जाऊन आनंदानें चटकन उठते.) काय बाई चमत्कार तरी! इतका वेळ माझ्या ध्यानां-तच नव्हतं. "अनाथाच्या गाई परमेश्वर राखतो" असं ह्मणतात तें कांहीं खोटं नाहीं. देवा, या वेळीं तुझे मा-झ्यावर अनंतावधी उपकार आहेत. असो. आतां याला एकवार सांगून पाहवं, नच ऐकेल तर ह्या अंगठीची प्रार्थना करून मी याचंच रूप धारण करितें, ह्मणजे या दुष्टाला हा मी का तो मी हीच भूल पडेल. असल्या नराधमांना योग्य शिक्षा केलीच पाहिजे. (स्तब्ध उभी रहाते.)

चंद्रकां०—(तिजकडे वळून) प्रिये, काय विचार के-लास? बोल बोल लवकर. माझ्यानें आतां एक पळभर-ही धीर धरवत नाहीं. हा पहा मी तुला पदर पसरून साष्टांग नमस्कार घालितों. (नमस्कार घालितो.)

कुसुमा०—(रागानें त्याचे मस्तकावर लाथ मारून) नि-र्लज्जा, इतका आतुर होऊं नकोस. उगीच अनाथ पर-

स्त्रियांचा छळ करणं चांगलं नाहीं. अशानं कोणी जयाला गेले नाहींत.

चंद्रकां०—(फार रागानें) दुष्टे, जो हा मस्तक गुरूपुढें किंवा देवापुढेंच नम्र होणारा, तो मी तुझ्या सौंदर्याला भुलून तुझ्या पुढें नम्र केला असतां त्याला तूं लत्ताप्रहार केलास काय ? आतां तुला एकदांच विचारितों; वश होतेस कीं नाहीं, न झालीस तर आतांचेआतां तुझ्यावर बलात्कार करून इच्छा तृप्त करून घेईन. मग तुझें रक्षण कोण करील तें पाहीन.

कुसुमा०—(आपल्याशीं.) घे मेल्या घटकाभर हवं तसं तोंडसुख भोगून ! क्षणा भऱ्यानं तूं दुःखडोहांत बुडालासच समज. (आंगठीकडे पाहून) ही माझ्या बाबांची आठवण ! बाबा, तुमचे मजवर अगणित उपकार आहेत.

चंद्रकां०—(रागानें) दुष्टे, विचार कसला करतेस ? पहा तुझी आतां एका क्षणांत कशी दुर्दशा करितों ती. (आवेशानें धांवत जाऊन तिला धरूं लागतो.)

कुसुमा०—(आवेशानें चंद्रकांत धांवत येऊं लागल्या बरोबर आंगठीची प्रार्थना करून) बाबा, या वेळीं या आपल्या धर्मकन्येचं रक्षण करणं आपल्याकडे आहे. (स्मरण करिते.)

चंद्रकां०—(तिला धरूं लागतो इतक्यांत ती तद्रूप दिसूं लागते असें पाहून चपापून) अरे, मला भ्रम तर नाहीं ना झाला ?

आतां ही येथें होती आणि हा मी आहें का ही आहे ? (कुसुमावतीस न्याहाळून पाहून) छे ! मीच हा आणि ती. (इकडे तिकडे शोधूं लागतो.)

कुसुमा०—आतां मात्र चांगला बेत जमला. वाः खासं!

चंद्रकां०—(कांहीं जाळ्या उचकडितो व पुन्हा कुसुमावतीस न्याहाळून पाहून) " हा तो मी आणि ती! हा तो मी आणि ती! कोठें आहे!" (असें ह्मणत गुहेचे बाजूनें झाडांझुडपांतून शोधूं लागतो.)

कुसुमा०—बाबा, ती येईल बरं आतां. स्वस्थ इथं रहा. असल्या दुष्ट अधम नरपशूंशीं प्रसंग पडला ह्मणजे गरीब अबलांवर निष्कारण जे दुःखप्रसंग येतात ते असेच बरं. असो, आतां मला येथें राहून उपयोग नाहीं; तर येथून जाऊन चक्रंभटजींना भेटावें. व त्यांना घेऊन याच्या नगरांत जाऊन दोन दिवस राजेसाहेब बनून पहावं. राणीसाहेब तर आहेतच मेल्या जन्माच्या! काय नशीब तरी, हें आतां राजा होण्याचं माझ्या स्वप्नीं तरी होतं का? असो. आतां स्वामीमहाराजांची बडदास्त ठेवण्यास तरी ठीक पडेल. तर जावं चक्रंभटजी वाट पाहात असतील. मी तद्रूप बनल्यामुळें अर्थात ते मला ओळखणार कसे?

चंद्रकां०—"हा तो मीच आणि ती गुहेंतली कोठें आहे?"

(या प्रमाणें वेडा होऊन बडबडत फिरूं लागतो.)

कुसुमा०—जशास तसंच पाहिजे. (आकाशाकडे पाहून) अग बाई, संध्याकाळ होत आला. साधु बुवा आले तर

इष्टकार्यांत विघ्न होईल. तर जातेंच. चक्रंभटजीलाचशी काय पण सर्व जगालाही मी चंद्रकांतच दिसेन. (जाऊं लागते.)

(पडदा पडतो.)

अंक ४ था समाप्त.

अंक ५ वा.

विष्कंभक.

चक्रंभट०—(प्रवेश करून) राजे लोकांचीं मनें नेहमीं बदलतात. आज ज्याच्यावर त्यांची मर्जी त्याच्यावर उद्यां लागलीच इतराजी! आतां ज्याच्यावर इतराजी त्याच्यावर घटकेंत सुप्रसन्नता! राजाश्रयास राहणाऱ्यांची घटकेंत सौभाग्यवती आणि घटकेंत गंगाभागिरथी अशी स्थिति होण्याला अगदीं वेळ नाहीं. हे राजे लोक ज्याला एकादां चढवितील, त्याला अगदीं पर्वताचे शिखरावर नेऊन पोंचवितील. व घटकेंत एखाद्याला शिखरावरून एखाद्या खोऱ्यांतील खंदकांत केव्हांच लोटून देतील; याचाही भरंवसा नाहीं "क्षणं चित्तं क्षणं वित्तं" अशी यांची स्थिति! हल्लींच पहाना? कोणीएक गोंसावडा येथून जवळच एका गुहेंत येऊन उतरला आहे. काय त्याची बडेजाव माजली आहे! सर्व नगरांत बहुतकरून बुवांवांचून दुसरें कोणाला कांहीं दिसतच नाहीं. जी बायको घरांतून सुटली ती थेट बुवांचे गुहेंत! काय त्याच्या भोंवतीं गर्दी. बुवांचा देखावा जर पाहिला तर खचीत ब-

घण्यासारखा! परंतु स्वारीचा मतलब काय असेल हें मात्र कळत नाहीं. सर्व लोक नेहमीं बुवांचे दर्शनास जातात, तेव्हां आपणही एकवार बुवांचे दर्शन घ्यावें ह्मणून मी परवां सहज गुहेंत गेलों होतों. परंतु त्या ठिकाणीं देखावा कांहीं चमत्कारिकच! एका मोठ्या भव्य व्याघ्रांबरावर बैरागीबुवा बसलेले होते, जवळ धुन्या वगैरे पेटविलेल्या होत्या. बुवा योगमार्गांतील असावा असें वाटतें. कारण ध्यानस्थासारखे बसलेले होते. आजूबाजूस बिचाऱ्या बायाबापड्यांची फारच गर्दी उडून गेली होती. कोणी बुवांना श्रीखंडाचा नैवेद्य दाखवीत होती, कोणी पेढे, कोणी बरफी, कोणी बासुंदी, घीवर, अटींव खीर मिळून बुवांच्या पुढें पक्कानांचीं ताटेंच्याताटें येऊन पडलीं होतीं. पण बुवा असें ह्मणेना! कीं घ्या बुवा हें ब्राह्मणांना वांटून. कोणाच्या टाळक्यावर घालील आतां ह्या खिरी आणि बासुंद्या! कोणी पादसेवा करीत होत्या, कोणी बुवांना श्रमपरिहारार्थ पंख्याचा वारा चालविला होता. कांहीं चरणतीर्थ सेवन करीत होत्या. बुवा हे योगमार्गामध्यें लय लागल्यासारखे बसले होते, व मधून मधून आपल्या भोंवतीं जमलेल्या भाविक जनांकडे हळूच नेत्रकटाक्षानें अवलोकन करीत होते. काय बुवांच्या डोळ्याचें पाणी तरी विलक्षण! खरोखर सोंग हुबेहूब आणिलें आहे. अरे पण असें बोलणार कोण? जवळपास कोणीं ऐकिलें तर नसेल ना? (आजुबाजूस पाहून) एकंदरींत त्या गोंसावड्याला अकरावा गुरु आला आहे असें ह्मणण्याला कांहीं हरकत नाहीं. ह्या चक्रंभटाला

मात्र नेहमीं बारावा ! ह्या बायकांना असलीं बंडें पाहि-जेत कशाला ? ह्यांना पतिसेवा हेंच खरें साधन. व नवऱ्या परता दुसरा गुरु नाहीं. परंतु त्यांच्या मनांत तें कोठें आहे. अथवा हा दोष पुरुषांवरच आहे, कारण त्यांना वागवितां येत नाहीं ह्मणून ह्या बायका अशा अनावर होतात ! तरी सुद्धां "अबला यत्र प्रबला" या न्यायानें पाहिलें ह्मणजे अशा ठिकाणीं पुरुषांचें काय चालायचें आहे ? परंतु त्याबद्दल पुरुषांनीं आपल्याक-डून होईल तितका बंदोबस्त ठेविला पाहिजे. ह्या नग-रांतील धर्माधिकारी रामभट दीक्षित ह्यांच्या सुनेला काल मीं त्या जोगड्याजवळ उभी असलेली पाहिल्यापासून माझ्या अंगाचा कसा अगदीं तिळपापड झाला आहे! सोवळी होऊन अद्याप पुरें एक वर्षसुद्धां झालें नसेल, तशांत, वय सगळें अठरा वीस वर्षांचें ! हे धर्माधिकारी ह्मण-वितात. असल्या बायकांना बिघडविण्याला ह्या धर्मबाह्य लोकांना मुळींच वेळ नाहीं. त्याप्रमाणेंच ती साळु-अक्का पाद्धीण, ती पुतळाबाई, ह्या गतभर्तृकांनीं तर अगदींच ताळ सोडिला आहे. नेहमीं अमुक ठिकाणच्या बुवांनीं अमुक गांवांतील अमक्या गतभर्तृकेला घेऊन पोबारा केला, अमक्यांनीं अमुक केलें, अशा गोष्टी ने-हमीं पाहण्यांत व ऐकण्यांत येत आहेत; तरी अद्याप-ही ह्या लोकांचे डोळे उघडत नाहींत. ह्याबद्दल नवल वाटतें. ही लोकांची स्थिति झाली. राजाच्या संबंधानें विचार केला, तर फारच विलक्षण, स्थिति ! राजानें, तर त्या दांभिकाला कालपासून राजवाड्यांतच आणून

ठेविलें आहे; व राजा तर त्याचे अगदीं पक्का भजनीं लागून गेला आहे. सर्व राजवाड्यांत बुवाशिवाय हल्लीं दुसरी गोष्ट नाहीं. राजकन्या बुवांचे दर्शनासाठीं जात असते, असें ऐकिलें आहे! अर्जुनासारखी स्थिति न होवो ह्मणजे झालें. राजेलोकसुद्धां, या असल्या दांभिक भोंदू लोकांच्या भजनीं लागतात याचें आश्चर्य वाटतें. असो, आपण हल्लीं राजाचें अन्न खात आहों, तेव्हां त्याला सदुपदेश करून त्या जोगड्याचे नादीं न लागण्याविषयीं जितकें सांगतां येईल तितकें सांगणें, हें आपलें कर्तव्य आहे. खरोखर हे साधु नव्हत, तर बिचाऱ्या गरीब बायाबापड्यांचे काळ आहेत. कोणी साधु, इच्छित देणारे, कोणी संतती देणारे, कोणी आत्मसुखाचा लाभ करून देणारे ह्मणवितात; कोणी मौनधारण, कोणी योगसाधन, कोणी तप करणारे ह्मणवितात, मिळून नानातऱ्हेच्या मिषांनीं हे धर्मबाह्य लोक जगांतील लोकांना, विशेषेंकरून स्त्रियांना, त्यांतही गतभर्तृकांना फसवीत आहेत. व खरोखर नरकाचें साधन करून देत आहेत. यासाठीं सांगतों बाबांनो, असल्या ह्या लबाड, मतलबी, दांभिक, धर्मबाह्य लोकांना आपल्या आसपास क्षणभर उभें राहण्यालासुद्धां जागा देऊं नका. खरोखर देहाचें सार्थक करण्याचे मार्ग फार वेगळे आहेत. असो, मला इकडे आल्याला बराच वेळ झाला, तर आतां मी जाऊन राजाला त्या जोगड्याची सर्व स्थिति सांगतों. मग याउपर त्याचें दैव! (शिव! शिव! शिव! ह्मणत जातो.)

प्रवेश १ ला.

स्थळ.—[राजरस्ता.]

वेष० बैरा०—(आसनस्थ.) मला राजाचें बोलावणें आलें, तेव्हां माझें मन अगदीं द्विधा होऊन गेलें होतें. एक मन असें वाटे कीं, राजकन्या माझ्याकडे वारंवार येते, ही गोष्ट राजाला समजली असेल; व त्यामुळें त्याचें मन क्रुद्ध होऊन त्यानें मला खरोखर शासन करण्याचे इच्छेनेंच बोलाविलें असेल ! पण पुन्हा असें वाटे कीं, राजा हा माझ्या अगदीं पक्का नादीं लागला आहे, व राजकन्या जी वारंवार मजकडे येई ती बहुतकरून राजाच्या हुकुमानेंच येई. व राजकन्येच्या लक्षणांवरून ती मला अगदीं वश होती, असें ह्मणण्याला कांहीं हरकत नाहीं. तेव्हां राजकन्येनें, मी वरीन तर ह्या साधूबुवांनाच वरीन, असा राजाजवळ बहुतकरून हट्ट घेतला असेल. मोठे लोक बहुतकरून आपल्या मुलांचे हट्ट पुरवीत असतात. तेव्हां कदाचित् मला नेऊन माझ्याशीं त्या सुंदरीचा मोठ्या थाटानें विवाह करण्याची तर राजाची इच्छा नसेल ना ? असेंही वाटे. पण पुन्हां लागलेंच असें मनांत येई कीं, ही गोष्ट घडावी कशी ! कारण मी खरोखर जरी साधू नसलों, तरी आजच्या माझ्या सोंगावरून मला सर्व लोक साधू मानीत आहेत. तेव्हां असला वेडगळ हट्ट तिलाही घेतां येणार नाहीं; व तिनें कदाचित् लडिवाळपणानें घेतला तरी राजाला त्यापासून क्रोध उत्पन्न झाला असेल, व हें सर्व गारूड

माझेंच आहे असें राजाच्या मनांत येऊन मला देहांत प्रायश्चित्त देण्याकरितांच राजाचें बोलावणें आलें आहे असेंही वाटे. मिळून मन अगदीं विचारांत गुंग होतें व जीवांत जीव नव्हता; परंतु राजवाड्यांत गेल्यावर पाहतों तों यांपैकीं कांहींच प्रकार नाहीं. राजाला मजविषयीं राग वगैरे आलेला नसून उलट राजा माझे सेवेंत अगदीं तत्पर होता. तेव्हां माझ्या मनाला थोडथोडे आशेचे अंकूर फुटूं लागले. पण पुढें विवाह संबंधानें कोठें कांहींच तयारी दिसली नाहीं. व माझी प्रियाही कोठें दृष्टीस पडली नाहीं. खरोखर तिजवांचून मला एक क्षणभर सुद्धां करमत नाहीं. सर्व काळ त्या सुंदरी शिवाय कांहीं दिसत नाहीं. हे सुंदरी ये ये!! तुजविषयीं उत्सुक झालेल्या ह्या चंद्रसेनाला एकवार आपल्या मुखचंद्राचें दर्शन देऊन शांत कर. त्या सुंदरीच्या दर्शनसमयाचें स्मरण झालें ह्मणजे मन अगदीं उद्विग्न होतें; सर्व जग नाहींसारखें दिसूं लागतें. (उसासा टाकून) "वाहवारे ती गुहा आणि ती संध्याकाळची वेळ" अशी वेळ पुन्हा सुदैवानें कधीं तरी येईल काय? (थोडा वेळ स्तब्ध असून) असो, कदाचित्, ती सुंदरी माझ्या दर्शनासाठीं उत्सुक होऊन राजवाड्यांतून निघून गुहेंत गेली असेल. (आकाशाकडे पाहून) हल्लीं संध्याकाळचा समय होत आला आहे, तर आतां आपण गुहेंत जावें. ह्मणजे कदाचित् तिचें दर्शन होईल. आतां मला त्या सुंदरीच्या दर्शनसमयावांचून दुसरें कांहीं दिसत नाहीं.

"वाहवारे ती गुहा आणि ती संध्याकाळची वेळ."

(जाऊं लागतो व पडदा पडतो.)

प्रवेश २ रा.

स्थळ [पर्वतांतील गुहा.]

चंद्रकां०—("हा तर मी आणि ती गुहेंतली कोठें गेली?" याप्रमाणें बडबडत अस्ताव्यस्त फिरूं लागतो.)

वेष०बै०—(प्रवेश करून चंद्रकांताकडे पाहून) अरे, हा काय चमत्कार! या ठिकाणीं प्रिया तर कोठें दिसत नाहीं. परंतु हा एक पुरुष भ्रमिष्टासारखा बडबडत फिरत आहे. काय बडबडतो आहे बरें हा? (ऐकल्यासारखें करून) "हा तर मी आणि ती गुहेंतली कोठें गेली?" खरोखर मला याचे बोलण्याचा कांहींच अर्थ कळत नाहीं. तर याला विचारावें ह्मणजे काय आहे, तें समजेल. (चंद्रकांताकडे वळून) अरे, तूं कोण? व या अरण्यांत असा भ्रमिष्टासारखा बडबडत कां फिरत आहेस?

चंद्रकां०—(वेषधारी बैराग्याचे आंगावर कांहीं पाला पाचोरा टाकून) "हा तर मी आणि ती गुहेंतली कोठें गेली?" (असें बडबडूं लागतो.)

वेष०बैरा०—अरे, हा कोणा पिशाचाच्या उपद्रवामुळें किंवा यक्षकिन्नरादि वनदेवतांचा कोप झाल्यामुळें वेडा तर बनला नाहींना? (हातानें त्यास हालवून) बाबा, तूं कोण आहेस व असा वेड्यासारखा कां झालास?

चंद्रकांत—(कांहीं पानें पाला वगैरे खातो व जाळ्या उचकटितो.) "हा तर मी आणि ती गुहेंतली कोठें गेली?"

वेष० बैरा०—अरे हा तर निवळ वेडा खचीत. मग कशापासून होवो. हा असें ह्मणत आहे कीं, "गुहेंतली कोठें गेली?" यावरून ती माझी प्रिया तर नसेल ना? पण पुन्हा असें ह्मणतो कीं, हा तर मी यावरून कांहींच संदर्प जुळत नाहीं. काय असेल तें असो. बहुतकरून हा कांहीं तरी पिशाचाचाच खेळ असेल असें वाटतें. माझी प्रिया माझ्या भेटीसाठीं आली असावी, व तिला कोणी तरी पिशाचांनीं ठार मारून टाकिली असावी. व हा कोणी तरी पिशाच, रूपांतर करून येथें फिरत आहे. (त्याकडे पाहून) काय याचे डोळे भयंकर दिसत आहेत! मीही बहुतेक जिवंत असून, पिशाच बनण्याची वेळ आली आहे. कारण राजवाड्यांत कन्या हरवल्याचा वगैरे कांहीं बोभाटा नाहीं. व ती माझ्या दृष्टीसही पडली नाहीं. त्यावरून मी माझी प्रिया या गुहेंत माझे दर्शनासाठीं आली असेल असें समजत होतों. परंतु ते सर्व विचार आतां मनांतल्यामनांत राहिले. हे प्रिये, हे सुंदरी, माझ्यावर विश्वास ठेविल्यामुळें तुझ्या सुकुमार शरिराचा नाश झाला. तुझ्या नाशाला मी सर्वतोपरी कारण झालों. माझ्यासारखा स्त्रीघातकी जगांत मीच आहें. पहिल्या बिचाऱ्या साध्वीची मीं आपल्या या कठोर हातांनींच त्याप्रमाणें वाट लाविली, व पुढें या मार्गांत शिरलों. व पुन्हा तसें करणें योग्य नसतांही अशी दुष्ट बुद्धि धरून तुला हरण करण्यास प्रवृत्त झालों. त्या गोष्टीचा परिणाम आज असा झाला. तस्मात् मजसारखा अधम हतभागी कोणी नाहीं. (गुहेकडे पाहून व इकडे ति-

कडे फिरत व जाळ्या शोधीत) हेंच तें व्याघ्रांबर! हीच त्या सुंदरीची बसण्याची जागा! (आकाशाकडे पाहून) हीच ती संध्याकाळची वेळ! अरे हें काय? मला वेड तर नाहींना लागलें. वेड! वेड! होय खचीत वेडच! हरहर गेले ते दिवस. "वाहवारे ही गुहा आणि ती संध्याकाळची वेळ." (वेड लागून असें बडबडत फिरूं लागतो.)

चंद्रकांत—"हा तर मी आणि ती गुहेंतली कोठें गेली." (याप्रमाणें ह्मणत फिरतो.)

(इतक्यांत जसवंतसिंग व बखतसिंग शिपाई प्रवेश करितात.)

जसवंत०—सरकारके हुकूमके माफिक इदर आके पहोंचे. मगर ह्यां तो दिवानेका बजार है.

बखत०—दिवाने रहिने देव नही तो कोई अक्कल-मंद रहिने देव. आपकू क्या करना? मालिकने जो कुच काम हमकू फरमाया है ओ करना चाहिये.

जसवंत०—अबे, तुम कौन अदमी है? इदर तुम क्या गूल मचाई है.

चंद्रकां०—(उत्तर न देतां) "हा तर मी आणि ती गुहेंतली कोठें गेली?" (याप्रमाणें बडबडत त्या शिपायांना न्याहाळून पाहूं लागतो व फिरतो.)

वेष० बैरा०—"वाहवारे ती गुहा आणि ती संध्या-काळची वेळ." (याप्रमाणें बडबडत फिरतो.)

बखत०—(आश्चर्ययुक्त मुद्रेनें) क्या ताजुबकी बात है. हमारे सरकारके चेहरेमें और ये जो अदमी मेरेपास आके, मू तेढा करके देखता है, इसमें बिलकुल तफरका दिखता नहीं. क्या है सो भगवान् जाने!

जसवं०—हां जी हां! अब कहते ये सच बात है. मैने अबीतक अच्छा तऱ्हेसे इसका मूं देखा नहीं. मगर तुम बोलते वैसाहि है. लेकिन् हमारे सरकार तो दरबारमें थे. इदर कब तशरीफ फर्माया? (वेडेवांकडे हात करून) तेढे बांके हात करके, "हा मी, हा तर मी." इसका मायना क्या?

बखत०—(बैराग्याकडे पाहून) ये फकीर कल तो सरकारवाडेमें था. (त्याहाळून पाहून) इदर कब आया, मगर ओ जो जबानसे लफज निकलता है. इसमें और इस जबानमें बहुत फरक है. भाई मुजे तो डर लगता है. मुजे वुइसा मालूम होता है. ये कोई सैतानके सवारी आयी है.

जसवंत०—डरनेका कच्छु काम नही. लेकिन ये बात कुच अच्छी नही. खावींदकु और रयतेकु ये बात कुच बुराई दिखाती है. हमकु ये दोनोकु पकडके, जबरदस्तीसे हुजूरके कदमकेपास जरूर लेजाना चाहिये.

बखत०—बहुत अच्छा. मगर जो बात करना कोई नाम न रखे, वुईसी ख्याल करके दुरुस्त करना चाहिये.

वेष० बैरा०—(वडबडत कांहीं पाला आणितो व शिपायांचे अंगावर टाकून आपल्या पायांतील खडावा काढून जसवंतसिंगाचे डोकीवर ठेवूं लागतो.)

जसवंत०—(बैराग्यास एकीकडे लोटून) क्या दिवाना अदमी है.

बखतसिंग—मुजे वुइसा मालुम होता है, ये दिवाने

तो सच्च है. मगर कोई अदमी आपने तकसरी छुपानेकुं वास्ते वुईसी लोकोके आंखमें मट्टी डालता है.

चंद्रकां० व वेष० बैरागी—(पूर्ववत् बडबडत फिरतात.)

बखतसिंग—अभी इनकू पकडके हुशारीसे हुजूरके कदमकेपास लेजाना चाहिये.

(बखतसिंग व जसवंतसिंग दोघां वेड्यांस मध्यें घालून ढकलीत ढकलीत घेऊन जाऊं लागतात.)

(पडदा पडतो·)

प्रवेश ३ रा.

स्थळः—(दरबार) (वेष० राजा, प्रधान वसंत, चक्रंभट, प्रतिहारी आसनस्थ.)

वेष० राजा—संसारसागर तरून जाण्याला अनेक उपाय आहेत. परंतु अज्ञान मनुष्यें त्यांजबद्दल काडीमात्र विचार करीत नाहींत. व सर्व अशाश्वत असूनही शाश्वत मानून क्षुल्लक वस्तूचे अथवा सुखाचे लाभासाठीं वाईट कर्माला प्रवृत्त होतात व शेवटीं फसतात. या जगांत अनेक ठिकाणीं कित्येक महान् महान् विभूति वास करीत आहेत, त्यांशिवाय हें जग चालायचें नाहीं. परंतु मनुष्यें त्यांजबद्दल काळजी घेत नाहींत. कदाचित् सत्संगति घडली तरी मनुष्याचे हातून ती राखवत नाहीं. साधुसमागम मोठा दुर्लभ आहे. कालपासून साधुबुवा कोठें रागावून गेले आहेत. त्यांचा तपास

लागत नाहीं. त्यांच्या शोधार्थ पाठविलेले शिपाईही अद्याप येत नाहींत. काय असेल तें असो.

चक्रंभट—(थोडा पुढें सरून आपल्याशीं) अद्याप सुद्धां त्या जोगड्याचा नाद सुटत नाहीं आं? दैवाप्रमाणें बुद्धि, आपलें हातीं काय आहे?

(इतक्यांत जसवंतसिंग व बखतसिंग चंद्रकांतास व वेष० वैराग्यास घेऊन येतात व राजास मुजरा करून उभे राहतात.)

चंद्रकांत—"हा तो मी आणि ती गुहेंतली कोठें गेली?"

(याप्रमाणें बडबडत प्रत्येकाजवळ जाऊन न्याहाळून पाहूं लागतो.)

वेष० बैरागी—"वाहवारे ती गुहा आणि ती संध्याकाळची वेळ."

(ह्याप्रमाणें ह्मणत फिरूं लागतो.)

वसंत—(त्यांस पाहून विस्मित होऊन थोडा पुढें सरून आपल्याशीं) हा काय बरें विलक्षण प्रकार! हे राजेसाहेब का ते राजेसाहेब! दोघे सारखेच दिसतात. हा काय बरें बडबडतो? कांहीं कळत नाहीं. हें मोठें गूढ आहे.

वेष० राजा—(आपल्याशीं) वाहवारे वाहवा आतां मात्र चांगला बेत जमला. गुहेंतली येथेंच आहे बरें!

चक्रंभट—(त्यांस पाहून आश्चर्ययुक्त होतो.)

वसंत—(आपल्याशीं) हा बैरागी तरी कोण असावा बरें? आणि हा बडबडतो तें एक वेगळ्याच रीतीचें.!! मिळून हें कांहीं तरी विघ्न आहे. हे कांहीं मनुष्य नसावेत. हा पिशाचाचाच खेळ. दुसरें काय? माझ्या बुद्धीला भ्रंश तर झाला नाहींना? हा मीच ना पण!

चक्रंभट—(आपल्याशीं) मी इतका वेळपर्यंत विचार

करीत होतों परंतु तर्क चालत नाहीं. हा दरबार तरी खरा का पण ! (इकडे तिकडे पाहूं लागतो.) दरबारासारखा दिसतो खरा. हा मी बोलत आहें, पण खरोखर मीच आहें का दुसरा कोणी आहे ? (हात, पाय, अंगरखा, पागोटें, यांकडे पाहूं लागतो.)

वेष० राजा—(आपल्याशीं) प्रधानजी व चक्रंभटजी ही स्थिति पाहून चकित झाले असें दिसतें. मघांपासून दोघेजण भ्रमिष्टाप्रमाणें बनले आहेत. तर आतां ह्या दोघांना येथून दवडावें ह्मणजे कांहीं तरी यांचीं मनें ताळ्यावर येतील. कोण आहे रे ? जसवंतासिंग, ह्या बैराग्याला बेलबागेंतील श्रीवरदेश्वराचे देवालयांत नेऊन ठेवा व दुसऱ्याला हिराकोटांतील कैदखान्यांत नेऊन ठेवा.

जसवंत०—जो हुकूम. (दोघांस ढकलीत ढकलीत जसवंतसिंग व बखतसिंग घेऊन जातात.)

वेष० राजा०—प्रधानजी, सत्पुरुष असतात ते आपल्या ठिकाणीं कोणाची किती श्रद्धा आहे हें पाहण्याकरितां मुद्दाम असे वेड्यासारखे नानातऱ्हेचे वेष धारण करितात. परंतु खरोखर ते कांहीं तसे नसतात. मला असें वाटतें कीं, ह्या साधुमहाराजांचा आपल्याकडून कांहीं-तरी अवमान झाला यामुळें ते क्रुद्ध होऊन त्यांनीं असा चमत्कारिक वेष धारण केला आहे. तर त्यांचे जवळ कृतकर्माबद्दलची माफी मागितली पाहिजे ह्मणजे ते क्षमा करतील. तर मी स्वतः एकांतांत साधुबोवांचे दर्शनास जाणार आहें. तर तुह्मीं लवकर जाऊन सर्व तयारी करावी.

प्रधान—जशी सरकारची मर्जी. महाराज भद्रावती

नगरांतील प्रधानाकडून काल गुप्त हेर आला होता, त्यानें आपल्याला एक निरोप आणिला आहे कीं, "येथील सरकार चंद्रसेन हे आज पुष्कळ दिवस नगरामध्यें नसून कोणीकडे गेले आहेत. त्यांचा तपास नाहीं. त्यांचें राज्य घेणाऱ्या रंभाजीरावाचा समूळ नाश झालेला आहे. आमचे सरकार आज येतील, उद्यां येतील, ह्या आशेवर आह्मीं आजपर्यंत स्वस्थतेनें राज्यकारभार चालविला होता, परंतु आमच्या दुर्दैवानें आतां ती आमची आशा सफल होईल असें दिसत नाहीं, तर काय व्यवस्था करावयाची त्याची मर्जीनुरूप तजवीज व्हावी."

वेष०राजा—(आपल्याशीं) काय चमत्कार तरी, अजून राज्य तसेंच चाललें आहे आं! ईश्वरकरणी अगाध आहे. (उघड) असो, प्रधानजी उदयिक त्यांना काय तो जबाब देऊं. आज मला स्वामींचे पूजेस जावयाचें आहे तर तुह्मी लवकर जाऊन तयारी ठेवा.

प्रधान—आज्ञा शिरसा वंद्य आहे. (जातो.)

चक्रंभट—हा जोगड्या तो कालचाच दिसतोय. छे! पण त्याची बडेजाव कोणीकडे. नाहीं पण तोच हा. माझ्या हाताचीं बोटें किती पण मला दिसतात पाहूं. (पाहूं लागतो.)

वेष०राजा—(आपल्याशीं) भटजीमहाराज बहुतेक भ्रमिष्ट होणार. असो आतां यांची नजर चुकवून हळूच आपण जावें. कारण, आपला अद्याप पुष्कळ कार्यभाग होणें आहे. (निघून जातो.)

प्रतिहारी—(जातो.)

चक्रंभट—(तपकीर ओढून व सिंहासनाकडे पाहून) अरे,

मी विचार करीत बसलों आहें; इतक्यांत सिंहासनावरील राजेसाहेब कोठें गेले? (आसपास पाहून) प्रतिहारी तरी कोठें आहे? तो राजा कीं आतां या सिंहासनावर दिसत होता तो राजा! हो पण खरा राजा मघाशीं दरबारांत धरून आणलेला तोच. कारण, त्याचे अंगांत शिकारीचे वेळचें चिलखत तसेंच होतें. खरोखर ही खूण पटली. मीही त्याचे बरोबर शिकारीला गेलों होतों. तेथें गुहेंत एक स्त्री बसलेली होती व तिजकडे मी पाणी पिण्यास गेलों होतों आणि माझ्या मित्रालाही दिलें होतें. खरोखर ती स्त्री पिशाच असून तिचाच हा खेळ. खरा राजा वेडा झालेला तोच! एकून धन्य आहे माझ्या नशीबाची! पहिल्यानें त्या चंद्रसेनाचे आश्रयास होतों त्याची त्याप्रमाणें वाट लागली. ती बिचारी त्याची स्त्री केवळ माउली कोणीकडे गेली त्याचा पत्ता नाहीं. पुढें कांहीं दिवस धर्मोपदेशक होऊन भटकत होतों. नंतर या राजाचे आश्रयास राहिलों; तों या ठिकाणीं तर त्यापेक्षांही वरची कडी. तेव्हां आतां माझ्या कर्माची सीमा झाली. माझ्यासारखीं पांढऱ्या पायांचीं भटं ज्याच्या घरांत शिरतील, त्याचा सत्यानाश!!. (कांहीं वेळ स्तब्ध बसून) मी बोलत आहें खरा पण धैर्य मला सोडून चाललें. काय असेल तें असो. मी पिशाचच तर नाहींना पण बनलों. (इकडे तिकडे पाहून) हीं पहा सर्व पिशाचें! होयरे होय मी पण पिशाचच. आणि हा सर्व पिशाचांचाच बाजार! ओळखलारे! ओळखला.(धांवत जाऊं लागतो.) (पडदा पडतो.)

प्रवेश ४ था.

स्थळः—(बेलवागेंतील श्रीवरदेश्वराचें देवालय.)

वेष० बैरागी—(आसनस्थ) "वाहवारे ती गुहा आणि ती संध्याकाळची वेळ." (याप्रमाणें ह्मणत बसतो.)

वेष० राजा—(एके बाजूस येऊन वेष० बैराग्याकडे पाहून) आतां पुन्हा पहिल्याप्रमाणें या आंगठीची प्रार्थना करून राजकन्या बनतें व त्यांचें वेड उतरितें. त्यांचें वेड घालविण्याला किती उशीर आहे, पण एकंदर पुरुषांची जात मोठी आषक. तो एक तिकडे वेडा होऊन पडलाच आहे! वाहवारे साधु. असल्यांना खरोखर जवळ उभं सुद्धां करूं नये, परंतु करणार काय? (असें म्हणून आंगठीची प्रार्थना करिते व हळुहळु बैराग्याकडे जाऊं लागते.)

वेष० बैरागी—(राजकन्येकडे पाहून) हा काय बरें चमत्कार आहे? ही कोण स्त्री इकडे येत आहे? काय सुंदर आहे ही. हिला पाहिल्याबरोबर मला राजकन्येचा भास झाला! खरोखर ती सुंदरी अशीच होती.

वेष० राजकन्या—आतां कसें लागलेंच वेड उतरलें. एकून ह्या पुरुषांपुढें शिकस्त आहे.

वेष० बैरागी—(पुन्हा राजकन्येकडे पाहून) चालण्याची ऐटही हुबेहुब तशीच दिसते. ती तर मला प्रेमालिंगन देण्यासाठीं येत नसेलना?

वेष० राजक०—(आपल्याशीं) स्वारीच्या तोंडाला पाणी सुटूं लागलें.

वेष० बैरागी—(राजकन्या अगदीं जवळ आली असें पाहून) संशय कशाला? खरोखर माझी प्रियाच. आतां

मात्र माझी मनीषा सफल होण्याचा काल समीप आला असें दिसतें. तर विलंब न करितां या सुंदरीशीं विवाह करून घेतला पाहिजे. बहुतकरून विधिसूत्र असेंच आहे, ह्मणून ही सुंदरी आज इकडे येत आहे.

वेष० रा० क०—(आपल्याशीं) काय इच्छा तरी प्रबल आहे! मघांशीं कशी स्थिति झाली होती; त्याची आठवण तरी! जसे त्या गांवचेही नव्हत.

वेष० बैरा०—(राजकन्या अगदीं जवळ आली असें पाहून) ये ये सुंदरी या आसनावर बैस. छे छे चुकलों बरें. माझ्याकडून हा अपराध घडला तर त्याबद्दल क्षमा असावी.

वेष० रा० क०—महाराज त्याजबद्दल आपणांस इतकें वाईट वाटायला नको.

वेष० बैरा०—आर्यें, बैस.

वेष० रा० क०—ही आपले चरणांच्या समोर उभी आहें.

वेष० बैरा०—छे तूं उभी आहेस हें पाहून माझा आत्मा शांत होत नाहीं तर आसनपरिग्रह कर.

वेष रा० क०—बरं तर तसंच कां होईना. (बसते.)

वेष० बैरा०—तुझी भेट झाल्याला बराच काळ गेल्यामुळें माझें मन अगदीं द्विधा होऊन गेलें होतें. कारण असल्या तरुण वयांत ही तुझी साधुसमागमाची इच्छा पाहून फारच समाधान वाटतें. खरोखर पुष्कळ राजकन्या पाहिल्या पण अशी निस्सीम भक्तीची राजकन्या माझ्या पाहण्यांत आली नाहीं.

वेष० रा० क०—माझ्या मनांत पुष्कळ भक्ति आहे.

पण चांगल्या कामांत विघ्न करणारे दुष्ट लोक या जगांत पुष्कळ असतात. त्यामुळें मला येण्याला विलंब झाला. त्याबद्दल क्षमा असावी. (क्षमा मागते.)

वेष० बैरा०—त्यांत क्षमा ती काय? ही जगाची रीतच आहे. पण जेथें आपणांस दुष्टांपासून त्रास होतो असें वाटेल तें स्थळ सोडून (तिच्या तोंडाकडे हळूच पाहूं लागतो.)

वेष० रा० क०—(बैराग्याकडे लाजत लाजत हळूच न्याहाळून) मीं आपल्या ह्मणण्याच्या बाहेर नाहीं. मात्र!!! (लाजून खालीं मान घालिते.)

वेष० बैरा०—ईशकृपेनें सर्व गोष्टी निर्विघ्नपणें पार पडतील. कांहीं काळजी करूं नकोस.

वेष० रा० क०—पण आपलं पूर्ववृत्त ऐकावं अशी मला फार इच्छा झाली आहे.

वेष० बैरा०—अग तें ऐकून तुला काय करायचें आहे? गेल्या गोष्टी पुनःपुनः आठवीत बसणें चांगलें नाहीं.

वे० रा० क०—(थोडी लाजत) पण माझी इच्छाच असली तर!

वेष० बैरा०—सांगतों बापडें! मी पूर्वी राजपुत्र होतों. माझ्या तारुण्यांत मला अनुरूप अशा एका राजकन्येशीं माझा विवाह झाला. व पुढें दैवयोगानें!! (स्तब्ध बसतो.)

वेष० रा०क०—एकून दैवानं कुणालाच सोडलं नाहीं आँ!

वेष० बैरा०—तिचा व माझा वियोग झाला. (दुःखित होतो.)

वेष॰ रा॰ क॰—(आपल्याशीं) वियोग केला असं ह्मटलं असतं तर किती चांगलं दिसलं असतं. (उघड.) अरेरे तर मग फार वाईट गोष्ट झाली. पण आपण तिचा शोध का केला नाहीं ?

वेष॰ बैरा॰—अग, मी तिचा शोध केल्यावांचून का स्वस्थ बसलों आहें ? तिचीं जीं जीं ठिकाणें होतीं, तीं तीं सर्व शोधिलीं; व ईश्वरदयेनें मला तसें साधनही मिळालें होतें, व आहे. पण असून उपयोग काय ?

वेष॰ रा॰ क॰—बरं पण अजून कांहीं यत्न केले तर सफल होतील कीं नाहीं ?

वेष॰ बैरा॰—छे आतां कसले. माझें यत्न करण्याचें साधन ह्मणून काय तें हें. (खडावा दाखवितो.)

वेष॰ रा॰ क॰—ह्मणजे ह्या खडावांत असा गुण तरी कोणता ?

वेष॰ बैरा॰—ह्या खडावांवर पाय ठेवून पाहिजे त्या स्थळीं जातां येतें.

वेष॰ रा॰क॰—अगबाई! हें काय थोडकं का साधन आहे ? असं साधन असल्यावर ती आपल्या जवळच आहे ह्मणायचं !

वेष॰ बैरा॰—तें सगळें खरें. पण ती कोठें आहे, हें ठाऊक असेल तर ना तिथें जायचें ?

वेष॰ रा॰ क॰—ती कुठें आहे हें ठाऊक नसलं ह्मणून काय झालं ? आपण अशीच खडावांची प्रार्थना करावी कीं ती ज्या ठिकाणीं असेल त्या ठिकाणीं चला. ह्मणजे झालं.

वेष॰ बैरा॰—(चकित होऊन आपल्याशीं) शिव !

शिव! शिव! एकून बुडत्याचा पाय खोलांत ह्मणतात तो खोटा नाहीं. ही युक्ति जर मला पहिल्यानें आठवली असती, तर खरोखर तिची भेट कधींच झाली असती. हे सुंदरी, खरोखर मी चांडाळ आहें. आतां फार दिवस झाले आहेत तरी सुद्धां एकवार यत्न करून पहावा. सुदैवानें तपास लागला तर चांगलेंच होईल. (उघड) बरें तर क्षणभर तूं येथें अस. मी लवकर तिचा शोध करून येतों.

वेष० रा० क०—(लाजत) मी इथं बसण्यापेक्षां बरोबरच; (लाजते.)

वेष० बैरा०—बरें, तुझ्या मनाप्रमाणेंच कां होईना. ही एक खडाव तूं घे, आणि एक मी घेतों. (तिला खडाव देतो.)

(खडावांवर दोघेंही उभीं राहून प्रार्थना करितात परंतु खडावा हालत नाहींत.)

वेष० बैरा०—असें कां बरें झालें? खडावांतील सामर्थ्य कमी झालें ह्मणावें, तर मला पाहिजेल तिकडे त्या नेत असत, आतां मी एकटाच अनुभव पाहातों. (असें ह्मणून खडावा पायांत घालून प्रार्थना करितो तों वेषधारी राजकन्येजवळ जातात.)

वेष० बैरा०—(एकीकडे वळून आपल्याशीं) हिचे जवळ ह्या खडावा मला नेतात, याबद्दल मोठें आश्चर्य वाटतें. काय असेल कांहीं समजत नाहीं! बरें आतां तिचे पायांत खडावा देऊन पाहूं. (तिजकडे वळून) आतां तूं एकटीच या खडावा घालून त्यांची प्रार्थना कर.

वेष० रा०क०—(खडावा घालून प्रार्थना करितें पण खडावा हालत नाहींत.)

वेष० बैरा०—आतां मात्र सीमा झाली.! प्रिये, हें गारूड काय आहे हें तुला ठाऊक आहे?

वेष० रा०क०—महाराज, मला अबलेला काय समजतं.

वेष० बैरा०—हे सुंदरी, आतां माझा अंत पाहूं नको. मी सर्वथैव अपराधी आहें. (असें ह्मणून तिचे तोंडाकडे पाहतो तों मूळची स्त्री दिसूं लागल्यामुळें एकदम प्रेमालिंगन देतो.)

वेष० रा०क०—(बैराग्याकडे पाहून व हातांतील आंगठीकडे नजर जातांच ती सुवर्णाची झाल्यामुळें चकित होते व पुन्हा प्रेमालिंगन देते.)

(उभयतांचे डोळ्यांतून आनंदाश्रु वाहतात.)

चंद्रसेन०—प्रिये, माझ्यामुळें तुला नानाप्रकारचीं दुःखें भोगावीं लागलीं. माझ्यासारखा निर्दय जगांत कोणी नसेल!

कुसुमावती—छे छे प्रियकरा, या चरणांची भेट झाली यामुळें माझीं सर्व दुःखें दूर झालीं.

चंद्रसेन०—झालें तें ठीक झालें. पण मघाशीं तूं राजकन्या काय दिसत होतीस! खडावा घातल्याबरोबर खऱ्या रूपानें काय दिसायला लागलीस! हें गारूड आहे तरी काय?

कुसुमावती (कानाशीं कान लावून हळूच सांगते.)

चंद्रसेन—हं! एकून केरळ देशचा राजा ती तूंच. आणि राजकन्याही तूंच होतीस!

कुसुमावती—आणि आपल्या कृपेनं पुन्हा आपली प्रियाही मीच.

चंद्रसेन—प्रिये, आजपर्यंत झालेल्या उभयतांच्या सुखदुःखांच्या गोष्टी मग शांतपणानें बोलूं. पण या ठिकाणीं जर आपणांस कोणीं पाहिलें, तर कदाचित् विघ्न होईल. यासाठीं पुन्हा तूं पहिल्याप्रमाणें राजवेष धारण कर.

कुसुमावती—आतां मी राजवेष कसा धरूं? कारण, ज्यामुळं मी पाहिजेल तशी दिसत असें, त्या आंगठीचें रूपांतर होऊन ती सुवर्णाची झाली. पण आतां आपणांस ओळखतील, तर या संकटसमयीं मी आपल्या धर्मपित्याचं स्मरण करितें; ह्मणजे ते येऊन आपल्या सर्व दुःखांचा परिहार करितील. (असें म्हणून स्मरण करिते.)

तपस्वी०—

यः सृष्टिस्थितिसंहृतिर्वितनुते ब्रह्मादिमूर्तित्रिकै-
र्यस्याधीनतया स्थितानि सदसत्कर्माण्यपि प्राणिनां ॥
नित्येच्छाकृतिबुद्धिमानथपरो जीवात्परात्मा स्वयं ।
सोयं वो विदधातु पूर्णमचिराच्चेतोगतं यद्भवेत् ॥ १ ॥

नमः परब्रह्मणे—नमः परब्रह्मणे—नमः परब्रह्मणे—
(याप्रमाणें म्हणत तपस्वी प्रवेश करितो.)

चंद्रसेन, कुसुमावती—(तपस्व्यास नमस्कार करितात.)

तपस्वी—(आशीर्वाद देऊन) वत्से, आतां तुझा अनिष्टकाल सरला बरें!! तर आतां आपल्या पतिसमवेत आनंदानें राहा.

कुसुमावती—बाबा, आपल्या कृपेनं आतां मला कांहीं कमी नाहीं.

(इतक्यांत वसंत प्रधान प्रवेश करितो.)

वसंत— (चंद्रसेन, कुसुमावती, तपस्वी यांस पाहून आपल्याशीं) आमचे सरकार ह्या साधुबुवांचे पूजेसाठीं आले आहेत, ते तर कोठें दिसत नाहींत. व ही कोणी नवीनच अनोळखी स्त्री व हा एक कोणी तपस्वी दिसत आहे. यांतील खरें काय हें मुळींच कळत नाहीं! हा सर्व भुतांचा मायावी बाजार आहे, दुसरें कांहीं नाहीं. तर आतां आपण जाऊन सर्व नगरांत द्वाही फिरवावी. (उघड.) धांवा हो धांवा हें सर्व पिशाचमय आहे. हा भुतांचा मायावी (घाबरत) मा-मामा-मायावी बा-बाजार! (धांवूं लागतो इतक्यांत तपस्वी त्याचा हात धरून त्यास थांबवितो.)

(इतक्यांत चक्रंभटजी प्रवेश करितात.)

चक्रंभट—(सर्वांकडे पाहून चपापून व घाबरून) होय रे होय. मीही पिशाच! आणि हा सर्व पिशाचांचाच बाजार. ओळखलारे ओळखला! (भीतीनें घाबरून कांपूं लागतो.)

तपस्वी—(चक्रंभटास हात धरून उभा करितो.) बाबांनो, असे घाबरूं नका. हें सर्व दैवी चरित्र आहे. ज्याप्रमाणें होणार गोष्टी त्याप्रमाणें झाल्या. हा जो बैरागी दिसत आहे, तो खरा बैरागी नसून भद्रावती नगरचा राजा आहे.

(इतकें ऐकिल्याबरोबर चक्रंभटाची व चंद्रसेनाची नजरानजर होऊन उभयतां भेटतात.)

चक्रंभट—मित्रा, तुझें कुशल आहे ना? आज किती तरी दिवसांनीं ही आपली भेट!

तपस्वी—व ही त्याचीच स्त्री आहे. हीच तुमचे नगरांत पुरुषवेषानें राज्य करीत होती.

वसंत, चक्रंभट (मनांतल्या मनांत फार चपापतात.)

तपस्वी—तुमचा खरा राजा, जो बंदिवान होऊन पडला आहे तो. अशा दुष्टांना असेंच पाहिजे.

कुसुमा०—बाबा, तो अपराधी तर खरा; पण आपल्या कृपेनं जर आह्मां सगळ्यांना आज आनंदाचा दिवस उगवला आहे, तर त्याला तरी संकटांत कां टाकावं? झाली तितकी शिक्षा पुरे. माझ्या मनांतून त्याचं राज्य त्यालाच पुन्हा मिळावं असं आहे.

तपस्वी—बाई, तुझ्यासारख्या सुविचारी मुली फारच थोड्या निपजतात. तर तुझी ही उदारबुद्धि पाहून मला फार आनंद होतो, तर तूं ह्मणतेस तसेंच करावयाचें.

कुसुमा०—प्रधानजी, तुमच्या महाराजांना कैदखान्यांतून इकडे आणण्याची तजवीज करा.

(प्रधान जाऊन वेड्या चंद्रकांतास घेऊन येतो.)

चंद्रकां०—(आल्याबरोबर कुसुमावतीकडे नजर जाऊन तिला साष्टांग नमस्कार घालितो.) हे महापतिव्रते, मीं अज्ञानानें तुझा छळ केला, ह्याबद्दल तूं मला जी शिक्षा करशील; ती भोगण्याला मी तयार आहें.

कुसुमा०—(चंद्रकांतास सांवरून उठावयास सांगून) अरे, ज्या अर्थी तुला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला आहे, त्या अर्थी तुला क्षमा केली आहे. तर तूं आपल्या राज्यांत जाऊन सुखानें रहा. पण पुन्हा असं मनुष्यपणाला काळिमा आणणारं कृत्य करूं नकोस बरं.

चंद्रकां०—(लीनतेनें) आज तुह्मीं मला जीवदान दिलेंत, हे तुमचे उपकार मी कालत्रयीं विसरणार नाहीं.

वसंत (भद्रावतींतील हेरांनीं आणिलेलें पत्र चंद्रसेनास दाखवितो.)

तपस्वी०—चंद्रसेना, तूं आपले पूर्वीचे राजधानींत जाऊन सुखानें रहा. ईश्वर तुह्मां उभयतांचें कल्याण करील. (प्रधानाकडे वळून) प्रधानजी, तुह्मीं एकनिष्ठतेनें जशी पूर्वीं या गादीची सेवा केलीत तशीच या पुढें करा. त्यांत ईश्वर तुह्माला यश देईल.

सर्वजण—महाराज, आपली आज्ञा शिरसा वंद्य.

तपस्वी०—बाळे, आणखी कांहीं तुझी इच्छा असेल तर माग.

कुसुमा०—बाबा, दुसरं कांहीं नको. आह्मां अबलांना चांगलं ज्ञान असावं. व आह्मीं ज्यांच्या बरोबर जन्म घालवावयाचा; ते पुरुष आह्मांला चांगल्या रीतीनं वागवितील अशी पुरुषांचे ठिकाणीं सद्बुद्धि असावी इतकंच मागणं आहे.

तपस्वी—तथास्तु.

चक्रंभट—(तपस्व्यास नमस्कार करून) महाराज, माझ्या सर्व इच्छा तृप्त झाल्या. पत्नीसह माझा मित्र मला भेटला, यामुळें मला आतां संसारसुखाची मुळींच इच्छा नाहीं. तर देहाचें सार्थक व्हावें एतदर्थ आपल्या साहचर्यानें राहून सनातन वैदिक धर्माचा उद्धार करावा असें मनांत आहे.

तपस्वी—बरें तुझी इच्छा आहे तर रहा.

चंद्रसेन—माझी प्रिया पुन्हा मला भेटून, मी आपले जुन्या राज्यांत जाईन अशी मला मुळींच आशा नव्हती, पण ईश्वरकरणी अघटित आहे, मनुष्यांनीं

करूं ह्मणून कांहीं होत नाहीं. असो. आतां ज्या जगन्नियंत्या परमेश्वरानें आज आपणां सर्वांच्या भेटीचा योग आणून सर्वांना हा महदानंदाचा दिवस दाखविला; त्याचे आपणांवर अनंत उपकार आहेत, तर आतां आपण त्या सच्चिदानंदरूपी जगदीशाची आरती करूं.

सर्व पात्रें—चाल—"सुंदरमुख तुंदिलतनु"

रागः—झिंझोटी.

श्री धरनुत त्रिगुणयुक्त वरद ईश्वरा ॥
व सुधाधिप वंदिताति पार्वतीवरा ॥
र म्य वदन भस्मलिप्त चंद्रशेखरा ॥
दे वांतक दर्पहरण निर्जरेश्वरा ॥
श्व सनाशनभूषितांग जान्हवीधरा ॥
र मलों, भ्रमलों, विटलों, संसारिं, त्रिपुरारि,
पाप हरीं, हे सुरेश्वरा ॥ श्रीधर० ॥ १ ॥
प्रा र्थितसें अल्पमती ज्ञानमंदिरा ॥
सा ह्य करुनि पामर हा शीघ्र उद्धरा ॥
दि व्य दृष्टि देइं अतां नीलकंधरा ॥
क मला, विमला, सकलां, देवुनियां, येवुनियां,
सत्वर या भेट किंकरा ॥ श्रीधर० ॥ २ ॥
स त्कारुनि भक्तजनां देशि तूं वरा ॥
मा न्य करुनि स्वीय ह्मणसि हे दयाकरा ॥
ज य जय हे कामदहन सांब शिवहरा ॥
स्तवितों, ध्यातों, नमितों, अघहरणा,
सुखकरणा, ने चरणां त्रिपुरमदहरा ॥ श्री० ॥ ३ ॥

(पडदा पडतो.)

अंक ५ वा समाप्त.

नवीन जाहिराती.

याच कर्त्यानें आणखी केलेलीं पुस्तकें.

(छापत आहेत.)

निवळ धर्मार्थ

श्रीक्षेत्र गाणगापूररहस्य.

फक्त जुलैअखेरपर्यंत सह्या देणारांस ८ आणे.

मागाहून जास्त पडेल.

या क्षेत्रीं "परित्राणाय साधूनां" इत्यादि ब्रीदावलीचें महत्त्व वाढविण्याविषयीं सदोदित दक्ष, अशा प्रभूचा दत्तरूपानें जागृत निवास आहे; हें सर्वश्रुत आहेच. मी शारीरिक व्यथेनें अत्यंत त्रासून या क्षेत्रीं गेलों होतों, तेथें अल्प सेवेनेंच मला उत्कृष्ट गुण आला; यामुळें आणखी कांहीं सेवा घडावी ह्मणून हें पुस्तक लिहिलें आहे. यांत क्षेत्रांतील देवालयें, तीर्थें, महोत्सव वगैरेबद्दल योग्य माहिती व यात्रेकरू आणि सेवेकरी यांस अवश्य लागणारी माहिती दिली आहे.

या पुस्तकाच्या साह्यानें जी रक्कम जमेल; त्या रकमेचा व्यय, एक श्रीदत्ताचा मठ, साधुसंतांकरितां धर्मशाळा, अन्नसत्र वगैरे महत्कृत्यांत करावा असें मनांत आहे. तरी या महत्कृत्यास धार्मिक भक्तजन उदार आश्रय देतील अशी आशा आहे.

गरीबगुरिबांसहि, मदत देतां येऊन वरील महत्कृत्याचें श्रेय मिळावें, ह्मणून किंमत फक्त **दहा** आणे ठेविली आहे. किमतीपेक्षां जास्त मदत देणारांस टपालहांशील न पडतां छापील पावती मिळेल. मुंबईखेरीज बाहेरगांवच्या वर्गणीदारांस टपालहांशील पडेल.

शूर रजपूत रघोजीराव

आणि

शरयू.

अंक १ ते ५.

हें नाटक ऐतिहासिक कादंबरीच्या साह्यानें रचिलें आहे. तरी यांत इतर ऐतिहासिक पुस्तकांच्या आधारानें जितकी खरी माहिती देतां आली तितकी देण्याचा यत्न केला आहे. यांत वीररस प्रधान असून जागोजागीं शृंगार, करुण, हास्य वगैरे रस चांगले साधले आहेत. मुसलमानी पात्रांची भाषा उर्दू घातली आहे. हें पुस्तक वाचण्याला अगदीं योग्य असून संग्राह्य आहे असें आह्मीं लिहिण्यापेक्षां हें पाहण्याचें काम इतिहासप्रिय वाचकांवरच सोंपविणें बरें. पुस्तकें आगष्ट सन १८९५ अखेर तयार होतील. सन १८९५ आक्टोबरअखेरपर्यंत आगाऊ सह्या पाठविणारांस किंमत ८१० टपालखर्च माफ. मागाहून किंमत जास्त पडून टपालखर्च निराळा पडेल.

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें.

पोस्ट गोरेगांव, तालुका माणगांव, जिल्हा कुलाबा, येथें गुरुवर्य राजमान्य राजेश्री गोविंद लक्ष्मण रानडे शास्त्री, मि. चिंतो भास्कर सहस्रबुद्धे व मालक यांजकडे विकत मिळतील.

मुंबई निर्णयसागर प्रेस व रा. रा. गोपाळ लक्ष्मण रानडे, मुगभाट, जिवनजी महाराजांची चाळ.

धुळें, जिल्हा खानदेश, रा. रा. गोविंद कृष्ण जोशी, कारकून नि॰ रा. रा. भास्करराव साठे, वकील, कोर्ट धुळें यांजकडे.

॥ श्रीसद्गुरुप्रसन्न ॥

औषधें विक्रीस तयार.

गरजू लोकांनीं अवश्य अनुभव घ्यावा.

आमचीं खालीं लिहिलेलीं औषधें अनुभविक व वापरण्यास बिनधोक आहेत.

	रु. आ. पै.
१ खोकला, श्वास, क्षय यांवर गोळ्या.—सदर्हू गोळ्या आबालवृद्धांस सारख्याच गुण करितात; मात्र ७ वर्षांचे आंतील मुलास गोळी अर्धी द्यावी. या केंशरकस्तुरी मिश्रित असल्यामुळें घेण्यास फार चांगल्या आहेत. सोळा गोळ्यांचे डबीस किं० रुपया	१–०–०
२ अतिसार, संग्रहणी, पटकी यांवर गोळ्या.—या जुने बाडांत वाचतांनां आढळल्या. गुदस्त सालीं माहामारीवर या गोळ्यांचा फार मोठा उपयोग झाला. या पटकीची सांथ असेल तेव्हां फुकट व इतर वेळीं दर ३० गोळ्यांचे डबीस	१–०–०
३ गजकर्ण, इसब, नायटे यांवर खात्रीलायक औषध,–डबीस	०–८–०
४ खरजेवर मलम अगर पूड.—(ही पूड व मलम विषारी आहे.) डबीस	०–६–०
५ कुमारीआसव लहान मुलांस फारच उपयोगी.–आठ तोळ्यांचे कुपीस	१–०–०
६ लाक्षादि तैल—शतौषधीमिश्रित जुने बाडांत मिळालेले, अंगांतील सर्व वातविकारांवर फार उपयोगी असून प्रत्येक कुटुंबीयानें हें संग्रहित करावेंच अशी याची योग्यता आहे. उपयोग.–अंगास लावून शेकणें. आठ तोळ्यांचे कुपीस	१–०–०
७ डोळ्यांतील विकारांवर काजळ.–सर्वत्र सारखा उपयोग होत आहे. डबीस	०–८–०

वरील औषधें व त्याशिवाय इतर मात्रा, रसायनें वगैरे मागितलीं असतां रोख पैसे आल्यास अगर व्ही. पी. नें पाठवूं. अनुपानाचा कागद सोबत. पाठवूं. टपालखर्च व बंगीखर्च वेगळा पडेल.

चिं० भा० सहस्रबुद्धे, वैद्य.

पोष्ट गोरेगांव, ता० माणगांव, जि० कुलाबा.

